UNIVERSAL LIBRARY
OU_192032
UNIVERSAL LIBRARY

# कै० हरि नारायण आपटे

## कांहीं आठवणी

आणि

## मनोरंजक प्रसंग.

CHECKED 195?

लेखक

**बापूजी मार्तंड आंबेकर**

१९३१

किंमत एक रुपाया

सर्व हक्क कर्त्यांचे स्वाधीन

प्रकाशक
बापूजी मार्तंड आंबेकर,
डेक्कन जिमखाना,
पुणें, नं. ४

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार,
पुणें, नं. २.

# प्रस्तावना.

हरिभाऊ दिवंगत होऊन आज बारा वर्षें झालीं. त्यांच्या निधनानंतर तीन वर्षांनीं मीं त्यांचें संक्षिप्त चरित्र लिहिलें. त्याच्या थोडक्याच अवधींत दोन आवृत्ति निघाल्या. यावरून जनतेचें हरिभाऊंबद्दलचें प्रेम आणि आदरबुद्धि हीं व्यक्त होतात. या चरित्रांत हरिभाऊंच्या जीवनक्रमावर, त्यांच्या चारित्र्यावर व त्यांच्या स्वभावावर प्रकाश पाडणाऱ्या अशा सुमारें तीस चाळीस आठवणी देण्यांत आल्या आहेत. अशाच कांहीं आठवणी आणखी प्रसिद्ध करून हरिभाऊंच्या प्रेमळ, मनोरंजक, मनमिळाऊ व अनेक प्रकारें मार्गदर्शक अशा जीवनक्रमाशीं वाचकांचा अधिक निकट परिचय घडवून आणावा, असा माझा संकल्प होता. पण तो आतांपर्यंत मूर्तस्वरूपांत येण्याचा योग आला नाहीं.

गेल्या मार्चच्या तीन तारखेस हरिभाऊंचा बारावा स्मृतिदिन होता. त्यानिमित्त आपल्या पत्राकरितां नित्यक्रमाप्रमाणें लेख लिहावा असा विचार मनांत आला. हरिभाऊंचें वाङ्मयिक कार्य, त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष गुण, समाजाच्या विचारसरणींत त्यांनीं घडवून आणलेलें स्थित्यंतर, वगैरे विषयांवर व्याख्यानें व लेख यांच्या द्वारें आजपर्यंत अनेक गृहस्थांनीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत. तेव्हां तसलाच विषय घेण्यापेक्षां हरिभाऊ, त्यांचे आप्तेष्ट व त्यांचें मित्रमंडळ यांचा एक **ग्रूप फोटो** आठवणींच्या रूपानें वाचकांस सादर करतां आला तर पहावा अशा विचारानें लिहिण्यास सुरुवात केली. तों इतकीं वर्षें सुप्त स्थितींत असलेली स्मृति जागृत झाल्यासारखी होऊन आठवणींच्या द्वारें एक एक प्रसंग किंवा प्रसंगाच्या द्वारें एक एक आठवण कलमांतून उतरूं लागली. अशा रीतीनें तयार झालेले पहिले दोन लेख हरिभाऊंच्या गेल्या स्मृतिदिनानिमित्त, ज्ञानप्रकाशांत प्रकाशितही झाले. या निमित्तानें खुल्या झालेल्या स्मृतिकपाटाचा वेळींच फायदा न घेतला तर हें कपाट लागून स्मरणशक्ति पुन्हा झोंपीं जाईल या विचारानें वरील दोन लेख प्रसिद्ध झाल्यानंतर एक एक आठवण किंवा प्रसंग हीं जसजशीं

दृग्गोचर होऊं लागलीं तसतसें त्यांचें टिपण करण्यास मीं सुरुवात केली; व प्रस्तुत पुस्तक हें या टिपणाचेंच फळ होय.

आठवणी व प्रसंग हे मनश्चक्षूपुढें ज्या क्रमानें उभे राहिले त्या क्रमानेंच ते पुस्तकांत दिले आहेत. हे याच क्रमानें द्यावे किंवा त्यांची विषयवारीनें मांडणी करून द्यावे यासंबंधानें कांहीं मित्रमंडळींचें मत घेतलें. त्यांत आठवणी व प्रसंग ज्या क्रमानें आठवले त्या क्रमानेंच ते द्यावे या बाजूस बहुमत पडलें. आठवणींचा अनुक्रम विषयवारीनें लावल्यास त्यांत वैचित्र्य व टवटवी रहाणार नाहीं. तेंच त्या आठवल्या तशा दिल्यानें त्यांतील वैचित्र्य कायम राहून चटकदारपणाचीही हानि होणार नाहीं, ही बहुमतानें मान्य ठरलेली विचारसरणी लेखकासही संमत झाली आणि तोच क्रम पुस्तकांत स्वीकारण्यांत आला आहे. आठवणी किंवा प्रसंग यांचें स्मरण होण्यांत पद्धत ही असतेच. ती पद्धत मात्र आठवणी देण्यांत अर्थातच कायम राखण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें चरित्रांत ज्या आठवणी येऊन गेल्या आहेत त्यांची यांत पुनरावृत्ति होऊं नये अशी साधारणतः दृष्टि ठेवली आहे. तरी-सुद्धां चरित्रांत असलेल्या अशा दहाबारा आठवणी यांत आल्या आहेतच. बाकी दोनशेंवर आठवणी यांत सर्वस्वीं नवीन अशाच आहेत.

पुस्तकांत एकंदर बारा लेखांक देण्यांत आले आहेत. त्यांतील कोणताही लेखांक घेतला तरी वैचित्र्यासंबंधांत तो स्वयंपूर्ण असल्याचें आढळून येईल. हरि-भाऊंचा फुरसतीचा काळ श्रेष्ठ प्रकारच्या करमणुकींत कसा जाई, ते स्वतः मित्र-मंडळाचे मध्यवर्ति असल्यामुळें या मंडळाचें वातावरण आनंदमय कसें होऊन जात असे, सहृदयता व सदयता हे त्यांच्या स्वभाववृत्तीचे प्रेरक गुण कसे होते व याचमुळें दुसऱ्या कोणास क्वचितच आकर्षित करतां आला असेल इतका प्रचंड मित्रपरिवार त्यांना आपल्या भोंवतीं कसा जमवितां आला, हरिभाऊंचें निवास-स्थान हें त्यांच्या मित्रांचें विश्रांतिस्थान व्हावें अशी परिस्थिति हरिभाऊंच्या प्रेमळ व निरपेक्ष वृत्तीनें कशी निर्माण केली, वगैरे गोष्टी आठवणींच्या योगानें चांगल्या निदर्शनास येण्यासारख्या आहेत.

हरिभाऊ मोठे होते; पण त्यांच्या मोठेपणास माणुसकीचें आवरण असल्या-मुळें तो कधीं कोणाच्या डोळ्यावर येत नसे. उलट त्यांच्या मोठेपणाबद्दल

सर्वांना कौतुक, आदर व अभिमानच वाटत असे. एखाद्या सामुदायिक फोटोंतील ( ग्रूप फोटो ) मध्यवर्ति व्यक्ति व तिच्या भोंवतालचा परिवार यांच्यामध्यें जो प्रेमसंबंध असतो किंवा असला पाहिजे तोच संबंध हरिभाऊ व त्यांचें मित्रमंडळ यांच्यामध्यें कसा होता हें पुस्तकांतील कित्येक प्रसंगांवरून वाचकांच्या निदर्शनास आल्यावांचून रहाणार नाहीं. विनोदी किंवा थट्टेखोर अशीं पुष्कळ माणसें असतात. लोकांची थट्टा करण्याची संधि ते केव्हांही वायां जाऊं देत नाहींत; पण त्यांची कोणीं थट्टा केली, कीं लागलींच त्यांचें माथें भडकून जातें. थट्टा करणें आणि करून घेणें या दोन्ही बाबतींत सारखीच हौस दर्शविणारे असे गृहस्थ एकंदर थोडेच सांपडतात. "गुणी च गुणरागी च विरल: सरलो जन:" स्वतः गुणी असून लोकांच्या गुणांचेंही कौतुक करणारे असे सरळ मनाचे गृहस्थ थोडेच आढळतात. या थोडया गृहस्थांतच हरिभाऊंची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. अनेक व्यवसायांचे, अनेक स्थितींतले, अनेक मन:प्रकृतीचे असे त्यांना शेंकडों मित्र जोडतां आले ते या गुणामुळेंच होत. आणि या जोडलेल्या मित्रांपैकीं एखादा तुटून गेला असेंही त्यांच्या आयुष्यक्रमांत उदाहरण सांपडणार नाहीं याचेंही हेंच कारण होय.

आठवणी म्हटल्या म्हणजे त्या वर्ण्य मनुष्याशीं संलग्न असलेल्या किंबहुना प्रसंगानुरोधानें त्याच्याच तोंडून निघालेल्या उद्गारांशीं किंवा त्यानेंच प्रदर्शित केलेल्या विचारांशीं गटलेल्या असल्या पाहिजेत अशी त्यांच्या संबंधानें सर्व-साधारण कल्पना आहे; पण या मनुष्याचा स्वभाव व मनाची ठेवण यांचें यथार्थ चित्र दृष्टीपुढें उभें रहाण्यास त्याचे मित्र, परिचित व आप्तेष्ट यांच्याशीं संवाद-रूपानें त्याची झालेली देवाण–घेवाण ही समजणेंही जरूर आहे. प्रस्तुत पुस्तकांत आठवणींना मनोरंजक प्रसंगांची जोड दिली असल्यामुळें आपल्या मित्रपरिवाराचें स्वतःशीं तादात्म्य उत्पन्न करण्याची हरिभाऊंची हतोटी कशी प्रशंसनीय होती हें लक्ष्यांत येतें. ज्यांच्याशीं आपला कोणताच व्यवहार घडला नाहीं तीं सर्व माणसें आपल्याला चांगलींच दिसतात. त्यांच्यांतील गुणावगुण किंवा त्यांच्या स्वभावांतील खांचाखोंचा या त्यांच्याशीं व्यवहाराच्या निमित्तानें होणाऱ्या घसटी-च्या योगानेंच आपल्या लक्ष्यांत येतात. मनुष्याशीं आपला होणारा संवाद हा

अशा व्यवहारांपैकींच एक व्यवहार होय. मनुष्याचा एखादा सविस्तर वृत्तान्त किंवा त्याचें चरित्र वाचून जी आपल्याला त्याच्या आयुष्याची कल्पना येणार नाहीं ती त्याच्याशीं होणाऱ्या पांच-चार संवादप्रसंगांनीं होईल इतकें त्यांचें महत्त्व आहे. प्रस्तुत पुस्तकांतील बरेच प्रसंग संवादाच्या स्वरूपाचेच असल्यामुळें त्यांच्या योगानें हरिभाऊंच्या मनश्चर्येची यथार्थ कल्पना येण्यास चांगलें साहाय्य होणार आहे.

मनुष्याच्या चर्येचें सांगोपांग परिज्ञान होण्यास त्याच्या निरनिराळ्या बैठकींचे किंवा कैवारांचे (पोज) फोटो घ्यावे लागतात. असे फोटो घेतल्याशिवाय त्याच्या मुद्रेतील निरनिराळ्या छटा लक्ष्यांत येणें शक्य नसतें. आठवणी या मनुष्यांच्या मानसिक चर्येचें यथार्थ निदर्शन करून देण्यासंबंधांत फोटोंतील पोजचेंच काम करतात. अथवा आठवणी या मनुष्याच्या मनःपटांतील सूक्ष्म धागेदोरे स्पष्ट रीतीनें दाखविणाऱ्या दुर्बिणीच होत. विवेचनांत जसा दृष्टान्त त्याचप्रमाणें चरित्रांत आठवणी या होत. दृष्टान्तानें विवेचनांतील मुद्द्यांचें ज्याप्रमाणें विशदीकरण होतें त्याचप्रमाणें आठवणींनीं चरित्रांतील सकृद्दर्शनीं गूढ दिसणाऱ्या गोष्टींचें स्पष्टीकरण होतें. आठवणी या चरित्राशीं व चरित्रनायकाच्या स्वभावाशीं अगदीं लगटून असाव्या लागतात. तो नेहमीं दृष्टीसमोर राहिला पाहिजे अशीच आठवणी किंवा प्रसंग यांची घडण असणें जरूर असतें. प्रस्तुत पुस्तकांत या दोन्ही नियमांचें प्रतिपालन व्हावें अशी खबरदारी घेण्यांत आली आहे. हरिभाऊ व त्यांचें मित्रमंडळ हें त्यांच्या चरित्ररूप इमारतींतील एक मुख्य दालन होय. वाचकांना त्याचें दर्शन घडवून हरिभाऊंच्या प्रेमळ, सहानुभूतिपूर्ण व जनामिळाऊ स्वभावाची त्यांना यथार्थ कल्पना आणून देणें हाच या आठवणींचा व मनोरंजक प्रसंगांचा उद्देश आहे.

'आकारैरिंगितैर्गत्या चेष्टया भाषणेन च। नेत्रवक्त्रविकारैश्च ज्ञायतेंतर्गतं मनः।' या श्लोकांत मनुष्याचें अंतर्गत मन जाणण्याचीं जीं अनेक साधनें दिलीं आहेत त्यांत भाषण किंवा संवाद याचाही समावेश करण्यांत आला आहे. थट्टा, मस्करी, विनोद वगैरेंच्या योगानें मनुष्याच्या स्वभावाचे सूक्ष्म धागेदोरे उकलतां येऊन त्याच्या अंतर्गत मनाचा ठाव काढतां येतो. प्रस्तुत पुस्तकांत दिलेल्या बऱ्याच

आठवणी विनोदप्रचुर असल्या तरी त्यांवरून हरिभाऊ व त्यांचा मित्रपरिवार हे आपल्या सभोंवारचें वातावरण आनंदमय व रमणीय कसें राखीत याची वाचकांना कल्पना येणार आहे. या परिवारांतील मध्यवर्ति व्यक्ति हरिभाऊ ही असल्यामुळें असें वातावरण निर्माण करण्याचें मुख्य श्रेय त्यांनाच देणें जरूर आहे. त्यांच्या आयुष्यक्रमाच्या उन्नत भूमिकेचें प्रतिबिंब त्यांच्या मित्रमंडळावरही कसें पडत होतें याचें या आठवणींच्या योगानें कधीं स्पष्ट रीतीनें तर कधीं ध्वनिरूपानें योग्य निदर्शन होईल असा भरंवसा वाटतो. मनुष्याच्या जीवनचरित्राचें निरीक्षण करण्यासंबंधांत त्यानें आपला अंगीकृत व्यवसाय कोणत्या रीतीनें पार पाडला हें पहाणें जसें अवश्य असतें त्याप्रमाणेंच तो आपल्या फुरसतीचा काळ कसा घालवीत असे हेंही पहाणें जरूर असतें. किंबहुना हीं दोन्ही अंगें चरित्रकथन करण्याचे कामीं परस्परांस प्रपूरक अशींच असतात. प्रस्तुत आठवणी व मनोरंजक प्रसंग हीं मीं लिहिलेल्या हरिभाऊंच्या चरित्रास प्रपूरक म्हणूनच प्रकाशित करण्यांत येत आहेत. आणि हीं दोन्ही पुस्तकें वाचलीं म्हणजे हरिभाऊंच्या चरित्रासंबंधांतील साधारण सर्व माहिती वाचकांना व्हावी अशीच त्यांची संकल्पित योजना असल्याचें दिसून येईल.

प्रत्येक मित्रसमूहाच्या कोट्या, चेष्टा, विनोद व इतर मनोरंजक प्रसंग यांचें स्वरूप अर्थातच भिन्न भिन्न असतें. तरी पण भूतकाल दृष्टीपुढें उभा करून मनास प्रसन्नता आणणें हें कार्य सर्वसामान्यतः सर्वांकडूनच होतें. विवक्षित मित्रसमूहाच्या आठवणींना प्रायः स्थानिक म्हणूनच मर्यादित महत्त्व असतें. पण या आठवणींशीं किंवा प्रसंगांशीं एखाद्या प्रमुख किंवा लोकप्रिय माणसाचा संबंध आला म्हणजे त्याचें सार्वत्रिक रीतीनें कौतुक होऊं लागतें. किंबहुना अशा आठवणींस वाङ्मयाच्या एखाद्या दालनांतही स्थान मिळूं शकतें. टिटबिट्ससारख्या केवळ लोकरंजनार्थ चालविलेल्या नियतकालिकांत अनेक कोटया व मनोवेधक चुटके प्रसिद्ध होत असतात. व त्यामुळें मनाचें तात्पुरतें रंजनही होतें. पण त्या वाचून होतांच प्रायः विसरूनही जातात. कोणत्याही कोटीस, चेष्टेस, विनोदास अथवा प्रसंगास वाङ्मयांत प्रवेश मिळण्याला कांहीं तरी सजीव किंवा सुसंगत असा संदर्भ लागतो. त्याशिवाय त्यास चिरकालिक महत्त्व प्राप्त होत नाहीं.

ांवगन्ना असलेल्या अनेक स्थळांसंबंधांत कांहीं तरी मनोरंजक आख्यायिका या असतातच; पण त्या स्थलाचें ऐतिहासिक, धार्मिक किंवा औद्योगिक, कोणत्याही ाकारें कांहीं महत्त्व असल्याशिवाय त्या सार्वत्रिक होत नाहींत. त्याचप्रमाणें ाजकीय, सामाजिक किंवा धार्मिक वगैरे कोणत्याही शाखेचा इतिहास बनविण्याचे ामीं ज्यांच्या हातून लोकविख्यात अशी कांहीं कामगिरी झालेली असते त्यांनींच ेकलेल्या किंवा ऐकविलेल्या उद्गारांना सार्वत्रिक महत्त्व प्राप्त होतें. हरिभाऊंनीं ापल्या लेखनकार्यानें सामाजिक प्रगतीच्या इतिहासांत प्रमुख स्थान मिळविलें ाहे ही स्थिति निर्विवाद रीतीनें मान्य होण्यासारखी आहे. म्हणूनच त्यांच्या ारित्र्याचा व चालचर्येचा साक्षात्कार घडवून आणणाऱ्या या आठवणी वाचकांना ादरणीय व कौतुकावह वाटतील असा भरंवसा धरण्यास हरकत नाहीं.

मनुष्याचें आयुष्य सुखांत जाणें किंवा दुःखांत जाणें हें पुष्कळ अंशीं त्याच्या ानाची घटना व त्याच्या स्वभावाची ठेवण यांच्यावरच अवलंबून असतें. ुखाच्या सर्व साधनांची समृद्धि असूनही अनेक माणसें सदासर्वदा फिकिरींत ासलेलीं आढळतात, तर उलटपक्षीं या साधनांचा साधारण अभाव असतांही ेत्येक माणसें आनंदांत असलेलीं दिसून येतात. हरिभाऊंची एकंदर वृत्ति या ुसऱ्या वर्गाचेंच प्रत्यंतर पुरविणारी होती. त्यांची सांपत्तिक स्थिति केव्हांही ेशेष वाखाणण्यासारखी नव्हती. आनंदाश्रमानें त्यांना स्वास्थ्य मिळवून दिलें तें ागदीं मर्यादित स्वरूपाचें होतें. साधारण ओढघस्त स्थितींत आयुष्य कंठतां यावें वढीच त्याची किंमत होती. याशिवाय त्यांच्या कुटुंबांतला परिवार जुन्या ालीरितींचा व राहणीचा अभिमान बाळगणारा असल्यामुळें त्यांच्या प्रगमन-ील मतांचा कोंडमारा होण्याचे प्रसंग वारंवार उद्भवत. अशी मनाला साधारण ाउमेद करणारी परिस्थिति असतांही त्यांना आपली आनंदवृत्ति अखंड राखतां ाली. इतकी कीं, सर्वांना विश्रांति देणारें एक रम्य साधन असेंच आयुष्यांतील क श्रेष्ठ दर्जाचें स्थान त्यांना प्राप्त करून घेतां आलें. वैद्यकांत कफ, वात, ित्त अशा तीन प्रकारच्या प्रकृति मानण्यांत येतात. त्याप्रमाणेंच मनासंबंधांतही ानंद, दुःख व या दोन्हींनीं मिश्र अशा तीन प्रकारच्या प्रकृति असाव्यात असें ्णतां येण्यासारखें आहे. यांपैकीं हरिभाऊंच्या वांट्यास प्रायः आनंद-प्रकृतीच

आली होती ही गोष्ट त्यांच्या परिचितांच्या प्रत्ययास आल्यावांचून रहात नसे. प्रस्तुत आठवणींतून व मनोवेधक प्रसंगांतून त्यांच्या या आनंदी वृत्तीचें प्रतिबिंब सर्वत्र पडलें असल्याचें वाचकांना दिसून येईल.

प्रस्तुत आठवणी व प्रसंग यांतून, हरिभाऊंचा भोंवतालच्या माणसांनाही आनंद-दायक वाटणारा असा विनोद, त्यांची सरसता, त्यांच्या वागणुकींतील आकर्षकता, त्यांचें मित्रप्रेम, त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ति, त्यांचा अनेकविध अनुभव, भूतमात्राबद्दल त्यांना वाटणारी सहानुभूति व सदयता, त्यांचा साधेपणा, त्यांची प्रेमळ वृत्ति, त्यांची ज्ञानार्जनलालसा, मित्रांच्या करितां घस सोसण्याची त्यांच्या अंगीं असलेली तत्परता, या गुणांच्या योगानें आपला एक स्वतंत्र काळ व स्वतंत्र मंडळ निर्माण करण्याची त्यांनीं दाखविलेली हिंमत, वगैरे गुणांचें निदर्शन झालें असल्याचें दिसून येईल. याशिवाय हरिभाऊंचे चुलते, वडील, मातुश्री, त्यांच्या मातुलगृहांतील वडीलधारी मंडळी वगैरेंचींही प्रसंगानुरूप मनोरंजकता पावलेलीं अशीं शब्दचित्रें यांत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल. हरिभाऊंचा लेखन-व्यवसाय, त्यांतील गुणावगुण, त्यांच्या कादंबऱ्यांतील भूमिकांचें वैशिष्ट्य, प्रत्यक्ष व्यवहारांतील भूमिका घेऊन त्यांस आपल्या कल्पनेच्या कलमानें रम्यता किंवा अपूर्वता आणण्याची त्यांची हतोटी वगैरे विशेषही या आठवणींच्या वाचनानें वाचकांच्या ध्यानांत येण्यासारखे आहेत. समकालीन प्रमुख व्यक्तींसंबंधानें त्यांचें मत काय होतें याचाही यांत कित्येक ठिकाणीं मार्गदर्शक असा निर्देश झाल्याचें आढळून येईल. हरिभाऊंच्या वेळची सामाजिक चालचर्या व त्या चालचर्येंत नवीन विचारसरणीप्रमाणें रूपान्तर घडून येत असतां समाजांत उडालेली चळवळ किंवा चलबिचल यांच्याही इतिहासाची रूपरेखा दर्शविणाऱ्या कित्येक आठवणी यांत सांपडतील. अशा प्रकारें आजपर्यंत अप्रकाशित स्थितींत असलेल्या व या पुस्तकाच्या द्वारें प्रकाशित झाली नसती तर केव्हांही प्रकाशित होण्याचा संभव नसलेल्या अशा मनोरंजक व उपयुक्त माहितीचा संग्रह वाचकांना करतां यावा याच दृष्टीनें हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे.

या आठवणी लिहून त्या पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याचें सुमारें पांच सहा आठवड्यांपूर्वी ठरलें व त्याप्रमाणें येथील 'विजय' प्रेसचे चालक व मालक

रा० अ. स. गोखले यांच्याजवळ मीं आपली इच्छा प्रदर्शित केली. त्यानंतर हस्तलिखित जसजसें तयार होऊं लागलें तसतसें छापून व मागून त्यांत कित्येक ठिकाणीं नवीन मजकूर घालण्याचा वेळोवेळीं प्रसंग आला तरी तो बिनतक्रार रीतीनें किंबहुना संतोषानें पार पाडून त्यांनीं हें पुस्तक अल्पावधींत इतक्या सुबक रीतीनें तयार करून दिलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे.

डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
ता. १५ माहे एप्रिल सन १९३१

बा. मा. आंबेकर.

# आठवणींची सूचि

महत्त्वाच्या आठवणींची व व्यक्तींची सूचि याखालीं दिली आहे. सूचींतील आंकडे आठवणींचे दिले आहेत—


**आनंदाश्रम**—५८,७९,८०,८१,१०२
आश्रमांतील संन्यासी ८३ पासून ९१
आश्रमांतील क्लब १०२

**रावबहादुर**—९९, १०० १०१

**हरिभाऊ**—विनोद–१,२, ३,४,७,८, १२, १३, १८, २२, २३, २४, २५, २६, २७,३३,४१,४३,१०६ १२५, १२६, १४७, १६२, १६४, १७८, १८१, १८२, १८३, १८५, १८८, १८९, १९२, १९६, १९७

**हरिभाऊंच्या मित्रमंडळींचा विनोद**—
११, १७, ३०, ३१, ४६, ४९, ५२, १६३, १६६, १६८, १७१, १७७, १८०, १९८

**हरिभाऊंचे अनुभव**—५,६,९,१०, २८, २९, ३२, ३८, ३९, ४०, ४५, ५०, ९७, १२७,१२८,१३३,१६१, १६५, १८७, १९९, २०२, २०६, २०७, २०८, २०९, २१५

**हरिभाऊंच्या मित्रांचे अनुभव** —४२, ४९, ५३, ५८, ६१, ९५, ९६, १३०,१३१,१३२,१६०, २१२

**हरिभाऊंचे आप्त**—
महादेव चिमणाजी—६४, ६५,७६, ७८ (त्यांची प्राप्ति), ७९, ८१, ८२, ९९ १०१
वडलांच्या मातुश्री—१२३
वडलांच्या मावशी—१४८
सासरे व आजेसासरे—१२४
मुलगी (ताई)—६२, १०७ पासून १११,११७,११८,१२१,१२२

**आजोळ**—
दोन मामा व आजे—६३,७३,७४,
आजी व आजे—७०,७१,७२,७५,
हरिभाऊंच्या मातुश्री—६६, ६७, ६८, ६९
पहिलें लग्न १०३, १०४, १०५.
पहिलें कुटुंब ११६, ११९.

**हरिभाऊंची रहाणी**—१४४, १४५, १४६, १९०.
दृष्टान्तावरील श्रद्धा—१४९ पासून १५४, १५६.

**आठवणींत आलेल्या प्रमुख व्यक्ति**—आपटे (वा. गो.) १७४
अंजनगांवकर (रा. ब.) १३५

कानिटकर (गो. बा.) ११३, १३५
„ (काशीताई) ११४, २३२
कुमठेकर (तात्यासाहेब) १७
गोखले (कृ. के.) २०१
चंदावरकर (सर नारायण) १५८
जोशी (माधवराव) १९
दाते (श्रीधर विठ्ठल) १४
दीक्षित (हरि सीताराम) १०, २४, २५, २६, २७
देवधर (गोपाळराव) ८, ५२
देवधर (सी. ग.) ११४
परांजपे (कृ. पु) १३८
पाटणकर (भाऊसाहेब) ११३
पारसनीस (रा. ब.) २३
महाजनी (रा. ब.) ७५, ७६, २१९
मेथा (सर फेरोजशहा) १५७
रमाबाई (पंडिता) ६५, ११२
रानडे (महादेव गोविंद) ११५, १४२, १४३
रानडे (शं. मो.) २१९
वाकनीस (दि. ह) ११, ३०, १८६
वाड (रा.ब.गणेश चिमणाजी) १०२
साने (का. ना.) २१९
हरिभाऊंच्या कादंबऱ्या—
शनीच्या पाराजवळील क्लब २१६
वस्तुसृष्टींतील व्यक्ति—२१७, २२३, २२४, २२५,
लेखनांतील कांहीं दोषः—२२७, २२८,
पर्यवसानास विलंब २२९,
पात्रांशीं तादात्म्य ५४, २३२,
'आनंद' मधील गोष्ट १७५, १७६.



कै० हरि नारायण आपटे

# हरि नारायण आपटे.

## कांहीं आठवणी
## व
## मनोरंजक प्रसंग.

## १

[१] **सारेच एका माळेचे मणी !**

हरिभाऊ विनोदी असत; पण त्यांचा विनोद प्रो० भानु यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे मनोद्वेजक नसून मनोरंजक असे. ज्याला अनुलक्षून ते विनोद करीत त्याचीही त्यामुळें करमणूक व्हावी अशी-च त्यांच्या विनोदांत खुमारी असे ! एका ऋषिपंचमीच्या दिवशीं त्यांचे एक स्नेही आपल्या पत्नीकरितां अळूच्या चार काडया, भोपळ्याची एक फांक, व पडवळाचे तुकडे असे कांहीं जिन्नस घेऊन चालले होते. तें पाहून हरिभाऊ त्यांना म्हणाले, "हें हो काय चालविलें आहे ? बायकांना आज बैलाच्या कष्टाचे पदार्थ चालत नाहींत ! आणि आपण हे स्वतःच वाहून नेतां, तेव्हां हें कसें जमणार ?" यावर त्या स्नेह्यांनीं उत्तर दिलें, "यासंबंधांत आपल्या देशांत निवडानिवड करण्याची सोय नाहीं ! सारेच एका माळेचे मणी !" आपण केले-ल्या विनोदास हें त्यानें दिलेलें समर्पक उत्तर ऐकून हरिभाऊ अर्थातच खूष झाले !

× × ×

[२] **आरसा फोडून टाका!**

गाढव द्विपाद असो किंवा चतुष्पाद असो, त्याचें दर्शन प्रायः कोणासही तिरस्करणीय वाटतें. हरिभाऊंची मात्र यासंबंधांतील स्थिति अगदीं चमत्कारिक असे. त्यांना दोन्ही प्रकारच्या गाढवांबद्दल अनुकंपा व सहानुभूतिच वाटत असे. "या गाढवाचें मुख पहाणें नको" असें कोणीं म्हटलें तर हरिभाऊंना तें अर्थातच निर्दयपणाचें वाटे. "आपल्या घरचा आरसा फोडून टाका म्हणजे आपल्याला गाढवाचें दर्शन होण्याची भीति रहाणार नाहीं!" असें विनोदी उत्तर देऊन ते अशा मनुष्याचा सौम्य रीतीनें निषेधच करीत!

एखादें गाढव दिसलें कीं, त्याच्याकडे पाहून, "ईश्वरानें काय प्राणी निर्माण केला आहे पहा! बिचाऱ्याच्या अंगीं किती तरी सद्‌गुण आहेत तरी ज्याचा त्याचा अनादर व तिरस्कार सहन करण्याचें बेट्याच्या नशिबीं आलें आहे!" असे त्यांच्या तोंडून पुष्कळ वेळां उद्गार निघत.

x x x

[३] **गाढवमाहात्म्य!**

"गाढव ज्या ठिकाणीं एकदां घसरून पडला किंवा ठेंचाळला, कीं त्या ठिकाणाकडून तो कधीं जावयाचा नाहीं! गाढव नवें (गढूळ व अस्वच्छ) पाणी कधींही प्यावयाचा नाहीं! गाढव कुठेंही लोळलें तरी कोरडी जागा पाहून लोळेल. चिखलवट, दमट अशा जागीं गाढवास लोळतांना कोणीं पाहिलें आहे काय? केशाच्छादित प्राण्यांमध्यें त्याच्याइतका स्वच्छ प्राणी दुसरा कोणी नाहीं! त्याच्या अंगावर पिसू, गोमाशी किंवा गोचीड कधींही असावयाची नाहीं. गाढव आपल्या धन्याला वासावरून दुरून ओळखतें! आणि धन्यानें त्याला

कसेंही वागविलें तरी त्याजवर तें प्रेम करतें. गाढवाची स्मरणशक्ति फारच विलक्षण आहे. एकदां चाललेला रस्ता तें कधींही विसरत नाहीं. तीक्ष्ण दृष्टि, तल्लख घ्राणेंद्रिय व तिखट कर्णेंद्रिय हे त्याचे विशेष गुण होत. इ० सन १८८९ सालीं पॅरिसमध्यें एका प्रदर्शनाच्या वेळीं एका गृहस्थानें गाढवाची सर्कस करून दाखविली." वगैरे गाढवाबद्दल जिव्हाळा उत्पन्न करणारी हकीगतही ते पुष्कळ वेळां सांगत असत !

x x x

[४] **बरें तर करा आपले पाय पुढें !**

एकदां हरिभाऊंचें डोकें दुखत होतें. त्यांनीं किरकोळ उपचार बरेच करून पाहिले; पण डोकें कांहीं राहीना. तेव्हां जवळच एक समवयस्क स्नेही होते. त्यांना ते म्हणाले, "या डोक्यानें बुवा आज अगदीं भंडावून सोडलें!" हे हरिभाऊंचेच स्नेही होते. तेव्हां ते विनोदानें म्हणाले, "गाढवाच्या पायां पडलांत, कीं डोकें ताबड-तोब राहील!" त्याबरोबर हरिभाऊंनीं उत्तर केलें, "वा:, काय छान औषध सांगितलेंत. बरें तर करा आपले पाय पुढें, म्हणजे त्याच्या-वरच डोकें ठेवतों!"

x x x

[५] **एकदम दिगंबर झाले !**

हरिभाऊंच्या येथें एक मद्रासी पाहुणे आले. त्यांची स्नानाची वेळ झाली तेव्हां हरिभाऊंनीं त्यांना आनंदाश्रमांतील हौद दाखविला. हौदावर येऊन मद्रासी रूढीप्रमाणें ते गृहस्थ एकदम दिगंबर झाले व पाण्याच्या बादल्या अंगावर घेऊं लागले! ती जागा चव्हाट्याची व घरांतील बायका-मुलांच्या वागाऱ्याची! हरिभाऊंनीं हा प्रकार पहातांच त्या

गृहस्थास नळी असलेल्या बंदिस्त जागेंत ताबडतोब पोहोंचविलें व आंतून कडी लावून घेऊन राहिलेला स्नानविधि उरकून घेण्यास सांगितलें!

x x x

[६] **अजागळाचें स्वर्गसुख!**

त्यांच्या येथें एकदां एका वेडगळ रावबहादुरांचे अजागळ चिरंजीव पाहुणे म्हणून आले. हरिभाऊंच्या येथें माणसांची सारखी रहदारी चाले. त्या माणसांशीं, हे रावबहादुरांचे चिरंजीव म्हणून, हरिभाऊंनीं आपली ओळख करून द्यावी, अशी यांची फार इच्छा असे. त्याप्रमाणें हरिभाऊ त्यांचा आल्या गेल्या माणसांशीं परिचयही करून देत; पण त्याबरोबरच आपल्याकडे आलेला माणूस अमक्या संस्थानचा दिवाण आहे, किंवा हायकोर्टाचा न्यायाधीश आहे, मुंबईचा दरमहा पांच हजार रुपये मिळविणारा सॉलिसिटर आहे असें सांगून त्याची या पाहुण्याशीं ओळख करून देत! ओळख करून देण्याच्या प्रत्येक प्रसंगीं हे पाहुणे आश्चर्यानें आपली जीभ बाहेर काढून प्रत्येक माणसास खडी ताजीम देत व लवून नमस्कार करीत! या पाहुण्यांचा येथें बरेच दिवस मुक्काम होता. त्या काळांत पुष्कळांना यांची चांगली करमणूक होत असे. हरिभाऊंनीं ज्यांची संस्थानचे दिवाण म्हणून ओळख करून दिली त्यांची संख्या संस्थानांच्या संख्येपेक्षांही अधिक भरली असेल किंवा हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून ज्यांच्याशीं परिचय करून दिला त्यांची संख्या हायकोर्टांतील न्यायमूर्तींच्या दसपट भरली असेल! पण ही वस्तुस्थिति या वेड्याच्या लक्षांत कोठून येणार? बड्या लोकांची वर्दळ सारखी चालू आहे अशा ठिकाणीं आपला मुक्काम झाला यांतच तो स्वर्गसुख अनुभवीत होता!

x x x

[७] **गोष्टी सांगण्याचा धंदा !**

" हरिभाऊ, तुम्हाला एक गोष्ट सांगतों ती ऐका " असें कांहीं हकीकत सांगण्याच्या भरांत कोणी गृहस्थ हरिभाऊंस म्हणाला कीं, ताबडतोब ते त्याला म्हणत, " हें पहा, दुसरें कांहीं सांगा. पण गोष्ट सांगण्याच्या भरीस पडूं नका. कारण गोष्टी सांगण्याचा धंदा मी आज जन्मभर करीत आलों आहें ! "

x x x

[८] **सेवासदन आणि सदनसेवा !**

सेवासदनास अगदीं अल्पारंभापासून रा० गोपाळराव देवधर यांनीं उन्नत अवस्था आणली हें पाहून हरिभाऊ गोपाळराव देवधरांच्या संबंधानें नेहमीं प्रशंसापूर्वक उद्गार काढीत. " सेवासदनाची तुम्हीं नीट जुळणी बसविली हें ठीक आहे; पण त्यामुळें बायकांचें सदन-सेवेकडे मात्र दुर्लक्ष होतां कामा नये अशी खबरदारी घ्या ! " असें ते त्यांना विनोदानें म्हणत. गोपाळराव देवधरांची ते कित्येक वेळां चेष्टाही करीत; पण त्याबरोबरच " चेष्टा करणारे काय पुष्कळ मिळतात, पण खरा काम करणारा निघणें दुर्मिळ असतें " असें त्यांच्यासंबंधानें तें नेहमीं गौरवपर बोलत असत.

x x x

[९] **आज तुमच्यावरही कुरघोडी झाली !**

हरिभाऊ व त्यांचे एक स्नेही यांना एकदां दुसऱ्या एका स्नेह्या-कडे जेवणाचें निमंत्रण आलें. त्याप्रमाणें हे दोघेही त्या स्नेह्याकडे जेवावयास गेले. या स्नेह्यांनीं नेहमींच्या संप्रदायाप्रमाणें एक एक पैसा भोजनदक्षिणा दिली; पण हरिभाऊ ती घेईनात ! " आमच्यासारखे ब्राह्मण तुम्हांला मिळाले असतां तुम्ही एकच पैसा दक्षिणा द्यावी हें

कांहीं चांगलें नाहीं. आम्हाला तुम्हीं निदान पावली तरी दिली पाहिजे!" असें ते त्यांना म्हणाले. सगळाच घरोब्याचा प्रकार, तेव्हां त्या गृहस्थांनीं हरिभाऊ व त्यांचे स्नेही यांना पावली पावली दक्षिणा दिली. वाघाची शिकार करणारा वाघाचें कातडें जसें शिकारीचें स्मारक म्हणून जपून ठेवतो त्याप्रमाणें जन्मांत दक्षिणा म्हणून मिळालेली ही पावली जपून ठेवावयाची, असा हरिभाऊंचा संकल्प ठरला! त्याप्रमाणें त्यांनीं ती कडुसरीस खोंचली आणि ते थोडे आडवे झाले. कांहीं वेळानें तेथून उठून ते घरीं गेले आणि पहातात तों कडुसरीस पावली नाहीं! झालें, त्यांच्या मनाची अगदीं तळमळ उडून गेली! एरव्हीं चार रुपयांचीही फिकीर न बाळगणाऱ्या हरिभाऊंना या पावलीबद्दल फार हळहळ वाटूं लागली. जे स्नेही त्यांच्याबरोबर जेवावयास गेले होते त्यांनींच ही घेतली असावी असा कयास बांधून ते त्यांच्याकडे गेले व पावली देण्याविषयीं त्यांची विनंति करूं लागले. तो स्नेही अर्थातच पत्ता लागूं देईना. पण तो त्यांना एवढें मात्र म्हणाला कीं, "लोकांची खोडी करण्यांत तुमचा हातखंडा असतो. आज तुमच्यावरही कुरघोडी करणारा एक निघाला!" शेवटीं बराच वेळ विनोद चालून हरवलेली पावली हरिभाऊंस परत मिळाली; तेव्हां त्यांचा जीव खालीं पडला!

× × ×

[१०]: **कारकुनाचें वाङ्मय-विशारदत्व!**

एकदां हरिभाऊ दीक्षित यांना हरिभाऊंनीं कांहीं बाबतीसंबंधानें मुंबई-स पत्र पाठविलें. दीक्षितांचें उत्तर उलट टपालीं यावयाचें तें आलें नाहीं. "फुरसत न मिळाल्यामुळें उत्तर पाठवितां आलें नाहीं, एक दोन दिवसांनीं खुलासेवार पत्र लिहीन." असें हरिभाऊंना कळविण्यास

त्यांनीं आपल्या कारकुनाला सांगितलें. कारकुनाला वाटलें कीं, हरिभाऊंसारख्या वाङ्मयविशारदास पत्र लिहावयाचें तेव्हां तें थोडें भारदस्त भाषेंत लिहिलेलें चांगलें ! त्यानें उत्तरांत लिहिलें कीं, "दीक्षितसाहेबांना कामातिरेकामुळें फुरसत झाली नाहीं. तरी ते आपल्याला एक दोन दिवसांत उत्तर पाठविणार आहेत." यावर कांहीं दिवसांनीं हरिभाऊ व दीक्षित यांची गांठ पडली; तेव्हां कारकुनाच्या उत्तरांतील 'कामातिरेक' हा शब्द त्यांनीं दीक्षितांना दाखविला, तेव्हां एकच हंशा पिकला !

× × ×

[११] **पण पायाला येतो ना !**

हरिभाऊंचे एक स्नेही रा० दिनकर हरि ऊर्फ अण्णा वाकनीस हे एका मित्रासमवेत एका परिचिताच्या येथे लग्नाला गेले. लग्न लावून परत जावयास निघतात तों त्या स्नेह्यांचा जोडा सांपडेना ! थोडयाच वेळांत ते स्नेही म्हणाले, "हा पाहिला, सांपडला बुवा !" अण्णा वाकनीस त्यांना म्हणाले, "लवकर सांपडला हें चांगलें झालें. पण पायाला येतोना !" हा प्रसंग हरिभाऊंना समजला तेव्हां त्यांना फारच मौज वाटली. इतकी कीं, विनोदाचा एक मासलेवाईक प्रसंग म्हणून ते त्याचा वारंवार प्रशंसापूर्वक निर्देश करीत !

× × ×

[१२] **कुत्र्याची विलक्षण खोड !**

हरिभाऊंच्याजवळ एक अस्सल बुल जातीचा कुत्रा होता. हरिभाऊंपासून तो आपण घेऊन जावा अशी गोपाळराव गोखल्यांना इच्छा झाली आणि त्याप्रमाणें त्यांनीं तो हरिभाऊंजवळ मागितला. तेव्हां हरिभाऊ म्हणाले, "कुत्रा द्यायला माझी कांहीं हरकत नाहीं; पण त्याला एक

खोड आहे. डोक्यावर बोचकें घेऊन जातांना कोणीं दिसला, कीं त्याला तो चावलाच म्हणून समजावें!" हें ऐकल्याबरोबर गोपाळराव म्हणाले, "मग नकोरे बुवा आपल्याला! मी स्टेशनजवळ राहतों. माझ्या बंगल्यावरून शेंकडों माणसें डोक्यावर गांठोडीं घेऊन जातात. कुत्र्याला ही खोड असेल तर रोज शेंकडों कलागती उत्पन्न व्हावयाच्या!" अशी शकल लढवून हरिभाऊंनीं कुत्र्याचें स्थलांतर होऊं दिलें नाहीं!

x x x

[१३] **पायावर धोंडा पाडून कोण घेतो!**

"त्यांनीं माझ्या कानांत सांगितलें" असें कोणी म्हणाला कीं, "मग तो तुमच्यापासून बऱ्याच अंतरावर उभा असेल!" असें हरिभाऊ म्हणावयाचे किंवा कोणी "तुमच्या पायां पडतों," असें म्हणाला कीं, "तेवढें करूं नका; विनाकारण पायांवर धोंडा पाडून कोण घेतो?" असें हरिभाऊंनीं उत्तर करावयाचें! हे चुटके त्यांच्यासंबंधांत नित्यांतलेच झाले होते.

x x x

[१४] **सुधारकाचें पिल्लूं!**

श्रीधर विठ्ठल दाते हे फार अचकट विचकट बोलणारे प्राणी होते. चार शब्दांचें वाक्य असलें कीं, तितकेच अपशब्द त्याच्या भरतीला यावयाचे! असा त्यांच्या भाषणाचा थाट असे. एका प्रसंगीं विचकट बोलण्यांत त्यांच्यावरही कडी करून हरिभाऊंनीं त्यांना गप्प बसविलें! तेव्हांपासून हरिभाऊंना पाहिलें कीं, हे विख्यात गृहस्थ बरेच नरम पडत असत. त्या वेळच्या सुधारक मंडळींत हरिभाऊ सर्वांत लहान असत. यामुळें श्रीधर विठ्ठल त्यांना सुधारकांचें पिल्लूं असें म्हणत असत!

x x x

[१५] **खाचाखोचा समजत नाहींत!**

येथील एक गृहस्थ बंगाली भाषेचे व्यासंगी म्हणून प्रसिद्धि पावले होते. त्यांनीं बंगाली लहानमोठ्या पुस्तकांचीं बरींच भाषांतरें केलीं. एकदां हे गृहस्थ हरिभाऊंच्या येथें बसले असतां हरिभाऊंनीं मुद्दामच एक बंगाली पुस्तक काढलें आणि तें वाचण्यास सुरुवात केली. मध्येंच थांबून त्यांनीं त्या गृहस्थास म्हटलें, “ किती बहारीचा भाग आहे हा ! आपल्या लक्षांत आलें असेलच.” “ होय, लक्षांत आलें ” असें म्हणावें तर ‘सांगा पाहूं काय समजलें तें’ असें हरिभाऊ विचारणार, ही त्यांना भीति असल्यामुळें “ भाषेच्या इतक्या खाचाखोचा समजण्याइतकें मला बंगाली येत नाहीं ” असें त्या गृहस्थांना प्रांजलपणें कबूल करणें भाग पडलें !

x x x

[१६] **भाषांतराचें गौडबंगाल!**

“ बंगालीचें यांचें ज्ञान इतकें जेमतेम आहे तर हे बंगाली पुस्तकांचीं भाषांतरें कशीं करतात ?” असें हे गृहस्थ गेल्यानंतर हरिभाऊंच्या एका स्नेह्यांनीं विचारलें. तेव्हां हरिभाऊ म्हणाले, “ बंगालीचीं भाषांतरें हिंदींत होतात त्यावरूनच हे आपलीं पुस्तकें तयार करतात. मुखपृष्ठावर आणि जाहिरातींतून मात्र हे ‘मूळ बंगालीवरून’ असें बेधडक लिहितात ! एकदां एका बंगाली पुस्तकाचें हिंदींत भाषांतर सुरू झालें तेव्हां यांनींही तें इकडे मराठींत सुरू केलें. कांहीं अडथळा येऊन तिकडलें हिंदींतील भाषांतर थांबलें, त्याबरोबर यांचेंही इकडील मराठी पुस्तक गारठलें ! पुस्तक अमुक तारखेच्या आंत प्रसिद्ध होईल अशी जाहिरात दिली असतांही अखेर तें पुस्तक अर्धवटच राहिलें ! असाही या गृहस्थाचा उडालेला मासला हरिभाऊ सांगत.

x x x

[१७] **सदाशिवभटजी!**

एकदां त्यांचे एक स्नेही कौन्सिल हॉलमध्यें एक परिषद् भरली होती त्या परिषदेस गेले. परिषद् संपल्यानंतर या स्नेह्यांना कै० तात्यासाहेब कुमठेकर भेटले व ते त्यांना 'आपण एकाच गाडींत जाऊं' असें म्हणाले. दोघेही गाडींत बसले. आपण नीट बसा, असें त्या स्नेह्यांना तात्यासाहेबांनीं सांगितलें. त्यावर ते गृहस्थ म्हणाले, " नीट बसतों, पण मला सदाशिवभटजीची आठवण झाली !" हें सदाशिवभटजींचें प्रकरण काय आहे ? असें तात्यासाहेबांनीं विचारल्यावरून ते गृहस्थ म्हणाले, " आम्हीं चार स्नेह्यांनीं एकदां उसाचा रस घेतला. सर्व मंडळी गृहस्थपेशाची असल्यामुळें रस बेताचाच घेतला होता. आमची रसपानाला सुरुवात होणार इतक्यांत तेथें सदाशिवभटजी आले. तेव्हां त्यांच्यापासूनच आम्हांला आरंभ करावा लागला. सदाशिवभटजींनीं मांडी-बिंडी घालून दोन फुलपात्रें रस झोंकून दिला ! तेव्हां हे भटजी आतां सगळ्या रसाचा फन्ना उडविणार अशी भीति वाटून आमच्यापैकीं शक्कलवंत होता तो म्हणाला, " सदाशिवभटजी, संकोच करावयाचें कांहीं कारण नाहीं ! पावली वर्गणी द्यावयाची आहे; तेव्हां आपल्याला पाहिजे तितका रस प्या." त्याबरोबर सदाशिवभटजी हात आखडून बाजूला झाले ! आपण मला नीट बसा, असें म्हणालां त्यावरून 'कांहीं भीति बाळगूं नका, गाडीचें निमेनिम भाडें आपल्या दोघांत द्यावयाचें आहे' असें सुचविण्याचा तर आपला आशय नाहीं ना ? असा मला संशय येऊन सदाशिवभटजीप्रमाणेंच माझी स्थिति झाली !" हें ऐकून तात्यासाहेब हंसले व मंडळींत गेल्याबरोबर त्यांनीं हा प्रसंग वर्णन केला. हरिभाऊंना त्याची फारच मौज वाटली. कोणींही आचरटपणा किंवा गैरधोरणीपणा दाखविला, कीं हरिभाऊ त्याला सदाशिवभटजीची आठवण करून देत असत !

# २

[१८] **नोकरी सोडली कीं नोकरीनें सोडलें!**

हरिभाऊंच्या एका स्नेह्याची सरकारी नोकरी सुटली. देशसेवेचें आपल्याला वेड असल्यामुळें आपण सरकारी नोकरीवर तिलांजलि दिली, असें हे गृहस्थ अर्थातच आपल्या परिचितांना भासवूं लागले. हें समजल्यानंतर हरिभाऊ म्हणाले, "सरकार सेवा करूं देईना, तेव्हां हे देशसेवेला लागले!"

× × ×

[१९] **मित्र-मंडळ!**

चाळीस वर्षांपूर्वी संमतिवयाच्या कायद्याची चळवळ झाली, त्यावेळीं सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारें 'मित्र-मंडळ' नांवाचें मंडळ निघालें. या मंडळांत रा० हरिभाऊ, प्रो०पानसे, माधवराव जोशी, प्रो० भानु, रा० आत्मारामपंत नूलकर वगैरे गृहस्थ होते. वरील कायद्याबद्दल निषेध व नापसंती प्रदर्शित करण्याकरितां तुळशीबागेंत सनातनधर्मीय लोकांची सभा भरली. त्या वेळेस या सभेबद्दल, सभेंतल्या सभेंत निषेध दर्शविण्यासाठीं, ही सर्व मंडळी हजर होती. आज ही गोष्ट अगदीं सामान्य अशी वाटली तरी चाळीस वर्षांपूर्वी तिला अर्थातच महत्त्व प्राप्त झालें होतें.

× × ×

[२०] **पात्रांचा एकच गोतवळा!**

आपल्या कादंबऱ्यांतील कथानकांचा एकच गोतवळा करण्याची कल्पना हरिभाऊंना एमिल झोलावरून सुचली. त्याप्रमाणें यमुना,

गणपतराव, गोदावरी, यशवंतराव, विष्णुपंत, गण्या वगैरे पात्रें एकाहून अधिक कादंबऱ्यांतून आलेलीं दिसतात. सद्यःकालीन समाजाच्या घडामोडींवरच त्यांनीं आपलीं पुस्तकें लिहिलीं असल्यामुळें अशा पात्रांच्या योगानें सामाजिक सुधारणेचा विकास कसकसा होत गेला किंवा होत गेला पाहिजे हें त्यांना चांगल्या रीतीनें दाखवितां आलें.

× × ×

[२१] **वेणीधरबुवांचें कीर्तन !**

" मधली स्थिति " या कादंबरींत वेश्यागृह व वेश्यांची दिनचर्या यांसंबंधानें हरिभाऊंनीं जो हुबेहुब देखावा उत्पन्न केला आहे, तो पाहून वेश्यांच्या येथें नेहमीं जाणारा येणारा हा मनुष्य असला पाहिजे अशी पुष्कळांची समजूत झाली होती. कृष्णाबाई कोल्हापूरकरीण या वेश्येनेंही अशीच आपली समजूत असल्याचें बोलून दाखविलें होतें. कादंबरीच्या कर्त्याचें नांव अविज्ञात होतें तोंपर्यंतच या समजुतीचा संचार चालू होता. कर्त्याचें नांव प्रकाशित झाल्यानंतर ती समजूत अर्थातच नाहींशी झाली. मधल्या स्थितींत 'वेणीधर'बुवांच्या कीर्तनाचें वर्णन देतांना हरिभाऊंनीं " डग्गा आणि बाह्या " असें म्हटलें आहे. वस्तुतः डग्यालाच बाह्या म्हणण्याचा प्रघात आहे. डग्गा व तबला म्हणण्याऐवजीं हरिभाऊंनीं वरील समानार्थक शब्द योजले. ही चूक कृष्णाबाई कोल्हापूरकरणीच्या लक्षांत आली. तेव्हां पुस्तककर्ता या फंदांतला नसला पाहिजे अशी त्या बाईचीही खात्री झाली.

× × ×

[२२] **कुचाळखोरांना पदवीदान !**

गांवांतील आहेत नाहींत त्या सर्व बातम्या काढून त्यांवर कुचाळक्या करीत बसणें हरिभाऊंच्या स्वभावास केव्हांही आवडत नसे. त्यांच्या

मित्र-परिवारांत अशीं दोन माणसें होतीं. त्यांपैकीं एक थोडे सरस होते. त्यांना हरिभाऊ डी. एस्‌सी. ( Doctor of Scandals ) व दुसऱ्या गृहस्थांस बी. एस्‌सी. ( Bachelor of Scandals ) म्हणत असत !

× × ×

[२३] **एक आगंतुक आणले आहेत !**

रा० ब० पारसनीस यांच्या मुलीचें येथें कुरुंदवाडकरांच्या वाड्यांत लग्न झालें. त्या वेळीं गांवांतील बऱ्याच प्रतिष्ठित मंडळींना भोजनास बोलाविलें होतें. हरिभाऊही त्यांत होते. ते रा० ब० पारसनीस यांच्या येथें जात असतां मार्गांत त्यांना एक स्नेही भेटले. हे स्नेही पारसनिसांचे जवळचे आप्त होते. त्यांनाही भोजनाला निमंत्रण असेलच, अशी कल्पना होऊन हरिभाऊ त्यांना म्हणाले, " चला पारसनिसांच्याकडे. आपल्याला यावयाचें असेलच." " मला बोलावणें नाहीं " असें त्या गृहस्थांनीं उत्तर दिलें; तेव्हां हरिभाऊंना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " चला, नाहीं बोलावणं तर नाहीं. ज्या ठिकाणीं चार स्नेही भेटून मौजेंत काल जाण्याचा संभव आहे तेथें बिनबोलावण्यानेंही जाण्याचा प्रसंग आला तरी तो व्यर्थ दवडूं नये ! " हो ना करतां हे गृहस्थ हरिभाऊंबरोबर पारसनिसांच्या जानवस घरीं गेले. तेथें गेल्यानंतर हरिभाऊ पारसनिसांना म्हणाले, " एक आगंतुक आणले आहेत, त्यांची सोय कराल तर पहा " असें म्हणून त्यांनीं त्या गृहस्थांना पारसनिसांच्यापुढें उभें केलें. त्यांना पहातांच पारसनीस अर्थातच थोडे ओशाळले आणि " यांना बोलाविण्याचें खरोखरच विस्मरणानें राहिलें " असें दिलगिरीदर्शक स्वरांत म्हणाले. हरिभाऊंनीं उत्तर केलें, " बोलावण्याला विसरलांत तसेंच त्यांचें आतां योग्य आदरातिथ्य करण्यास विसरूं नका म्हणजे झालें ! "

× × ×

[२४] **या रस्त्याला साप फार असतात!**

व्हिलेपार्ल्यास हरिभाऊ दीक्षितांच्या येथें हरिभाऊ नेहमीं जात. एका प्रसंगीं त्यांच्याबरोबर एक स्नेहीही होते. स्टेशनवरून पार्ल्यास जाण्यास त्या वेळीं रस्ता चांगला नव्हता. त्यांतून स्टेशनवरून निघतांनाच अंधार पडूं लागला होता. हरिभाऊ दीक्षित यांच्या बंगल्याकडे जाण्यास हे दोघेजण मार्गस्थ झाले तसतसा अंधारही आपला मार्ग क्रमूं लागून अधिक अधिक गर्द होऊं लागला! हरिभाऊंना एका डोळ्यानें दिसत नव्हतें. तेव्हां हा मार्ग अर्ध्या गतीनेंच आक्रमणें भाग पडलें. मार्गांत हरिभाऊंचें बोलणें सारखें चालू होतें. या रस्त्याला साप फार असतात आणि ते अधिक विषारीही असतात अशा हकीगती ते सांगूं लागले. तेव्हां त्यांचे स्नेही म्हणाले, "आधीं अंधार पडलेला, त्यांतून तुम्हांला दिसत नसल्यामुळें तुमचा आधार काय तो मीच! तेव्हां इतर कांहीं गोष्टी बोलण्याचें सोडून देऊन असल्या भय उत्पन्न करणाऱ्या गोष्टी तुम्ही सांगत सुटला याला काय म्हणावें?" या गृहस्थांना सापाची फार भीति वाटत होती हें हरिभाऊंना ठाऊक असल्यामुळें त्यांच्या त्या गोष्टींना अधिकच रंग चढत चालला! शेवटीं अशाच गोष्टी तुम्हांला सांगावयाच्या असतील तर मी परत स्टेशनवर जातों. तुम्ही आपले एकटेच दीक्षितांच्या येथें जा!" असें ते गृहस्थ निकरावर येऊन म्हणाले. तेव्हां हरिभाऊ हंसले आणि "बरं बुवा! आतां नाहीं त्या गोष्टी सांगत" असें म्हणून त्या घाबरलेल्या मित्राच्या आधारानें ते पुढें चालूं लागले! आपल्या खोडकर स्वभावानें हरिभाऊंनीं हाही खडतर प्रसंग संस्मरणीय करून सोडला!

x x x

[२५] **भजनाच्या रंगांत भोजनास विलंब!**

अंधारांत चांचपत चांचपत चालावें लागल्यामुळें दीक्षितांच्या येथें

पोहोंचावयास त्यांना बरीच रात्र झाली. तेथें पोहोंचल्यावर जरा स्वस्थपणा येईल असें वाटत होतें; पण तसाही योग दिसेना! दीक्षित हे स्वतः भाविक व श्रद्धाळु असल्यामुळें त्यांच्या येथें बहुधा रोज भजनाचा कार्यक्रम होत असे. या दिवशीं तर त्याला विशेषच रंग चढला होता! तास झाला, दीड तास झाला तरी भजनकरी बुवांचें तोंड कांहीं मिटेना! त्यांच्या भक्तीची भूक जसजशी अधिक वाढत चालली तसतशी हरिभाऊंच्या स्नेह्यांचीही भुकेनें उत्पन्न झालेली व्याकुळता तीव्र होत चालली. दीक्षितांनीं तल्लीनतेनें डोळे मिटले व हरिभाऊही डोळे मिटून डुलूं लागले! जवळ असलेले स्नेही त्यांना कोंपरखळ्या देऊन "आतां जेवणाची कांहीं तजवीज पहा" अशा विनवण्या करूं लागले. तों भक्तीला विनोदाची जोड मिळून हरिभाऊंची मान अधिकच प्रेमानें डुलूं लागली! शेवटीं या स्नेह्यांनीं खुद्द दीक्षितांनाच आपल्या अंतरींची व्यथा सांगून "जे का रंजले गांजले त्यासि म्हणे जो आपुले" या वचनाची आठवण करून दिली. तेव्हां मात्र भजनाची समाप्ति होऊन भोजनाची तत्काळ सिद्धता झाली!

× × ×

[२६] **इतक्यांत पांच कसे वाजतील?**

भोजनोत्तरही बऱ्याच गप्पा होऊन निजायला बाराचा सुमार झाला आणि "झोंप लागली काहो," म्हणून हरिभाऊंनीं आपल्या स्नेह्यांच्या अंगावरील पांघरूण ओढावें! "आतां निजा बुवा स्वस्थ!" असें अगदीं जिकिरीला आलेल्या त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांच्या अंगावर खेंकसावें, असा क्रम कांहीं वेळ चालून एकाच्या सुमारास खरी निजानिज झाली. स्नेह्यांची झोंप ऐन रंगांत येत आहे इतक्यांत "पांच वाजले हो, उठा." म्हणून त्यांचे मागें हरिभाऊंचा ससेमिरा सुरू

झाला! “अहो, इतक्यांत पांच कसे वाजतील” असें त्यांचे स्नेही मोठ्या काकुळतीनें हरिभाऊस म्हणाले. तेव्हां “कसे वाजतील म्हणजे काय? प्रत्यक्ष आतां वाजलेच! उठा लवकर!” असें हरिभाऊंनीं उत्तर दिलें. शेवटीं बरीच बाचाबाच होऊन त्यांच्या स्नेह्यांना झोंपेचा प्रवेश अकालींच समाप्त करावा लागला!

× × ×

[२७] **भजनी पेशांतील हरिभाऊ!**

पायथ्याशीं बाजाची पेटी होती ती उघडून हरिभाऊ तुकारामाचे अभंग म्हणूं लागले. एक तास झाला, दोन तास झाले; उजाडण्याचा कांहीं सुमार दिसेना. तेव्हां लवकरच उजाडेल असा एखादा अभंग म्हणा, असें हरिभाऊंचे स्नेही त्यांना म्हणाले. हरिभाऊ त्या वेळेस भजनी पेशांत होते. तेव्हां “देवाच्या मनांत असेल तर लवकर उजाडेल” असें त्यांनीं भाविकपणाच्या आविर्भावानें उत्तर दिलें! “या बाबतींत तरी देवाचें मन आपल्याला घड्याळांत पहातां येईल” असे त्यांच्या स्नेह्यांनीं उद्गार काढले. इतक्यांत दीक्षित शेजारच्याच खोलींत निजले होते ते बाहेर आले. त्यांना पहातांच हरिभाऊंचे स्नेही म्हणाले, “काय हो भाऊसाहेब, आपल्या घड्याळांत पांचाचे ठोके पडले तेव्हां हरिभाऊंनीं मला उठविलें; त्याला प्रहर होत आला! अजून उजाडत कसें नाहीं?” भाऊसाहेब आपल्या नेहमींच्या शांत, गंभीर वृत्तीनें व सस्मित मुद्रेनें म्हणाले, “माझें घड्याळ जरा बिघडलें आहे. त्यांत दोन ठोके जास्त पडतात!” आपण उठलों त्या वेळेस खरे तीन वाजले होते ही जागृति हरिभाऊंना होऊन, हरिभाऊंच्या स्नेह्यांच्या दृष्टीनें करुणपर झालेल्या या कथानकाचें शेवटीं आनंदांत पर्यवसान झालें!

× × ×

[२८] **मला बहिरा ठरविलें !**

एकदां म्युनिसिपालिटींतील स्कूलबोर्डानें एका मास्तरास काढून टाकलें होतें. हरिभाऊ अध्यक्ष असल्यामुळें तो त्यांचेकडे दाद मागण्याकरितां आला. " तात्यासाहेब आहेत का ? " असें त्यानें लांबून विचारिलें. हरिभाऊंनीं " कोण आहे ? या." असें आंतूनच उत्तर दिलें. त्यावर बाहेरच उभें राहून " माझें आपल्याकडे कांहीं काम आहे " असें तो गृहस्थ म्हणाला. " आंत या, इथें बसा आणि मग काय तें बोला " असें हरिभाऊंनीं त्यास सांगितलें. " मी म्युनिसिपल स्कूल-मध्यें मास्तर होतों. मला बोर्डानें काढून टाकलें आहे." असें तो गृहस्थ बाहेर उभे राहूनच म्हणाला. हें पाहून हरिभाऊ थोडे रागावले आणि त्याला म्हणाले. " अहो, तुम्हांला आत या म्हणतों, तरी तुम्ही बाहेरूनच कां बोलत आहां ? " त्यावर तो गृहस्थ शांतपणानें म्हणाला, " आपण इतक्या लांबून माझ्याशीं बोलत आहां, तरी मीं आपल्याला बरोबर उत्तरें दिलीं." हरिभाऊ म्हणाले, ' मग पुढें काय ? " " पुढें काय असावयाचें ? इतके माझे कान धड आहेत तरी तुमच्या म्युनिसिपालिटीनें मला बहिरा ठरवून नोकरीवरून दूर केलें ! " आपला बहिरेपणा नाशाबीद ठरविण्याकरितां या गृहस्थानें दुरूनच संभाषण करण्याची योजिलेली शक्कल पाहून हरिभाऊंना त्याच्या हिकमतगिरीचें अर्थातच कौतुक वाटलें !

x x x

[२९] **मला फिर्याद द्यावयाची आहे !**

हरिभाऊ एकदां आपल्या दोन मित्रांबरोबर बोलत असतां एक साधारण तरुण, देखणी, अंगावर दागदागिने घातलेली अशी बाई तेथें आली. आणि " आपटे आहेत का ? " म्हणून विचारूं लागली. ही

बाई कोण, कुठली आणि आपल्याकडे कशाला आली? असा विचार येऊन हरिभाऊ चकितच होऊन गेले! "आपलें काय काम आहे?" असें त्यांनीं बाईला विचारिलें. तेव्हां "मला फौजदारींत एक फिर्याद द्यावयाची आहे." असें ती सांगूं लागली. तोंच हरिभाऊंच्या डोक्यांत प्रकाश पडला आणि "माझा धंदा वकिलीचा नाहीं. आपल्याला जे आपटे वकील पाहिजे आहेत ते नागनाथाच्या पाराजवळ राहतात." असें तिला त्यांनीं सांगितलें. त्याबरोबर आपण भलत्याच घरांत शिरलों हें लक्षांत येऊन ती बाई थोडी घाबरली आणि तेथून निघून गेली.

× × ×

[३०] **मामा हरभरे फोडीत!**

दादाभाई नौरोजींनीं देशाकरितां इतकी दगदग आणि यातायात सोसली तरी त्यांना दीर्घायुष्य लाभलें ही पूर्वपुण्याईच होय, असें एक गृहस्थ म्हणाले. त्यावर तेथें असलेले दुसरे एक गृहस्थ म्हणाले, "आमचे मामाही ८० वर्षांचे असून अद्याप कडाकड हरभरे फोडतात!" हें ऐकून अण्णा वाकनीस म्हणाले, "आपल्या मामांची ही स्थिति निःसंशय तारीफ करण्यासारखी आहे; पण त्यांनीं जन्मभर हरभरे फोडल्याशिवाय दुसरी कांहीं कामगिरी केली नसेल! आमच्या दादाभाईंनीं नुसत्या जगण्याशिवाय अनेक गंभीर व्यवसाय व जबाबदारीचीं कामें केलीं, हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे." वाकनिसांच्या या विनोदी भाषणानें हरिभाऊंना आणि इतर मंडळीना मौज वाटली व त्यांतील समर्पकताही त्यांस पसंत पडली.

× × ×

[३१] **जन्माचा वहिमा बनतो!**

एखाद्यानें वर्ष-सहा महिनेही कोठें प्रोफेसरीचें काम केलें कीं

जन्मभर त्याच्या मागें 'प्रोफेसर' ही उपाधि लागावी हें मोठें आश्चर्य होय. मामलेदारी किंवा मुन्सफी सोडून मनुष्य मोकळा झाला कीं, त्याला त्याच्या एरव्हींच्या नांवानेंच लोक ओळखूं लागतात. मग प्रोफेसरालाच त्या नांवाची तहाह्यातच काय पण निरंतरचीही सनद कां मिळावी ? असा मंडळींत बोलतां बोलतां एकदां प्रश्न निघाला. त्यावर एक गृहस्थ म्हणाले कीं, " कोणी एकदांच—तीही लहानशी—जरी चोरी केली तरी तो जसा जन्माचा वहिमी बनतो तसेंच या प्रोफेसरीचेंही दिसतें आहे ! " हें ऐकून हरिभाऊंसह सर्व मंडळी हसूं लागली !

× × ×

[३२] **माझं बि नांव हरिच !**

हरिभाऊंना एक नवीन नोकर ठेवावयाचा होता. त्याची सर्व माहिती त्यांनीं विचारली. शेवटीं " तुझें नांव काय ? " असा त्यांनीं त्याला प्रश्न केला. तेव्हां " माझं बि नांव हरिच ! " असें त्यानें उत्तर दिलें. गड्यानें साधेपणानें दिलेल्या या उत्तरानें हरिभाऊंची अर्थातच करमणूक झाली !

× × ×

[३३] **भाऊसाहेब !**

हरिभाऊ आपल्या भाऊ नांवाच्या नोकरास भाऊसाहेब म्हणत. हे बहुधा गांज्याच्या तारेंत असत. पहिल्या हांकेस डोळे उघडावयाचे, दुसऱ्या हांकेस जाग्यावरून हलण्याचा विचार करावयाचे व तिसऱ्या हांकेस ओ द्यावयाची अशी यांची पद्धत असे ! हरिभाऊंचा स्वभाव सर्वसंग्राहक असल्यामुळें अशींही माणसें त्यांच्या येथें निभावून जात. या गृहस्थांना घेऊन हरिभाऊ एकदां वांईस गेले होते. हा प्रसंग

तेथील द्रविड हायस्कूलच्या एका वार्षिक संमेलनाच्या वेळीं हरिभाऊंचें उपदेशपर भाषण झालें त्या वेळचा होता. या वेळीं हरिभाऊंचा मुक्काम तेथील सुप्रसिद्ध वकील कै० शंकर महादेव ऊर्फ भाऊसाहेब पाटणकर यांच्या येथें होता. हरिभाऊ आपल्या नोकरास 'भाऊसाहेब' म्हणून हांक मारावयाचे आणि भाऊसाहेब पाटणकर "काय पाहिजे" म्हणून गर्दीनें यावयाचे असे प्रसंग दोनतीन वेळां उद्भवले !

x x x

[३४] **हेही आमच्याच गोत्रांतले आहेत !**

हरिभाऊंना चांगली दिसेल ती वस्तु घ्यावयाची असा नाद असे. भाऊसाहेब पाटणकरही याच वर्गांतले असत. नोटपेपर्स, पॅडस्, फाउंटन पेनें, सेफ्टी रेझर्सचे निरनिराळे नमुने, घडीची खुर्ची, वेताची खुर्ची, स्प्रिंगची खुर्ची, फिरती खुर्ची, निरनिराळ्या वाणाचे रेशमी सुती कपडे, चहाची उत्तम सर्व्हिस, वगैरे त्यांच्या येथील जिन्नस पाहून हेही गृहस्थ आपल्याच गोत्रांतले आहेत अशी हरिभाऊंना खूणगांठ पटून अंतर्यामीं त्यांना अत्यंत आनंद झाला ! वांईसारख्या आडगांवांत राहूनही त्यांना इतका पदार्थसंग्रह करतां यावा याबद्दल त्यांना खरोखरच आश्चर्य वाटलें. चहा, दूध, साखर, स्टोव्ह, चहाचीं भांडीं, कप, बशा वगैरे चहाच्या सामानाची भाऊसाहेबांच्या येथील स्वतंत्र व्यवस्था पाहून तर ते फार खूष झाले ! भाऊसाहेबांच्या येथें दिवसांतून अनेकांकरितां अनेक वेळां चहा व्हावयाचा; पण त्यांच्या घरांतील माणसांना यत्किंचितही उपसर्ग पोहोंचूं नये अशी त्यांची व्यवस्था होती ! चहापायीं घरांतील माणसांना रंजीस आणणाऱ्या लोकांना भाऊसाहेबांचें हें उदाहरण खरोखरच अनुकरणीय आहे असें हरिभाऊ म्हणत असत.

x  x

[३५] **एनिमाची मौज !**

एकदां सहज बोलतां बोलतां एका गृहस्थानें एक मजेदार प्रसंग सांगितला. एका माणसाचें पोट तडास लागलें होतें, म्हणून तो डॉक्टरकडे गेला. डॉक्टरनीं त्याला "एनिमा घ्या म्हणजे बरें वाटेल," असें सांगितलें. त्या वेळीं एनिमा हल्लींच्या इतका सर्वपरिचित झाला नव्हता. एनिमा ही काय चीज आहे याची पुष्कळांना कल्पनाही नव्हती. डॉक्टरकडे गेलेले हे गृहस्थ अशांपैकींच होते. डॉक्टरनीं "एनिमा घ्या" म्हणून सांगतांच, "ठीक आहे, घेईन. पण तो घ्याय-चा कशांत?" एनिमा नांवाचें एखादें औषध असेल अशीच त्यांची कल्पना होऊन त्यांनीं हा प्रश्न केला! एनिमा घ्यावयाचा, तो मधांत घ्यावयाचा, तूपसाखरेंत घ्यायचा किंवा खडीसाखरेबरोबर घ्यायचा हें कळावें, या हेतूनेंच त्यांनीं वरील विचारणा केली! डॉक्टर आणि रोगी यांच्या दरम्यान उद्भवलेला हा प्रसंग ऐकून हरिभाऊंसह सर्व मंडळीची हंसून हसून मुरकुंडी वळली!

# ३

[३६] **घरचें भांडवल किती आहे?**

येथें एक अकलेची पेढी नांवाची संस्था निघाली होती. " या पेढीजवळ घरचें भांडवल किती आहे याचा खुलासा प्रसिद्धिपत्रकांत दिसत नाहीं! तो खुलासा प्रसिद्ध झाल्याशिवाय त्यांत ठेवी ठेवण्यास तयार होणें म्हणजे ठेवीदारांनीं आपली अक्कल गमावण्याप्रमाणेंच होणार आहे!" अशा आशयाचे उद्गार या संस्थेसंबंधानें लिहितांना हरिभाऊंनीं काढले होते!

× × ×

[३७] **ज्ञानाची पुंजी वाढत राहिली पाहिजे!**

लेखनव्यवसाय करणारांनीं विद्याव्यासंग अव्याहत राखणें जरूर आहे असें हरिभाऊ म्हणत. पेढी चालविण्याकरितां लोकांच्या ठेवी घेणें जरूर असलें तरी त्यास स्वतःच्या ऐपतदारीची व पतीची जोड असल्याशिवाय ती चोख रीतीनें चालणें शक्य नसतें. अशा स्थितींत ती केव्हां डबघाईला येईल याचा भरंवसा नसतो! लेखनाचा व्यवसाय करणाऱ्या माणसाची ज्ञानाची पुंजी एकसारखी वाढत गेली तरच त्याच्या लिहिण्यांत ताजेपणा व तरतरी रहाते. ज्ञानाची पुंजी जेमतेमच असली म्हणजे त्याच त्याच विचारांभोंवतीं व कल्पनांभोंवतीं घुटमळण्याची लेखकावर पाळी येते! विद्यमान कित्येक लेखकांचीं उदाहरणें देऊन या आपल्या उद्गारांची समर्पकता हरिभाऊ चांगल्या रीतीनें सिद्ध करीत!

× × ×

[३८] **पुन्हा सायकलवर बसणार नाहीं !**

हरिभाऊ सायकलवर बसावयास शिकले होते. एकदां ते रस्त्याच्या एका कोंपऱ्याशीं सायकल वळवीत असतां सायकल एका म्हातारीच्या अंगावर गेली ! त्याबरोबर म्हातारी एका बाजूला कोलमडली व तिच्या डोक्यावरील गोवऱ्यांची पाटी रस्त्यावर उधळून सर्व रस्ताभर गोवऱ्यांचा सडा पडलेला असा देखावा निर्माण झाला ! हरिभाऊ अर्थातच घाबरून गेले ! म्हातारीच्या तोंडाचा पट्टा सुरूच होता. हरिभाऊंची ही स्थिति पाहून रस्त्यावरील कित्येक माणसें मदतीस आलीं. त्यांनीं सायकल एका बाजूस करून म्हातारीच्या गोवऱ्या पाटींत भरून दिल्या व तिची समजूत करण्याचा प्रयत्न चालविला. हरिभाऊही म्हातारीची माफी मागूं लागले ! शेवटीं " आतां पुन्हा सायकलवर बसणार नाहीं " असेंही ते तिला म्हणाले, तेव्हां तिचा राग शमला ! हरिभाऊही यानंतर खरोखरच सायकलवर कधीं बसले नाहींत !

× × ×

[३९] **कायमचेच लेगआउट झाले !**

क्रिकेटसंबंधांतील त्यांची कर्मकहाणीही अशाच प्रकारची आहे. हा खेळ खेळण्यास त्यांनीं नुकतीच सुरुवात केली होती. तेव्हां त्यांच्या पायास चेंडू लागून त्यास दुखापत झाली. आपली दृष्टि आधींच अधू, तशांत एखाद्या वेळीं डोळ्यास चेंडू लागला म्हणजे सर्वच कारभार आटपावयाचा, असा विचार करून पुन्हा त्यांनीं खेळाडू म्हणून क्रिकेटच्या ग्राउंडवर पाऊल ठेवलें नाहीं ! ते एकदां जे लेग-आउट (Leg out) झाले ते कायमचेच !

× × ×

[४०] **हरि जाणे!**

चारचौघांचे लेख येतात अशा एखाद्या मासिकांतून आपली कादंबरी सुरू करण्यापेक्षां आपलें एखादें स्वतंत्र साप्ताहिक असलेलें अधिक बरें असें वाटूनच हरिभाऊंनीं करमणूक काढली. यामुळें त्यांच्या ग्रंथप्रकाशनास निःसंशय मदत झाली. त्यांतही लेखनासंबंधांतील अनियमितपणाचा व दिरंगाईचा दोष त्यांच्या ठिकाणीं नसता तर हें प्रकाशन याहीपेक्षां अधिक प्रमाणांत होऊन सांपत्तिक दृष्ट्याही हरिभाऊंना चांगलें साहाय्य झालें असतें. बाबाजी सखाराम आणि कंपनीकडे करमणुकीच्या प्रकाशनाचें काम असतां हरिभाऊंच्या हातून अशी वरचेवर दिरंगाई होत असे. सुरू झालेलीं पुस्तकें लवकर समाप्त व्हावीं अशी या प्रकाशकांची अर्थातच इच्छा असे. त्या इच्छेकडे हरिभाऊंचें लक्ष जात नाहीं असें दिसून आल्यानंतर "चालू असलेलीं प्रकरणें लवकर समाप्त व्हावीं अशी आमची उत्कट इच्छा आहे; पण ती केव्हां सफळ होईल तें **हरि** जाणे" असें एका अंकांत प्रकाशकांनीं म्हटलें होतें.

x x x

[४१] **तोंडें उलटीं पाहिजे होतीं!**

हरिभाऊ तपकीर ओढीत असत व सोडीतही असत. "किती तपकीर ओढतां?" असें एखाद्या बिनतपकीरवाल्यानें त्यांना म्हटलें म्हणजे ते म्हणत कीं, "तुम्हीं तपकीर ओढणारे पाहिले आहेत कोठें? तपकीर कितीही ओढली तरी समाधान न होणाऱ्या एका गृहस्थानें शेवटीं उद्गार काढले कीं, परमेश्वरानें सगळी शरीररचना ठीक केली आहे; पण येवढीं नाकपुड्यांचीं तोंडें वर केलीं असतीं तर फार चांगलें झालें असतें. म्हणजे तपकीर नाकांत कोंबण्याऐवजीं ओततां आली असती!"

x  x

[४२] **मी महार आहें!**

एकदां त्यांचे एक मित्र सदर्न मराठा रेल्वेनें पुण्यास आले. गाडींत मित्रांच्या पुढें एक गोरेगोमटे वेदोनारायण बसले होते. त्यांच्या शेजारींच दुसरा एक काळसरसा मनुष्य बसला होता. त्याच्या जवळ पिकलीं पानें, रोठी सुपारी, पेटीचा कात, शिरसीचे वेलदोडे वगैरे विडयाचें सामान चांगल्या शोभिवंत अशा चंचींत घातलेलें होतें. तो वरचेवर पट्टी खाई व एक पट्टी शेजारच्या वेदोनारायणांनाही देई. त्याच्या जवळ तंबाखूही चांगली होती. तिचेही हे वेदोनारायण मोठ्या आवडीनें सेवन करीत! सुमारें पंधरा मिनिटांनीं एकदां, अशा प्रकारें त्यांनीं पांच सहा वेळां तंबाखूचा बार भरला असेल! इतक्यांत डब्याच्या बाहेरच्या फळीवर एक मनुष्य गाडी चालत असतांच चढला. त्यास वेदोनारायणांच्या खांद्याशीं खांदा लावून बसलेले काळसर गृहस्थ म्हणाले, "काय रे, वर कां चढतोस? तूं कोण आहेस?"

फळीवर चढलेल्या माणसानें उत्तर दिलें, "कां? अरेतुरेसा करतोस? मी कोण आहें तें सांगूं का तुला? तूं कोण आहेस रे?"

फळीवर उभ्या असलेल्या माणसाचे हे दरडावणीचे शब्द ऐकतांच तो काळसर गृहस्थ म्हणाला, "रागावूं नका मायबाप, मी महार आहें!"

हें ऐकतांच वेदोनारायण 'शिव शिव' म्हणून ताबडतोब जाग्यावरून उठले आणि खिडकीशीं जाऊन तोंडांत असलेला विडा थूः थूः करून थुंकूं लागले! भोंवतालच्या पांढरपेशा मंडळींत एकच हंशा उडाला! जात समजल्याबरोबर जो माणूस वेदोनारायणांना अस्पृश्य दिसूं लागला त्याच माणसाची पानतंबाखू हे एक दोन तास सारखी चघळीत होते!

ही गोष्ट या मित्रांनीं हरिभाऊंना सांगितली तेव्हां त्यांना फारच हंसूं आलें. यानंतर ही हकीगत त्यांनीं इतर मित्रांना किती तरी वेळां सांगितली असेल! गोपाळराव गोखल्यांनाही त्यांनीं ती सांगितली, तेव्हां त्यांनाही ती फार बहारीची वाटली!

× × ×

[४३] **गाळणेंच तोंडाला लावतों!**

हरिभाऊंच्या मित्रपरिवारांतले एक गृहस्थ चहाचे विशेष चहाते होते. एक दोन चांगले मोठे पेले दिल्यानंतरही त्यांची तृप्ति झालेली दिसली नाहीं म्हणजे ते त्यांना म्हणत, " हें पहा, आतां पेल्यांची भानगड ठेवूं नका. मी हें गाळणेंच तुमच्या तोंडाला लावतों!

× × ×

[४४] **रावळपिंडीस पिंड देऊं नका!**

आपले एक स्नेही आपल्या मुलीला रावळपिंडीस स्थळ पहात आहेत असें हरिभाऊंना समजलें. तेव्हां इतक्या लांब मुलगी देणें त्यांना पसंत पडलें नाहीं. " आपल्या पोटच्या पिंडास तुम्ही रावळ-पिंडीचें स्थळ पहात आहां हें ऐकून माझें मन खरोखरच उद्विग्न झालें आहे." अशा मजकुराची चिठ्ठी लिहून त्यांनीं त्या स्नेह्यांना या विचारा-पासून परावृत्त केलें.

× × ×

[४५] **मौज करूं म्हटल्यानें होत नाहीं!**

येथील एका बागेंत मंडळींनीं जेवणाचा बेत केला. आणि त्या-प्रमाणें बारा वाजतां सुमारें वीस बावीस मंडळी तेथें येऊन दाखल झाली. बारा वाजतांची वेळ म्हणजे जेवणाला कांहीं फारशी उशिराची वेळ नव्हे. तेव्हां ही मंडळी फराळ वगैरे न करतांच आली होती.

आंत जाऊन आतां जेवायला बसावयाचें असेंच सर्वांना वाटत होतें. पण प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहातात तों तेथला केरही निघाला नव्हता! मग बिछाइतींची वगैरे व्यवस्था दूरच राहिली. स्वयंपाकाचीं भांडींही चुलीवर नुकतींच पडलीं होतीं. हा सर्व भयाण देखावा पाहून मंडळीचीं मनें अर्थातच हादरून गेलीं! थोडया गप्पा मार, थोडें बागेंत हिंड, थोडें आडवें पड असें करतां करतां दोन वाजून गेले. शेवटीं पाट, पानें होऊन मंडळी जेवावयास बसली. तों जेवणाचा बेत काय नमुनेदार झाला होता! कच्चा भात, आमटीचें पाणी, भाज्यांत कोणाला मीठ जास्त तर कोणाला तिखट अधिक, वाढण्याची बंडाळ असा एकच गोंधळ उडून गेला! शेवटीं एका गृहस्थाच्या द्रोणांतील आमटीच्या तळाशीं एक झुरळ सांपडलें! त्याबरोबर पंगतीचें अर्थातच विसर्जन झालें! अव्यवस्था करावयाची असा हेतु धरून प्रयत्न केल्यानें जी अव्यवस्था झाली नसती ती त्या दिवशीं उत्कृष्ट रीतीनें जमून आली! मौज करूं म्हटल्यानें होत नाहीं, ती सहजच झाली पाहिजे एवढेंच आजच्या अनुभवावरून तात्पर्य निघतें, असे या प्रसंगीं हरिभाऊंच्या तोंडून उद्गार निघाले!

× × ×

[४६] **आपला तो बाब्या दुसऱ्याचा तो ठोंब्या!**

एका गृहस्थाला आपल्या मुलाचें फार कौतुक वाटत असे. आपला मुलगा अतिशय तरतरीत व तल्लख आहे असें ते ज्याच्या त्याच्या पाशीं सांगत. व हें सिद्ध करण्याकरितां ते आपला मुलगा व त्याचाच दुसरा एक सवंगडी यांना उजळणीचे प्रश्न विचारीत. मुलास 'बेत्रीक?' असें विचारल्याबरोबर तो 'सहा' असें उत्तर देई व वडील त्याला 'शाबास' असें म्हणत. दुसऱ्या मुलाला 'त्र्यांयशीं पाउणे' असा प्रश्न करतां-

च त्याला त्याचें ताबडतोब उत्तर देतां न आलें म्हणजे " हा गुलामा, तूं अगदींच ठोंब्या दिसतोस " असें म्हणत. तिनावर सात, पांच सक, वगैरे प्रश्न मुलाला विचारून त्याजकडून उत्तरें आल्यानंतर त्याला शाबासकी द्यावयाची व एकोणतीस सव्वें, त्रेपन अडचें, सदुसष्ट दीडें असे प्रश्न त्याच्या सोबत्याला विचारून त्याच्याकडून उत्तर आलें नाहीं म्हणजे आमचा पोऱ्या पहा कसा फडाफड उत्तरें देत आहे आणि तूं रे असा मुखस्तंभ कसा? म्हणून त्याला हिणवावयाचें! हरिभाऊंचे एक मित्र या बापांची नक्कल करीत तेव्हां हरिभाऊंना वरचेवर हसूं येत असे. कांहीं नकलाच अशा असतात कीं त्या किती वेळां केल्या तरी त्यांतला ताजेपणा कायम रहातो! हरिभाऊंच्या परिवारांत या नकलेला हाच दर्जा प्राप्त झाला होता!

× × ×

[४७] **खरोखरच राजयोग आला!**

आनंदाश्रमांत एक अतिशय गरीब विद्यार्थी रहात असे. वेदाध्ययन करण्याकरितां तो तेथें राहिला होता. एके दिवशीं एक ज्योतिषी तेथें आले. सर्वांच्या बरोबर त्यांनीं या मुलाची पत्रिका पाहिली व याला राजयोग आहे म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें दोन तीन वर्षांत खरोखरच त्याला बरेंच उत्पन्न असलेल्या एका मठाच्या गादीवर बसविण्यांत आलें!

× × ×

[४८] **भविष्य फसलें!**

हरिभाऊ कायदे-कौन्सिलच्या निवडणुकीकरितां उभे राहिले आणि अगदीं अखेरपर्यंत ते खास निवडून येणार अशी खात्री वाटत होती. दोन तीन ज्योतिष्यांनींही ते खास निवडून येणार अशीं

भविष्यें वर्तविलीं होतीं; पण हे आधींचे कयास व भविष्यें निरुपयोगी ठरून निवडणुकींत अखेर ते नापास झाले !

x x x

[४९] **कपाळ पहा !**

चाळीस वर्षांपूर्वी वऱ्हाडांत एक मुसलमान गृहस्थ डेप्युटी कमिशनरच्या जागेवर होते. ते मोठे व्यवहारचतुर असून स्वभावानें-ही चांगले होते; पण त्यांचें शिकणें बेताचेंच झाल्यामुळें त्यांचें लिहिण्यासवरण्याचें काम ते तोंडी मजकूर सांगतील त्याप्रमाणें कारकुनास करावें लागे. ते फक्त सही करीत, तीही ओबडधोबडच करीत. त्यांच्या हाताखालीं एक नवीन कारकून आला. त्यानें त्यांच्या सहीकडे पाहून आश्चर्य प्रगट केलें ! या आश्चर्याचें कारण ओळखून डे. कमिशनर कपाळावर बोट ठेवून म्हणाले, " बाबा, इथें बघ, अक्षराकडे काय बघतोस ? " हा प्रारब्धाच्या खेळाचा प्रसंग एका स्नेह्यांनीं सांगितला, तेव्हां तो हरिभाऊंना मनापासून पटला !

x x x

[५०] **चिठ्या बिनखर्ची असतात !**

मद्रासच्या एका सुप्रसिद्ध गृहस्थांकडून पत्र घेऊन एक मनुष्य हरिभाऊंकडे आला. या मनुष्याला आपल्याकडून कांहीं मदत झाली तर करावी, असें या पत्रांत लिहिलें होतें. मनुष्याची एकंदर चाल-चर्या पाहून हरिभाऊंचें त्याच्याविषयीं कांहीं विशेष चांगलेंसें मत झालें नाहीं; पण तो मोठया गृहस्थांकडून आला आहे तेव्हां त्याला विन्मुख कसा पाठवावा असा विचार करून हरिभाऊंनीं त्याला कांहीं पैसे दिले. पुढें या सुप्रसिद्ध गृहस्थांची गांठ पडल्यानंतर " आपल्याकडून आलेल्या मनुष्यास मीं कांहीं मदत केली; पण मनुष्य आपला असा-

तसाच दिसला " असें हरिभाऊंनीं त्यांना सांगितलें. त्याबरोबर ते गृहस्थ म्हणाले, " माझ्या चिठीचा आपण आदर केला याबद्दल मी आपला अर्थातच आभारी आहें; पण या माणसाला आपण मदत केली नसती तरी कांहीं मोठेंसें बिघडलें नसतें! चिठी मागायला अनेक माणसें येतात, तेव्हां नाहीं तरी कोणाला आणि कसें म्हणावें? असा माणसापुढें प्रश्न येतो. तेव्हां चिठ्या देणें भाग पडतें. त्या बरेच वेळां केवळ औपचारिक असतात आणि त्यांना कांहीं खर्चही पडत नाहीं!" या गृहस्थांच्या बोलण्यांतील ग्राह्यांश हरिभाऊंच्या लक्षांत आला; पण हें तत्त्वज्ञान चिठी देणाऱ्या गृहस्थांनींच निवेदन करावें हें पाहून त्यांना अर्थातच थोडें आश्चर्य वाटलें!

x x x

[५१] **हेलपाटा वांचला!**

एकदां मंडळी फिरायला जात असतां वाटेंत एक इसम भेटले "कोठें निघालांत?" असा मंडळींतील एका गृहस्थांना अनुलक्षून त्यांनीं प्रश्न केला. त्या वेळेस "पाषाणला चाललों होतों; पण आतां आपण भेटलांत, तेव्हां हेलपाटयाचें कांहीं कारण उरलें नाहीं!" असें या गृहस्थांनीं उत्तर दिलें. तेव्हां मंडळींत एकच हंशा पिकला!

x x x

[५२] **पेन्शननें पाणके महाग केले!**

"या देवधराच्या सेवासदनानें स्वयंपाकाला बाया मिळेनाशा झाल्या" असें लठ्ठ पेन्शन मिळणारे एक लब्धप्रतिष्ठित गृहस्थ म्हणाले. तेव्हां तेथें जवळच असणाऱ्या हरिभाऊंच्या एका मित्रांनीं उत्तर केलें, "देवधरानें सेवासदन काढण्यांत जी चूक केली, तीच चूक सरकार आपल्या नोकरींतून निवृत्त होणाऱ्या माणसाला पेन्शन देण्यांत करीत

आहे. आज गांवांत पाणके मिळेनासे झाले आहेत. आपल्या-सारख्यांना पेन्शन मिळत नसतें तर पाणक्यांसंबंधांतील ही हलाखी केव्हांही उपस्थित झाली नसती!" पेन्शन मिळणारे रावसाहेब जसे बोलण्यांत आचरट होते, तसेच उत्तर-प्रत्युत्तरांची देवाण-घेवाण करण्यांतही मोठे मार्मिक होते. हरिभाऊंच्या मित्रांनीं दिलेलें हें उत्तर ऐकून इतर मंडळींबरोबर तेही हंसूं लागले!

x x x

[५३] **विरुद्ध दिशेला प्रयाण!**

हरिभाऊंचे एक स्नेही तळेगांवला कांहीं कामाकरितां गेले होते. काम उरकून ते पुण्यास परत यावयासाठीं स्टेशनवर आले. स्टेशनवर गाडी उभी होती त्यांत ते जाऊन बसले. इतक्यांत दुसरीही गाडी तेथें आली आणि हे स्नेही ज्या गाडींत बसले होते ती गाडी चालू झाली. गाडी चालू होतांच आपण मुंबईला चाललों ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली! आपण गाडींत बसल्यावर जी गाडी स्टेशनांत आली तीच गाडी पुण्याला जाणारी होती ही जाणीव त्यांना झाली. इंजिन कोणत्या बाजूला आहे हें न पहातां गाडींत बसण्याची आपण गर्दी केली त्याचाच हा परिणाम होय हीही जागृति त्यांना जाचूं लागली; पण गाडी हालल्यावर या पश्चाद्बुद्धीचा काय उपयोग? ते लोणावळ्यास उतरून दुसऱ्या गाडीनें पुन्हा पुण्यास परत आले. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं हा प्रसंग हरिभाऊंना निवेदन केला, तेव्हां त्यांची अर्थातच करमणूक झाली!

x x x

[५४] **यमुनेनेंच लिहिली काय!**

हरिभाऊंनीं, यमुनेनें लिहिलेलें आपलें आत्मचरित्र, या स्वरूपांत

"पण लक्षांत कोण घेतो?" ही आपली कादंबरी लिहिली. ही कादंबरी खरोखरच स्त्रीनें लिहिली आहे अशी त्या वेळीं बहुतेकांची कल्पना झाली. यासंबंधानें वाचक वर्गाच्या मनांत कोणते तर्क वितर्क चालू होते याची कल्पना हरिभाऊंकडे या बाबतींत एक पत्र आलें होतें त्यावरून होणार आहे. हें पत्र "पी. के. वाळिंबे, डिस्ट्रिक्ट एंजिनियर्स ऑफिस, बेळगांव यांचेकडून आलें आहे. त्यांत ते म्हणतात:—

"रा०रा० हरिभाऊ आपटे, मुक्काम पुणें. कृ. सा. वि. वि.—आपला माझा परिचय नाहीं. तरी पण ज्ञानाचें दान किंवा प्रतिग्रह याचा परिचयाशीं कांहीं संबंध नाहीं, म्हणून मीहीं याबद्दल कांहीं विचार न करतां जिज्ञासा तृप्त होईल अशा पूर्ण उमेदीनें आपणांस थोडीशी तसदी देण्याचें धाडस करतों, त्याबद्दल माफी असावी.

आम्हीं कांहीं मित्रमंडळींनीं एकत्र बसून आपली "पण लक्षांत कोण घेतो" ही 'दुसरी गोष्ट' वाचली. तिच्या चांगुलपणाची स्तुति करण्याच्या भानगडींत मी मुळींच पडत नाहीं. तें काम केवळ "तुझ्यासम कविच" करोत! पण आमच्या आमच्यांत असा वाद उपस्थित झाला आहे कीं, "यमुना" ही खरोखरच कोणी व्यक्ति असून तिचें आत्मचरित्र आपण नुसतें प्रसिद्ध केलें किंवा तिनें तें लिहून ठेवलें ही गोष्टसुद्धां आपल्या कल्पनेचें लालित्य आहे!

याला वाद म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, सबंध पुस्तक वाचून आमची तर अशी खात्री होऊन चुकली कीं, हें केवळ तिनेंच लिहिलें; आणि आपण प्रसिद्ध केलें. बरें इकडे पहावें तों आपल्या नांवाच्या वरच्या बाजूला "रचणार" अशीं अक्षरें पहिल्या पानावर चुकून दिसतात! तेव्हां अशी आमची वृत्ति द्विधा झाली आहे; आणि सत्यशोधनार्थ

त्या कादंबरीच्या जनकाकडेच धांव मारावी लागली. तरी एक कार्ड टाकून हें सगळें पटल दूर करावें. कृपा असावी.

पत्रावर ता. २२।४।१९१२ अशी आहे.

× × ×

[५५] **पात्राशीं तादात्म्य पावण्याची हातोटी!**

मंडळीच्या दृष्टीवर पडलेलें हें पटल दूर करण्यास हरिभाऊंनीं काय तजवीज केली किंवा कांहींच तजवीज न करतां मंडळींची ही द्विधा-वृत्ति कायमच ठेवली हें समजण्यास मार्ग नाहीं. पण कादंबरी प्रसिद्ध होत असतां किंवा झाल्यावरच नव्हे तर त्यानंतर एक पिढी गेली असतांही हरिभाऊंच्या कादंबरीस, ती एका भगिनीनेंच लिहिली आहे, असा आभास कायम राखतां आला, यावरून भगिनीवर्गाच्या अनु-कंपनीय स्थितीशीं हरिभाऊंचें तादात्म्य कसें झालें होतें हें मात्र स्पष्ट-पणें दिसून येतें.

# ४

[५६] **डोक्यावरून हात फिरवूं द्या !**

हरिभाऊंना लहानपणीं एक शास्त्री संस्कृत शिकवावयास येत होते. त्यांच्या डोक्याला टक्कल पडलें असल्यामुळें तें चांगलें गुळगुळीत होतें. लहानपणच्या हूड स्वभावांत शास्त्रीबुवांच्या डोक्यावरून हात फिरविण्याची हरिभाऊंना लहर लागली, आणि ते त्यांना म्हणाले, " मला डोक्यावरून हात फिरवूं द्याल तरच आज मी शिकावयाला बसेन." शास्त्रीबुवांनीं अर्थातच त्यांची ही लहर चालूं दिली आणि पाठाला प्रारंभ केला !

X X X

[५७] **व्यवहार नजरेपुढें ठेवला पाहिजे !**

मानसशास्त्रदृष्ट्या मुलांचें निरीक्षण करून त्यांना जें काय शिकवावयाचें तें त्यांच्याच तंत्रानें खेळीमेळीनें शिकवावें, असें स्पेन्सरचें म्हणणें होतें. तें समजल्यानंतर स्पेन्सरच्या एका स्नेह्यानें सहज त्याला आपल्या घरीं रहावयास बोलावलें; आणि एकदोन दिवस झाल्यानंतर घरांतील सर्व मुलें त्याच्या ताब्यांत देऊन " दोन दिवसांत आम्ही जवळच्या गांवाहून परत येतों " असें सांगून ते गृहस्थ सहकुटुंब निघून गेले. मुलांनीं या दोन दिवसांत घर अगदीं डोक्यावर घेऊन स्पेन्सरला अगदीं सळो कां पळो करून सोडलें ! गोडीगुलाबीनें मुलांना मार्गावर आणण्याचें त्याचें शास्त्र या ठिकाणीं मुळींच उपयोगीं पडलें नाहीं. घराचे मालक परत आल्यानंतर स्पेन्सर म्हणाला, " हें आपलें घर आणि हीं मुलें संभाळ ! मी आपला निघून जातों बुवा आतां ! मुलांना खेळीमेळीनें शिकविण्याचें आमचें शास्त्र व्यवहारांत बरेंच

मर्यादित केलें पाहिजे हें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें." कोणतीही गोष्ट करतांना व्यवहार हा नेहमीं नजरेपुढें ठेवला पाहिजे हें दाखविण्यास हरिभाऊ नेहमीं या गोष्टीचा निर्देश करीत.

* * *

[५८] **दुधांत पाणी कोठून शिरलें ?**

हरिभाऊ व त्यांची मित्रमंडळी एकदां दोन दिवसांची सफर करून परत पुण्यास आली. सर्वांनी आनंदाश्रमांतच चहा घेऊन जावें असें ठरलें; व ताजें कासेखालचें दूध आणण्याकरितां एक गृहस्थ गेले. त्यांनीं गवळ्याला सांगितलें, "बाबा, दोन पैसे अधिक घेतलेस तरी हरकत नाहीं; पण दूध कोरें पाहिजे." गवळ्यानें तें कबूल केलें व "रावसाहेब, तुम्हीं आणलेल्या भांड्यांतच पिळून देतों" असें तो त्यांना म्हणाला. आणि त्यानें धारेस सुरुवात केली. भांडें अर्धे होतें न होतें तोंच दुसरे एक गृहस्थ तेथें आले आणि गवळ्याजवळ निर्भेळ दूध मागूं लागले. गवळ्यानें धार थांबवून त्याच भांड्यांतलें दूध नवीन गृहस्थांस मोजून दिलें आणि आपली धार पुढें चालविली. गवळी कासेला हात घालतो आहे तोंच ते गृहस्थ परत आले आणि "हें दूध नको बुवा आम्हाला. हें चांगलें नाहीं." असें म्हणाले. गवळी त्याच्यावर संतापून व रावसाहेबांकडे पाहून म्हणाला, "बघा रावसाहेब! माणसें कशीं असतात तीं! आपल्यादेखत यांना दूध घातलें आणि हे म्हणतात कीं चांगलें नाहीं!" असें म्हणून तें दूध त्यानें भांड्यांत परत ओतून घेतलें, त्या गृहस्थाला पैसे परत दिले व धारेचें काम पुन्हा सुरू केलें. भांडें भरल्याबरोबर तें त्यानें रावसाहेबांना दिलें. त्यांचे पैसे घेतले व रावसाहेबांना निरोप दिला. रावसाहेबांनीं घरीं आणलेलें दूध मंडळी पहातात तों त्यांत पाणी असल्याचें दिसून आलें! राव-

साहेब म्हणाले, कीं "मीं तर माझ्यासमक्ष काढून आणलें आणि असें कसें होईल ?" मध्यें कोणी आलें होतें का? असा मंडळींनीं प्रश्न विचारतांच रावसाहेबांच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला ! मध्यें जो गिऱ्हाईक म्हणून दुसरा गृहस्थ आला होता त्यानेंच दूध परत करतांना त्यांत पाणी घालून आणलें असलें पाहिजे ! असें रावसाहेब एकदम म्हणाले. तेव्हां मंडळींत एकच हंशा उडाला !

× × ×

[५९]

हरिभाऊंना जनावरांची व पशुपक्ष्यांची फार आवड असे. कुत्रीं, मांजरें, पोपट, काकाकुवा वगैरे प्राणी त्यांच्या येथें असत. त्यांनीं एक हरणही कांहीं दिवस पाळलें होतें. एका वेळीं वाघाचीं पिल्लेंही माणसाळण्यासाठीं त्यांनीं आपल्या येथें ठेवलीं होतीं ! लहान होतीं तोंपर्यंत तीं गुण्यागोविंदानें नांदत असत; पण जसजशीं थोडीं निबर होऊं लागलीं तसतशीं जाणाऱ्या येणाऱ्यांवर तीं उसळूं लागलीं. घरांतील माणसांचें मन या पिल्लांच्या दहशतीनें बावरूं लागलें, तेव्हां हरिभाऊंनीं तीं देऊन टाकलीं !

× × ×

[६०] **हरि नारायण इतके साधे कसे ?**

हरिभाऊ एका गांवीं एका नूतन परिचिताच्या येथें उतरावयास गेले. हरिभाऊ येणार या विचारानें त्यानें त्यांची उतरण्याची, जेवणाखाणाची तजवीज जय्यत राखली. हरिभाऊ सुधारक व पुण्याचे रहाणारे तेव्हां त्यांच्या जेवणांत कांदा लसूण हा असलाच पाहिजे, अशी या मनुष्याची साहजिकच कल्पना झाली व त्याप्रमाणें त्यानें हे पदार्थ आणून ठेवले. पण या पदार्थांना ते कधीं शिवतही नाहींत असें जेव्हां

या कर्मठ गृहस्थास समजलें तेव्हां त्याला फारच आश्चर्य वाटलें! भोजनोत्तर हरिभाऊंनीं दोन कांबळे, त्यावर एक पलंगपोस व पांघरण्याचें ब्लँकेट हें सामान काढलें. तेव्हां आपल्याला या खोलींत गादी टाकली आहे असें त्या गृहस्थांनीं सांगितलें. तेव्हां "नेहमीं मी अशा बिछान्यावरच निजतों, गादीवर निजत नाहीं" असें हरिभाऊंनीं उत्तर दिलें. तेव्हां तर तो गृहस्थ गारच झाला! सुधारकी मताच्या कादंबऱ्या लिहिणारे हरि नारायण इतके साधे कसे, याचें राहून राहून त्याला नवल वाटे. हरिभाऊ कोठेंही गेले तरी त्यांच्या अशा साध्या वागणुकीनें त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत आदरच उत्पन्न होई.

× × ×

[६१] **हीच माहिती शेवटची झाली!**

एकदां त्यांचे एक स्नेही हरिभाऊंना म्हणाले, "हरिभाऊ, मी तुमच्यापेक्षां सरासरीनें बारा वर्षांनीं लहान आहें. मला अकस्मात् कांहीं अपघात वगैरे न घडल्यास सृष्टिक्रमानुसार तुम्हीच माझ्या आधीं जाणार. तुमच्यासंबंधानें लिहिण्याची किंवा इतर कोणी माहिती विचारल्यास ती देण्याची जबाबदारी माझ्यावरच येणार. तेव्हां तुम्ही आपल्या जीवनवृत्ताची महत्त्वाची हकीगत मला सांगून ठेवाल तर तिचा चांगला उपयोग होईल." यावर हरिभाऊंनीं बरेच आढेवेढे घेतले आणि आपली हकीगत सांगण्याचें कबूल केलें. त्याच दिवशीं सुमारें अर्धा-पाऊण तास त्यांनीं कांहीं माहितीही दिली. तीच शेवटची झाली! कारण त्यानंतर लवकरच ते आजारी पडून इहलोक सोडण्याच्या मार्गास लागले!

× × ×

[६२] **तीन ताई!**

हरिभाऊंच्या सख्ख्या आईस ताई म्हणत. हरिभाऊंच्या पत्नीसही

ताई या नांवानेंच हांक मारीत. हरिभाऊंच्या मुलीलाही हेंच नांव मिळालें! ताई या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या या तिघींही अल्पवयांतच वारल्या. पहिल्या दोघींचें देहावसान वीस एकवीस वर्षांच्या वयांतच झालें! धाकटया ताईचा या जगांतील योगायोग सात वर्षांतच आटपला!

× × ×

[६३] **चौघेही एकाच वयांत वारले!**

हरिभाऊ छपन्नाव्या वर्षी वारले. त्यांचे थोरले मामा रा० वामन गणेश परांजपे हे उमरावतीस इ० सन १८९९ सालीं वारले, तेही छप्पन्नाव्या वर्षीच! यांचे वडील गणेशपंत परांजपे व यांचे चिरंजीव रा० गंगाधरपंत या उभयतांचीही इहलोकची यात्रा त्यांच्या वयाच्या छप्पन्नाव्या वर्षीच समाप्त झाली! या घराण्यांतील निधनवयाच्या प्रसंगांची ही पुनरुक्ति, वयोमान हीही एक आनुवंशिक बाब असते या सिद्धान्तास निःसंशय पोषक आहे!

× × ×

[६४] **चिरंजिवांनीं आमचीच नक्कल दिली आहे!**

हरिभाऊंची 'मधली स्थिति' ही कादंबरी आनंदाश्रमाची जुळवाजुळव होत असतांच प्रकाशित झाली आणि विलक्षण योगायोग असा कीं, ही संस्था व ती कादंबरी यांच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून एका शेजारीं एक अशा रीतीनें प्रसिद्ध झाल्या! ही कादंबरी वाचून अण्णासाहेब (हरिभाऊंचे चुलते रा० महादेव चिमणाजी आपटे) एका स्नेह्याजवळ म्हणाले, "या कादंबरींत चिरंजिवांनीं आमची नक्कल हुबेहूब उठवून दिली आहे!" यावर या स्नेह्यांनीं

उत्तर दिलें, " अण्णासाहेब, यांत समाजाचें चित्र रेखाटलें आहे. आपण निष्कारण गैरसमज करून घेऊं नका ! "

× × ×

[६५] **स्वतंत्र जागा घेतली !**

आश्रमांत अण्णासाहेब असतांना एकदां पंडिता रमाबाई हरिभाऊंच्या भेटीस आल्या. " आपल्या भेटीस बायका येतात हें चांगलें नाहीं " असें या प्रसंगास अनुलक्षून अण्णासाहेब हरिभाऊंना म्हणाले. तेव्हां हरिभाऊंनीं लागलीच किब्यांच्या वाडयांत स्वतंत्र जागा घेतली. चिरंजिवांना आपल्या बोलण्याचा राग आला हें समजून येतांच अण्णासाहेबांनीं त्यांची समजूत केली व स्वतंत्र जागा ठेवण्याचें कांहीं कारण नाहीं असें त्यांना सांगितलें. यानंतर हरिभाऊ आनंदाश्रमांत बसूं लागले; पण आपल्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या समवयस्क मित्रमंडळींस मोकळेपणा सांपडावा व लेखनकार्यासही निर्वेधता मिळावी, यासाठीं हरिभाऊंनीं ही जागा पुढें कित्येक वर्षेपर्यंत आपल्याकडे ठेविलीच होती.

× × ×

[६६] **मातुश्रींच्या आयुष्यांतील प्रसंग !**

हरिभाऊंच्या मातुश्रींस यमुताई म्हणत. हरिभाऊ चार वर्षांचे असतांनाच या वारल्या. हरिभाऊंचा स्वभाव शांत व परोपकारी होता. कोणतेंही संकट आलें तरी त्यास धैर्यानें तोंड देणें हा गुण त्यांच्यांत विशेष प्रमाणांत दिसून येत असे. हे गुण त्यांना त्यांच्या मातुश्रींपासूनच लाभले असल्याचें दिसून येतें. एकदां त्यांच्या मातुश्रींस कांहीं कारणामुळें मुंबईस जावें लागलें. त्या वेळेस हरिभाऊंच्या पाठची बहीण आजारी होती. ती गाडींतच बाईंच्या मांडी-

वर वारली ! पण बाईनें मुक्कामावर पोहोंचेपर्यंत ही गोष्ट कोणासही कळविली नाहीं किंवा आपली शान्त वृत्ति ढळूं दिली नाहीं ! आपल्या मातुश्रींच्या आयुष्यांतील हा प्रसंग हरिभाऊ मोठ्या अभिमानानें सांगत असत !

× × ×

[६७] **यमुताईंनीं काढा घेतला !**

या बाईंचे धाकटे बंधु त्रिंबक गणेश ऊर्फ तात्या मामा हे लहानपणीं एकदां आजारी पडले. वैद्यानें त्यांच्याकरितां जो काढा सांगितला होता तो घेण्यास अतिशय कडू होता. ते तो कांहीं केल्या घेईनात. शेवटीं ते आपल्या बहिणीस म्हणजे हरिभाऊंच्या मातुःश्रीस म्हणाले, "काढा तूं घेशील तर मी घेईन." ताईनें काढा खरोखरच घेतला ! तेव्हांपासून ते हा काढा ताईच्या हातून बिनतक्रार रीतीनें घेऊं लागले !

× × ×

[६८] **भावाचा मार चुकविला**

एकदां ताई आंबोळ्या घालीत होती. त्यांतील एक मला दे असें तात्यामामा तिला म्हणाले. तिनें दिली नाहीं. तेव्हां त्यांनीं एका आंबोळींत रेती टाकून ती खराब केली ! पोरस्वभावामुळें त्यांच्या हातून ही गोष्ट झाली असली तरी आई याबद्दल त्यांना शिक्षा करील असा विचार करून ताईनें या गुन्ह्याची जबाबदारी स्वतःवर घेतली आणि भावाचा बचाव केला ! जरा स्थिरस्थावर झाल्यानंतर ताईनें खरा प्रकार आईला निवेदन केला. वस्तुतः आईनें हें सर्व प्रकरण आडून पाहिलेंच होतें. मुलीच्या या प्रेमळ व थोरपणाच्या कृत्याबद्दल आईला

अर्थातच कौतुक वाटलें! आईचाच स्वभाव हरिभाऊंच्यामध्यें कसा उतरला होता हें या दोन उदाहरणांवरून उत्कृष्ट रीतीनें दिसून येतें.

x x x

[६९] **सर्व खटपट शान्तपणें पार पाडली!**

हरिभाऊ अगदीं लहानपणीं आपल्या आईबरोबर आजोळीं गेले होते. त्यांच्या गळ्यांत त्या वेळेस एक वांकडा ताईत होता. ताईत गळ्यांत आहे किंवा नाहीं हें ते वरचेवर चांचपून पहात असत. तेव्हां तात्यामामांनीं ताईत मागें सारून गोंडा पुढें केला. हरिभाऊंनीं लागलीच ताईत पहिल्यासारखा केला! मामांनीं पुन्हा ताईत मागें करावा व गोंडा पुढें आणावा आणि हरिभाऊंनीं तो पुन्हा पहिल्यासारखा करावा असें बरेच वेळां झालें. शेवटीं तात्यांनीं गोंडा करगोटयास बांधला. तो सोडण्याकरितां हरिभाऊंनीं बरीच खटपट केली; पण तो सुटेना! तेव्हां ते आपल्या आईकडे गेले. तात्यामामानें तो बांधला आहे तेव्हां त्याच्याकडूनच सोडून घे असें आईनें उत्तर दिलें. त्यावर ते आपल्या आजीकडे गेले. तिनेंही तेंच उत्तर दिलें. शेवटीं ते मामांच्याकडे आले. मामा ही सर्व गंमत आतांपर्यंत पहातच होते. त्यांनीं तो गोंडा सोडून ताईत नीट केला आणि हरिभाऊ आनंदानें हंसत निघून गेले! या अवधींत त्यांनीं रडणें, रागावणें किंवा तोंड वाईट करणें यांपैकीं कोणताही प्रकार केला नाहीं. गोंडयाची गांठ मारल्यापासून तों ती सुटेपर्यंतची सर्व खटपट त्यांनीं अगदीं शान्तपणें पार पाडली!

x x x

[७०] **दीर्घायुष्य!**

हरिभाऊंच्या आजोळीं दीर्घायुष्य लाभलेल्या अशा दोन व्यक्ति

होत्या. एक त्यांचे चुलत आजे नारोपंतनाना व दुसरी त्यांची आजी गणेशपंतांची पत्नी उमाबाई. नारोपंत आपल्या वयाच्या ९३ व्या वर्षी वारले व उमाबाई आपल्या उमरीच्या ९० वर्षांच्या सुमारास परलोकवासी झाल्या !

× × ×

[७१] **बारा जानेवाऱ्या गेल्या !**

हरिभाऊ एकदां सहकुटुंब आपल्या आजोळीं गेले होते. त्यांना पाहून आजीला फारच कौतुक वाटलें. आपला नातू चांगला लौकिकवान् निघाला हें पाहून कोणत्या आजीला आनंद होणार नाहीं ? हरिभाऊ आजोळाहून परत पुण्यास आले तेव्हां " आतां पुन्हा केव्हां येशील ? " असें त्यांना आजीनें विचारलें. पुढच्या जानेवारींत येईन, असें हरिभाऊंनीं त्यांना आश्वासन दिलें. यानंतर बारा जानेवाऱ्या गेल्या, पण हरिभाऊंचें आजोळीं जाणें झालें नाहीं ! सर्व गोष्टी योगायोगानेंच घडत असतात ! या बाई सुमारें वीस वर्षांपूर्वी वारल्या. त्यांच्या मृत्यूची बातमी हरिभाऊंना समजली तेव्हां त्यांना अर्थातच अत्यंत दुःख झालें !

× × ×

[७२] **मोडी लिपी मोडीला घाला !**

हरिभाऊंचे आजे ( मातामह ) गणेशपंत यांचें मोडी अक्षर फार चांगलें होतें. रोज सकाळीं एक खर्डा तरी लिहिल्याशिवाय रहावयाचें नाहीं असा त्यांचा क्रम होता. अंधारांतही त्यांना लिहितां येत असे ! अक्षराचें वळण, बांधेसूतपणा व ओळींचा सरळपणा ही मोडी अक्षरांतली प्रस्थानत्रयी त्यांना अंधारांतही साधत असे ! मोडी अक्षरासंबंधांत हरिभाऊंची वृत्ति व स्थिति याच्या अगदीं उलट असे ! त्यांना

मोडी लिहितां येत नसे, इतकेंच नव्हे तर वाचण्याचाही कंटाळा असे! मोडी लिपी मोडीला घातली पाहिजे असें ते म्हणत असत!

x x x

[७३] **आजन्म निर्लेप राहिले !**

त्यांचे वडील व आजे दोघेही सरकारी नोकरींत हुद्देदारीच्या जागे-वर होते. आजे महालकरी होते आणि वडील पोस्टखात्यांत सुपरिं-टेंडंटच्या जागेपर्यंत चढले होते. त्यांच्या आईचे वडीलही महालकऱ्या-च्या जागेवर होते. त्यांचे थोरले मातुल वामनराव परांजपे हेही डेप्युटी-इन्स्पेक्टर असून धाकटे मामा त्रिंबकराव हे तहशीलदार होते. हरि-भाऊंच्या चुलत्यांनाही सरकारी नोकरीचा संसर्ग आरंभीं घडला होता. पण हरिभाऊ मात्र सरकारी नोकरीपासून आजन्म निर्लेप राहिले ! नोकरी करायची नाहीं असा त्यांचा पहिल्यापासूनच संकल्प होता व तो त्यांनीं निश्चयानें सफलही करून दाखविला !

x x x

[७४] **पेन्शन भोगण्याचा योग कोणासही आला नाहीं !**

हरिभाऊंचे आजे गणेशपंत हे पेन्शन घेतल्याबरोबर आजारी पडले, व आठ महिन्यांनीं वारले ! त्यांच्या पेन्शनीसंबंधाचें प्रकरण कांहीं वांधा आल्यामुळें रखडत पडलें होतें. त्याचा निकाल त्यांच्या मृत्यू-पूर्वीं थोडेच दिवस लागला. पण पेन्शनीची रक्कम तुम्ही घेऊं नका, असें त्यांनीं आपले ज्येष्ठ चिरंजीव वामनराव यांना निक्षून सांगितलें होतें. “फुकट खाण्याचा प्रसंग न येणें ही खरोखरच पूर्वपुण्याई आहे,” असेंही या प्रसंगास अनुलक्षून त्यांनीं वामनरावाजवळ उद्गार काढले व गंमत ही कीं, गणेशपंत, वामनराव व गंगाधरपंत अशा तिन्ही पिढ्यांतील पुरुषांना पेन्शनचा उपभोग घेण्याचा योग आला नाहीं ! हे सर्वही

गृहस्थ वयाच्या ५६ व्या वर्षी वारले व हरिभाऊही याच वयांत कालवश झाले हें पूर्वी सांगितलेंच आहे. मृत्यूचें वय आणि पेन्शनचा उपभोग न मिळण्याचा योग यासंबंधांतील सतत तीन पिढ्यांतील ही इतिहासाची पुनरावृत्ति खरोखरच आश्चर्यकारक होय!

× × ×

[७५] **पुढें चांगला लेखक होईल !**

गणेशपंत हे धुळ्यास असतांना हरिभाऊ आजोळीं गेले होते. गणेशपंत व अण्णासाहेब महाजनी ( रा०ब० विष्णु मोरेश्वर महाजनी ) यांचा चांगला ऋणानुबंध होता. हरिभाऊ धुळ्यास गेले तेव्हां अर्थातच ते लहान होते. पण त्यांची नजर व चालचर्या पाहून हा पुढें चांगला लेखक होईल अशी आपली अटकळ त्याच वेळीं रा० ब० महाजनी यांनीं निदर्शित केली होती, असें त्या वेळीं तेथें प्रत्यक्ष हजर असलेले हरिभाऊंचे एक जवळचे नातेवाईक सांगत असत!

× × ×

[७६] **चिरंजिवांचा अधिकार मोठा आहे !**

हरिभाऊंची 'मधली स्थिति' ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर " हा मुलगा कुमार्गाला तर लागणार नाहीं ! " अशी महादेव चिमणाजींनीं रा० ब० महाजनी यांच्याजवळ शंका प्रदर्शित केली. त्या वेळेस महाजनी म्हणाले, " माधवराव, ही तुमची शंका अस्थानीं आहे. समाजाला सन्मार्गास लावण्याकरितां ज्यांचा अवतार असतो ते पुरुष सद्वर्तनापासून केव्हांही परावृत्त होत नाहींत ! आपल्या चिरंजीवांचा अधिकार खरोखरच मोठा आहे ! थोडा काळ जाऊं द्या म्हणजे आपलीही याबद्दल खात्री होईल." महादेव चिमणाजींच्या मनांत ही शंका अर्थातच क्षणैक उद्भवली होती. हरिभाऊंच्या शीलवत्तेबद्दल त्यांनाही अर्थातच भरंवसा वाटत होता.

×  ×

# ५

[७७]

**चालू घडींत बखेडा होऊं नये !**

हरिभाऊंनीं मधली स्थिति, गणपतराव व पण लक्ष्यांत कोण घेतो ? या कादंबऱ्या लिहिल्या त्यांत सासवांविरुद्ध सुनांची, बापाविरुद्ध मुलांची किंवा वडिलधाऱ्या माणसांविरुद्ध तरुण पिढीची बाजू त्यांनीं घेतली आहे. हें कार्य त्यांनीं फार बेतानें व चतुरपणानें केलें आहे. आपण लिहितों यामुळें तरुण पिढींत, जुन्या पिढीबद्दल अनादर उत्पन्न होऊं नये अशी त्यांनीं योग्य खबरदारी घेतलीच आहे. तरी-सुद्धां आपल्या लिहिण्यानें समाजाच्या चालू घडींत बखेडा न होतां नवीन विचारसरणीचा प्रवेश क्रमाक्रमानें व्हावा या हेतूनें 'पण लक्षांत कोण घेतो' बरोबरच सगुणाबाईंचीं आपल्या मुलीस व गोविंदरावांची आपल्या मुलास पत्रें हींही प्रकरणें सुरू करणें त्यांना अवश्य वाटलें. होतां होईतों समाजाची विसकटाविसकट न होतां एकेक सुधारणा व्हाव्यात अशीच त्यांची मनःपूर्वक इच्छा असल्याचें यावरून दिसून येतें.

× × ×

[७८]

**नऊ लाख रुपये मिळविले !**

हरिभाऊंच्यावर अपत्यनिर्विशेष प्रेम करणारे महादेव चिमणाजी आपटे यांनीं वकिलीच्या धंद्यांत बावीस वर्षांमध्यें नऊ लक्ष रुपये मिळविले असें मला कोणीं सांगितलें, तेव्हां मला त्याबद्दल आश्चर्य वाटलें. पण माधवरावजींच्या वेळचे कागदपत्र पहातां हीं गोष्ट खरी असल्याचें दिसून येतें. तें सन १८७२ मध्यें वकिली करूं लागले.

पहिल्या दहा वर्षांची कांहीं माहिती मिळत नाहीं; पण १८८२ मध्यें आठ हजार, १८८३ मध्यें सतरा हजार, १८८५ मध्यें सव्वीस हजार, १८८६ मध्यें पस्तीस हजार, असें त्यांचें सालिना वाकिलीच्या प्राप्तीचे आंकडे असल्याचें दिसून येतें. १८८६ नंतरच्या आठ वर्षांत त्यांची ही प्राप्ति दुपटीवर जाऊन सालिना त्यांची मिळकत पाऊण लाखापर्यंत सहज पोहोंचली असावी असें या आंकड्यांवरून अनुमान करतां येण्यासारखें आहे.

x x x

[७९] **आश्रमाची तरतूद !**

सन १८९४ अखेर आनंश्रमासाठीं एक लाखाची इमारत व दीड लाखपर्यंत कायमनिधि मिळून अडीच लाख रुपये त्यांनीं संस्थे-प्रीत्यर्थ खर्च केले. गीर्वाणभाषेंतील हरएक विषयाचीं लेखी किंवा छापील पुस्तकें मिळतील तितकीं नीट जतन करून ठेवावीं. त्यांचा उपयोग तीं छापविण्याचे कामीं किंवा कोणाही गृहस्थास किंवा विद्वानास उपयोग करून देण्याच्या कामीं करावा. त्याचप्रमाणें आनंदाश्रमाच्या पैशास उपसर्ग लागूं न देतां महाराष्ट्र भाषेंतील लेखी किंवा छापील पुस्तकांचा संग्रह या इमारतींत कोणी करील तर त्यास तसें करूं द्यावें, वगैरे या संस्थेचे उद्देश देण्यांत आले आहेत. आज या इमारतींत संस्कृत पोथ्यांचा व आनंदाश्रमांत छापलेल्या पुस्तकांचा संग्रह इतका मोठा झाला आहे कीं, त्या इमारतींत मराठी पोथ्यांचा संग्रह स्वतंत्रपणें करण्याची कल्पना अमलांत आणणें अर्थातूच शक्य होणार नाहीं !

x x x

[८०] **जुन्या-नव्याचा मिलाफ !**

याशिवाय विद्यार्थिवसतिगृह, यति, संन्यासी यांची राहण्याची तज-

कै० महादेव चिमणाजी आपटे



जन्म-ता. ९ मार्च सन १८४६ मृत्यु-ता. २२ आक्टोबर सन १८९४

त्रीज वगैरे गोष्टीही उद्देशपत्रकानुरूप आज त्या संस्थेंत चालू आहेत. शास्त्रीलोकांना विद्याव्यासंग ठेवण्यास योग्य असा ग्रंथसंग्रह व आधुनिक पद्धतीचें इंग्रजी शिक्षण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृह असा या संस्थेंत जुन्या व नव्या परंपेरचा श्रेयस्कर मिलाफ साधण्यांत आला आहे.

× × ×

[८१] **परस्परांच्या छायेचें सुख !**

महादेव चिमणाजी हे ता. २२ आक्टोबर १८९४ रोजीं कालवश झाले. त्या वेळीं आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलींतून सत्तावीस ग्रंथ प्रकाशित झाले होते. गेल्या छत्तीस वर्षांत ही संख्या एकशेचार पर्यंत जाऊन पोहोंचली आहे. या प्रसिद्ध झालेल्या एकशेचार ग्रंथांत अलंकार दोन, धर्मशास्त्र आठ, पुराणें दहा, वेदान्त अडतीस, स्मार्त-याज्ञिक पांच, स्मृति तीन, श्रुति अकरा, वैद्यक सहा, व्याकरण दोन, श्रौत सहा, गणित दोन, इतिहास एक व संकीर्ण दहा अशा विषयवारीनें संख्या आहे. माधवरावांच्या नंतर या आश्रमांत हरिभाऊंचीं पंचवीस वर्षे गेलीं. या पंचवीस वर्षांत संस्था आणि हरिभाऊ, दोघांचेही आयुष्यक्रम एकमेकांशीं संलग्न झाले होते. किंबहुना दोघांनाही परस्परांच्या छायेचें सुख लाभलें असेंही म्हणतां येईल. म्हणूनच संस्थेसंबंधाची चलाऊ माहिती वाचकांकरितां दिली आहे.

× × ×

[८२] **मंत्र कोळून पाजले !**

महादेव चिमणाजींना अगदीं आसन्न स्थितींत संन्यास देण्यांत आला. संन्यास दिल्यानंतर ते बरे झाले तर काय होईल, असाही त्या वेळीं प्रश्न निघाला.. पण त्याची जबाबदारी हरिभाऊंनीं घेतल्यानंतर

संन्यासाचें कार्य यथाविधि शेवटास नेण्यांत आलें. संन्यासविधीचे मंत्र हरिभाऊंनीं त्यांच्या कानाजवळ उच्चारले व कांहीं त्यांना कोळून-ही पाजण्यांत आले ! नंतर त्यांचें शव मुंबईहून पुणें येथें आणण्यांत येऊन आश्रमांत आपल्या समाधीची जागा त्यांनीं आधींच तयार करवून ठेविली होती तेथें त्यांना समाधि देण्यांत आली. या वेळीं आश्रमांत शंकर मोरो रानडे यांचें कीर्तन करण्यांत आलें होतें.

× × ×

[८३] **शेंडीचाच संन्यास !**

आनंदाश्रमांत अनेक स्वामी मुक्कामाकरितां येत. हरिभाऊंसारख्या कल्पनासंपन्न व लेखनकुशल माणसानें या नानाविध प्रकृतींच्या संन्याशांचें वर्णन स्वतःच करून एखादें पुस्तक निर्माण केलें असतें तर तें मराठी वाङ्मयांत अत्यंत मनोरंजक होऊन राहिलें असतें. आश्रमांत येणाऱ्या संन्याशांत कांहीं खरोखरच वैराग्यशील व विद्या-संपन्न असे असले तरी एकंदरींत ज्यांचा संन्यास शेंडीपलीकडे गेला नाहीं असेच पुष्कळ असत !

× × ×

[८४] **लाडवांवर ताव !**

आश्रमांत एकदां एक स्वामी आले. त्यांनीं देवाच्या उत्सवांतील जेवणावळीचे प्रसंगीं आचाऱ्यापासून परस्पर लाडू घेतले व संन्यास-वृत्तीस अनुरूप अशा विदेही स्थितींत त्यावर यथेच्छ ताव मारला ! स्वामींची प्रकृति बिघडून ते आतां ब्रह्मस्वरूप होतात कीं काय ? अशी भीति वाटूं लागली ! अशी प्रकृति बिघडण्याचें कारण काय, याबद्दल हरिभाऊंनीं चौकशी केली. तेव्हां आश्रमांतील शिळ्या व कच्च्या अन्नानेंच माझी अशी तारंबळ उडवून दिली अशी त्यांनीं थाप

मारली ! आपल्या खादाडपणास स्वामींनीं खोटेपणाची अशा रीतीनें जोड दिल्यामुळें हरिभाऊंना त्यांची आश्रमांतून तात्काळ रवानगी करून द्यावी लागली !

x x x

[८५] **यतींची तैनात !**

दुसरे एक स्वामी आश्रमांत उतरले ते विडा खात, चहा पीत, जोडा घालीत, सर्व कांहीं करीत. हरिभाऊंच्या वडलांची भाविकवृत्ति असल्यामुळें ते या यतींच्या नादीं लागले. यामुळें त्यांचें स्तोम अधिक माजून त्यांची तैनात उत्तरोत्तर अधिक फैलावूं लागली. त्यांच्या पोटपूजेस रोज पेढे, बर्फी, फळफळावळ, ते काय मागतील ते जिन्नस आणून द्यावे लागत. असे कित्येक दिवस गेल्यानंतर एका प्रसंगीं हरिभाऊंचा त्यांचा बराच वादविवाद झाला. स्वामी बंगाली असल्यामुळें हरिभाऊनींही त्यांच्याशीं बंगालींतच संवाद केला. यावेळीं हरिभाऊंचे वडीलही हजर होते. स्वामी बरेच गांगरून गेले असावे असें त्यांच्या चर्येवरून नानासाहेबांनीं ओळखलें ! पण यतींना असें सतावून सोडूं नये असा उलट हरिभाऊंनाच त्यांनीं उपदेश केला व चिरंजीवांचें बोलणें मनावर न घेण्याबद्दल उलट त्यांनीं स्वामींचीच मनधरणी केली !

x x x

[८६] **शेणमार उघडकीस आली !**

याच वेळीं कांहीं प्रसंगानें हरिभाऊंचे मेहुणे श्रीधरपंत जोगळेकर हे आनंदाश्रमांत आले. त्यांची व स्वामींची औरंगाबादेस भेट झाली होती. विशेषतः स्त्रियांशीं लगट करण्याची स्वामींना जी लकब होती तीमुळें स्वामींना तेथें शेणमार कशी झाली वगैरे हकीगत रा० जोगळे-

करांनीं निवेदन केली तेव्हां आश्रमांतून स्वामींचें साहजिकच उच्चाटन झालें!

× × ×

[८७] **गोमातेचें सोयर!**

एकदां एक स्वामी आश्रमांत दोन दिवस जेवले व नंतर पुढीकरितां बाहेर जाऊं लागले. याचें कारण काय? अशी हरिभाऊंनीं खुद्द स्वामींसच विचारणा केली; तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें, "तुमच्या येथें गाय व्याली असल्यामुळें तुम्हांला सोयर आहे म्हणूनच मी बाहेर जेवतों!"

× × ×

[८८] **हाताची एजन्सी काढून टाकली!**

आनंदाश्रमांत रहावयास आलेल्या एका स्वामींची अशी मौज होती कीं, ते अन्नाला किंवा पाण्याला स्पर्श केव्हांही करीत नसत. गुरें जशीं तोंड लावून चारा व पाणी यांचें सेवन करतात, त्याचप्रमाणें हे स्वामी तोंड लावून अन्न खात आणि त्याच पद्धतीनें पाणीही पीत! खाण्यापिण्याचे बाबतींतील हाताची एजन्सी यांनीं अजीबात काढून टाकली होती!

× × ×

[८९] **भांगेत तुळस!**

दुसरे एक स्वामी असे विक्षिप्त नव्हते. पण अत्यंत विरक्त असे होते. पानांत जे कांहीं पदार्थ वाढले जात त्यांचा एकच काला करून ते खात! जिव्हेला कोणत्याच पदार्थाची निराळी चव कळूं नये, किंवा गोड किंवा स्वादिष्ट पदार्थांची चटक लागूं नये हाच त्यांचा अन्नाचा

काला करून खाण्यांत हेतु असावा ! आनंदाश्रमांत एकदाच भोजन करून त्यांनीं आश्रमाचा निरोप घेतला ! जातांना "कांहीं वस्त्रें, छाट्या, पैसे, पुस्तकें पाहिजेत का ?" म्हणून हरिभाऊंनीं विचारलें. पण स्वामींनीं "कांहीं नको." म्हणून सांगितलें ! त्यांची ही निस्पृहता पाहून हरिभाऊंना अर्थातच संतोष वाटला ! इतर स्वामींच्या एकंदर अनुभवावरून हरिभाऊंना ही भांगेंत तुळसच आढळून आली !

x x x

[९०] **चिमणीचे दांत !**

यतींनीं आपल्याला द्रव्याचा संसर्ग घडूं देतां कामा नये हा निर्बंध पाळण्याकरितां एक स्वामी कोणीं कांहीं पैसा अडका दिला असतां तो हातावर न घेतां छाटीचा पदर पुढें करून घेत ! चिमणीच्या दांतांनीं सुपारी फोडली असतां ती उष्टी होत नाहीं या समजुतीप्रमाणेंच पैसा हातांत न घेतां तो छाटींत घेण्याचा स्वामींचा हा तोडगा होता !

x x x

[९१] **गोविंदनामाचा महिमा !**

जेवतांना गोविंदनामाशिवाय दुसरा कशाचाही उच्चार करावयाचा नाहीं असा एका स्वामींचा नियम होता. हे स्वामी जेवतांना कोणताही पदार्थ अवशेष न ठेवतां संपवावयाचा नाहीं अशा रीतीनें वागत. अवशेष राहिलेल्या पदार्थाकडे बोट करून हे तोंडानें गोविंद, गोविंद असें म्हणत आणि प्रत्येक पदार्थ या संकेतानें मागून घेत असत ! जणुं काय ते गोविंदनामाच्या प्रभावाचा वस्तुपाठच देत !

x x x

[९२] **जसा भटजी तसें शास्त्र !**

आश्रमांत एकदां एक काशीकर भटजी आले होते. ते काशीचे

रहिवासी असल्यामुळें त्यांना गोड खाण्याचा फार नाद होता. त्यामुळें नुसता चहाच काय पण त्याबरोबर हे बिस्किटेंही चापूं लागले. तुम्ही बिस्किटें खातां हें शास्त्रविरुद्ध नाहीं का ? असें त्यांना कोणीं विचारलें तेव्हां " जसा भटजी तसें शास्त्र ! " असें त्यांनीं उत्तर दिलें. भटजीं-च्या वर्तनांत जसा बदल होईल त्याप्रमाणेंच शास्त्रांतही फिरवाफिरव व्हावयाची हाच त्यांच्या बोलण्याचा भावार्थ होता !

x x x

[९३] **भटजीनें गाशा गुंडाळला !**

या भटजीची आणि हरिभाऊंची पंगत होण्याचा योग आला नाहीं. एका शनिप्रदोषाचे दिवशीं हा योगायोग आला. त्या दिवशीं फळ-फळावळ मिळाल्यामुळें भटजींच्या मनास स्वाभाविकच प्रसन्नता आली ! हरिभाऊ हे पंक्तींत आपल्याला एक आणि दुसऱ्याला एक अशी प्रतारणा कधींही करीत नसत व कोणीं केलेली त्यांना खपतही नसे. पण या भटजीला हा नसता संशय येतो तेव्हां त्याची खोड जिरविली पाहिजे असा विचार करून पिठलें, भात व जोंधळ्याची भाकरी येवढे-च जिन्नस करावयास त्यांनीं घरांत सांगितलें आणि भटजीला आपल्या पंक्तीस घेऊन ते जेवूं लागले. जेवतांना साधें अन्न खाण्यांत फार मौज आहे हें हरिभाऊंचें प्रवचन चाललेंच होतें ! पण तें प्रवचन ऐकावयास भटजी फार दिवस राहिला नाहीं. तीन चार दिवसांतच त्यानें आनंदाश्रमांतील आपली डेराराहुटी हलविली !

x x x

[९४] **बळी घेण्याचें पातक टळलें !**

हरिभाऊंच्या वेळेस डेक्कन कॉलेजमधील एका विद्यार्थ्यानें मॅग सल्फच्या ऐवजीं चुकून ऑक्झॅलिक ॲसिड घेतलें आणि तो त्यानें प्राणास

मुकला ही गोष्ट हरिभाऊंच्या तोंडून त्यांच्या एका मित्रानें ऐकली होती. हरिभाऊंच्या निधनानंतर त्यांच्याच एका जवळच्या आप्तास क्विनिन पाहिजे होतें, तें मी घरून पाठवून देतों असें सांगून हे मित्र घरीं आले व अमुक ठिकाणीं क्विनिन आहे त्यांतलें थोडें कागदांत घालून अमक्या अमक्याच्या येथें पोहोंचवा, असें त्यांनीं घरांतील कोणा माणसास सांगितलें. त्यानें क्विनिन शेजारीं दुसरी बाटली होती त्यांतील थोडें औषध कागदावर घेतलें आणि तो तें विवक्षित स्थळीं पोहोंचविण्यास निघाला. तो कांहीं रस्ता चालून गेला असेल नसेल तोंच हरिभाऊंच्या मित्राच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला व त्यानें औषध घेऊन गेलेल्या माणसास परत बोलाविलें व पुडी सोडून पाहिली. तों त्यांत क्विनिन नसून खरोखरच ऑक्झॅलिक ॲसिड असल्याचें त्याला दिसून आलें ! थोडक्यांत चुकलें नाहींतर हरिभाऊंच्या एका आप्ताचा बळी घेतल्याचें पातक या मित्राच्या माथीं बसलें असतें !

× × ×

[९५] **इतकेंही सौजन्य नसावें !**

हरिभाऊ कॉंग्रेसच्या निमित्तानें एकदां कलकत्त्यास गेले होते. त्या वेळीं त्यांचें वय तिशीच्या आंतच होतें आणि कादंबरीकार म्हणून त्यांची प्रसिद्धि नुकतीच होऊं लागली होती. बंकिमचंद्र चतरजी हे मात्र त्या वेळीं कादंबरीकार म्हणून प्रसिद्धीस आले होते. कलकत्त्यास आपण आलोंच आहोंत तेव्हां त्यांची एकदां भेट घ्यावी या हेतूनें हरिभाऊ त्यांच्याकडे गेले. पण ते गृहस्थ हरिभाऊंस नुसतें "या, बसा." असेंदेखील म्हणाले नाहींत. "आपण कोठून आलां ? आपलें माझ्याशीं काय काम आहे ?" असे दोन प्रश्न त्यांनीं तुसडेपणानें विचारलें. त्याबरोबर "माझें कांहीं काम नाहीं. मी आपला

गीच सहज आलों होतों." असें म्हणून हरिभाऊंनीं आपला रस्ता धारला! कोणीही आला गेला तरी त्यास शिष्टाचारानें वागविण्याचें ौजन्यही मनुष्यस्वभावाचीं शब्दचित्रें रेखाटणाऱ्या या गृहस्थाच्या ंगीं नसावें हें पाहून हरिभाऊंस फार आश्चर्य वाटलें !

x x x

२६] **पुन्हा तोच अनुभव!**

एकदां सर गुरुदास बानर्जी येथें एका कमिशनच्या कामानिमित्त ाले होते. सर चिमणलाल सेटलवाड यांनीं लिहिल्यावरून हरिभाऊं-ीं त्यांच्या दोन दिवसांच्या मुक्कामांत त्यांची चांगली बरदास्त ठेवली. ेसरे दिवशीं ते कलकत्त्यास जावयास निघाले तेव्हांही हरिभाऊ ांना स्टेशनवर पोहोंचविण्यास गेले. या अवधींत हरिभाऊ जणूं काय ापले पगारी नोकरच आहेत अशा रीतीनें या गृहस्थानें त्यांना ागविलें! बंगाली गृहस्थाचा हा दुसराही अनुभव पहिल्याप्रमाणेंच ाल्यामुळें बंगाली लोकांविषयीं त्यांचें मन अर्थात्च विशेष चांगलें नव्हतें.

x x x

२७] **त्यांतच आनंद मानून रहातात!**

हरिभाऊंच्या लेखनव्यवसायाच्या अगदीं आरंभींच्या काळांत मॅक्स ोरेल याचें जॉन बुल ॲण्ड हिज आयलंड हें पुस्तक त्यांच्या वाचण्यां-ा आलें. "तीस कोटि लोक ब्रिटिशांचे जोडे पुसतात आणि त्यांतच ानंद मानून रहातात." (Thirty crores black the shoes f the British and still they are happy.) हें त्यांतील एक ाक्य वाचतांच हरिभाऊना अत्यंत दुःख झालें. तरी पण हें त्याचें वधान वस्तुस्थितिनिदर्शकच आहे हेंही त्यांच्या मनास पटल्याशिवाय ाहिलें नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्यास व व्यक्तिविकासास विरोधक अशी

जी आपली समाजरचना आहे त्यामुळेंच ही वस्तुस्थिति निर्माण झाली आहे. त्यांत मूलतः सुधारणा झाल्याशिवाय आपल्याला राष्ट्रोन्नतीचा मार्ग आक्रमतां येणें शक्य नाहीं या त्यांच्या भावनेस वरील विधानानें अधिकच प्रज्वलित केलें.

× × ×

[९८] **बसूं जाणे त्याला ऊठ कोण म्हणे !**

पुष्कळ लोकांना सभांतून वगैरे मानाच्या जागेवर बसून निष्कारण मोठेपणा मिरविण्याची संवय असते. स्वतःचें आदरातिथ्य स्वतःच करणाऱ्या अशा लोकांवर पुष्कळ वेळां स्थानभ्रष्ट होण्याची पाळी येऊन अपमान सोसावा लागतो. सभेंत माणसांना बसविणारे जे असतात त्यांची अशा लोकांवर अर्थातच नजर असते. कोणी मोठा माणूस आला आणि त्याला जागा नसली म्हणजे सभेचे व्यवस्थापक यांना उठवून त्याला ती जागा देतात. आपल्याला कोणी उठविणार नाहीं अशाच ठिकाणीं आपला दर्जा ओळखून बसल्यास असा अपमानाचा प्रसंग कधींही येणार नाहीं. फुकट मोठेपणा मिरविणाऱ्या अशा लोकांकडे पाहून हरिभाऊंना "बसूं जाणे, त्याला ऊठ कोण म्हणे !" या आपल्या आजीच्या म्हणीची नेहमीं आठवण होत असे.

## ६

[९९] **रावबहादुरांच्या वाऱ्यासही उभे राहूं नका!**

महादेव चिमणाजींनीं हरिभाऊंची आनंदाश्रमावर स्थापना केल्या-नंतर त्यांना जें पत्र लिहिलें आहे, त्यांत रावसाहेब व रावबहादुर यांची संगत धरूं नका, असा निक्षून उपदेश केला आहे. महादेव चिमणाजी जरा उतावळ्या मनाचे गृहस्थ असावेत असें वाटतें. आरंभीं ते कट्टे समाजसुधारक होते; पण कित्येक प्रमुख समाजसुधारकांनीं पुनर्विवाहाची स्वतःवर पाळी आली असतांही जी चुकवाचुकव केली तिच्यामुळें त्यांचें सुधारणा आणि सुधारक या दोघांवरचेंही प्रेम नाहीं-सें झालें. चाकू, कात्र्या वगैरेंचा कारखाना काढण्याच्या कामीं व कांहीं चालू असलेल्या उद्योगी संस्थांच्या भांडवलास सढळ हातानें मदत करून त्यांनीं बराच पैसा घालविला. यामुळें उद्योगधंद्यांस बरकत आणण्या-संबंधांतीलही त्यांची श्रद्धा डळमळून गेली. सुधारकी मताप्रमाणें पुन-र्विवाह करतां येत नाहीं व दुर्धारकी मताप्रमाणें कुमारिकेशीं विवाह-बद्ध होतां येत नाहीं, अशी त्यांची इतोभ्रष्टस्ततो भ्रष्टः अशी स्थिति झाली आणि शेवटीं चित्तास कांहीं तरी स्थिरता यावी म्हणून वरील सर्व पंथ सोडून अप्रकाशित गीर्वाणवाङ्मय प्रकाशित करणारी व यति-संन्याशी यांना आसरा देणारी आनंदाश्रम ही संस्था त्यांनीं काढली.

× × ×

[१००] **नेमकें तेंच घडलें!**

रावबहादुर व रावसाहेब हे सर्व लोक मनुष्याला फशीं पाडणारे आहेत अशी त्यांची समजूत झाल्यामुळेंच त्यांनीं आपल्या पत्रांत हरि-



आनंदाश्रम संस्था—[ स्थापना–सन १८८८ ]

भाऊंना वरीलप्रमाणें उपदेश केला; पण गंमत अशी कीं, हरि-भाऊंचा सर्व जन्म याच लोकांच्या संगतींत गेला. चुलत्यांच्या मनांत जें होऊं नये असें होतें तेंच नेमकें घडलें! एक तर बरेच रावसाहेब आणि रावबहादुर त्यांना समवयस्क होते. मामलेदार, मुनसफ, डेप्युटी-कलेक्टर वगैरे हुद्द्यांच्या जागेवर असलेल्या गृहस्थांपैकीं कित्येक हरि-भाऊंचे सतीर्थ्य म्हणजे त्यांच्या बरोबरच शिक्षण झालेले होते. शिवाय लेखनव्यवसायामुळें व आनंदाश्रमासारख्या अपूर्व संस्थेचे व्यवस्थापक या नात्यानें हरिभाऊंना स्वाभाविकच असा दर्जा प्राप्त झाला होता कीं, त्यांचे मित्र म्हणवून घेण्यांत रावसाहेब, रावबहादुर, मोठमोठे हुद्देदार सरकारी नोकर यांनाही मोठेपणा वाटावा. या सर्व कारण-समवायामुळें हरिभाऊंच्या भोंवतीं अशा गृहस्थांचा स्वाभाविकच परि-वार जमे. रावसाहेब, रावबहादुर किंवा इतर कोणी वडे गृहस्थ यांना मोठे समजून हरिभाऊ त्यांच्याशीं लघळपणा करावयास कधीं गेले आहेत असें केव्हांही घडत नसे. त्यांच्या अंगांतील अनेक गुणांच्या आकर्षकतेमुळें या लोकांनाच त्यांच्याशीं आपला स्नेह असावा असें वाटे.

× × ×

[१०१]

हरिभाऊंचें वय पंचवीस-तिशीच्या सुमारास होतें त्या वेळीं वडील-पणाच्या नात्यानें व हरिभाऊंचें कल्याण व्हावें या मनःपूर्वक इच्छेनेंच महादेव चिमणाजी यांनीं त्यांना वरील उपदेश केला; पण वस्तुतः हरिभाऊंच्या अंगीं तरुणपणीच इतका शीलवंतपणा व रुबाबदारपणा उत्पन्न झाला कीं, ते कोणाच्या संगतीला लागून बिघडले जाण्याचा यत्किंचितही संभव न उरतां उलट एखादा गैराशिस्त वागणा-रा माणूस त्यांच्या संगतीनें आपोआपच मार्गावर यावा! येथें हेंही

सांगितलें पाहिजे कीं, हरिभाऊंची संगत चहाणारे रावसाहेब, राव-बहादुर हे त्या वर्गांतील चांगल्यापैकींच होते.

x x x

[१०२] **आनंदाचें व्याकरणशुद्ध स्वरूप!**

रा० ब० गणेश चिमणाजी वाड यांच्या येथें हरिभाऊ व इतर बरीच प्रतिष्ठित मंडळी जमत. हे गृहस्थ फारच सत्त्वशील व मंडळींची वर्दळ प्रेमानें सोसणारे असे होते. त्यांच्या पश्चात् या बाबतींत त्यांची जागा घेण्यास हरिभाऊंसारखे दुसरे लायक गृहस्थ न उरल्यामुळें हा सर्व ताफा स्वाभाविकच आनंदाश्रमाकडे वळला. सायंकाळीं साडेपांचपासून आठ वाजेपर्यंत ही मंडळी आनंदाश्रमांत जमत असत. या क्लबांतील बहुतेक लोक साधारण संपन्न असल्यामुळें कोणाच्या मुलाची, पुतण्याची किंवा भाच्याची परीक्षा उतरली म्हणून, तर कोणाच्या मुलीचें लग्न झालें म्हणून, तर कोणाच्या येथील आजारी माणूस बरें झालें म्हणून, कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें या क्लबांत पेढे, बर्फी, चिवडा, फळफळावळ वगैरे वस्तूंबद्दल महिन्यांतून बऱ्याच वेळां मागणी उत्पन्न होऊन त्यांचा पुरवठाही वक्तशीर होत असे. हरिभाऊंच्या मुलीच्या वेळेस तर लागोपाठ सहा दिवस या क्लबांत बर्फीवर ताव मारण्यांत येत होता! मात्र मुलगा झाला तर पेढे व मुलगी झाली तर बर्फी अशा व्याकरणशुद्ध रीतीनेंच हे आनंदाचे प्रसंग या क्लबांत साजरे होत असत!

x x x

[१०३] **दिवसां मशाली!**

हरिभाऊंचें पहिलें लग्न इ० सन १८७९-८० सालीं येथील सुप्रसिद्ध वकील रा० दामोदर विद्याधर गोखले यांच्या कन्येशीं झालें.

दोन्ही घराणीं जुन्या चालीरीतींची अभिमानी असल्यामुळें मानपान, मिरवणुकी, जेवणावळी वगैरेंचा या लग्नांत धुमधडाका उडून गेला असल्यास त्यांत नवल नाहीं. याच सालीं बुधवार-वाडा व विश्रामबाग-वाडा हे दोन वाडे जळाल्यामुळें पुण्यास मोठा बंदोबस्त राखण्यांत आला होता. रात्रीं वाद्यें वाजविण्याची बंदी होती. त्यामुळें या लग्नांत दिवसां मशाली लावून पायघड्या घेण्यांत आल्या !

× × ×

[१०४] **बाई गडबडा लोळल्या !**

वरातीच्या मिरवणुकीस पालखी मिळाली नाहीं म्हणून मुलीच्या माहेरच्या बायका अर्थातच नाराज झाल्या ! एक वृद्ध स्त्री तर या धक्क्यामुळें जमिनीवर गडबडा लोळली असें म्हणतात ! शेवटीं वट-पौर्णिमेस मुलीची पालखींतून मिरवणूक काढून ती मुलीच्या माहेरच्या दारावरून नेली, तेव्हां एकंदर क्षोभ शान्त झाला ! पन्नास वर्षांपूर्वीच्या विवाहांगभूत थाटमाटाच्या व समारंभाच्या या कल्पना आजच्या पिढीस निःसंशय मनोवेधक व मनोरंजक वाटल्यावांचून रहाणार नाहींत !

× × ×

[१०५]

वरील मिरवणुकी, थाटमाट, हौसेचे प्रसंग वगैरे पाहून आजच्या पिढींतील कित्येक तरुण गृहस्थ अर्थातच त्याबद्दल तुच्छता दर्शवितील; पण या लग्नांत हुंडा वगैरे कांहींही घेण्यांत आला नाहीं, ही गोष्ट ऐकून आजच्या पिढींतील या लोकांनाही माना खालीं घालाव्या लागतील ! हरिभाऊंच्या पहिल्या लग्नांत हुंडा घेतला नाहीं. तेव्हां त्यांचें दुसरें लग्नही हुंड्याशिवाय झालें, हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

× × ×

[१०६] **मला दत्तक घेतोस का ?**

मागील एका प्रसंगीं एका वेडगळ रावबहादुरांच्या अजागळ चिरंजिवांचा निर्देश केला आहे. हे चिरंजीव बहिरे असल्यामुळें आपल्याजवळ नेहमीं कानफुंकणी बाळगीत. या फुंकणींतून हरिभाऊ त्यांना विचारीत, "मला दत्तक घेतोस का ?" हरिभाऊसारखा थोर माणूस आपला मुलगा झाला तर आणखी काय पाहिजे आहे असा विचार करून हे मूर्खशिरोमणी आनंदानें "होय" म्हणून उत्तर देत. "तुझी इस्टेट किती ?" असें यानंतर हरिभाऊ विचारीत; तेव्हां दत्तविधान फिसकटूं नये म्हणून तो "दोन लाख" असें उत्तर देई !

x x x

[१०७] **मुलीचें सदय अंतःकरण !**

हरिभाऊंची मुलगी ताई ही फारच हुषार, बुद्धिमान् व सदय अंतःकरणाची होती. ती जगती वांचती तर तिनें चांगला नांवलौकिक संपादन केला असता. पण जन्मापासून ती रोगी असे. ती बरी व्हावी याकरितां तिच्या आईबापांनीं भगीरथ प्रयत्न केले ! पण अखेर जशी काय जन्मस्थ साडेसाती असावी अशाप्रमाणें वयाचीं सात वर्षें पुरीं होतांच ती इहलोक सोडून गेली ! तिच्या एक एक गोष्टी मोठ्या मनोरंजक व हृदयद्रावक असत. दारांत भिकारी आला तर त्याला ती कधींही विन्मुख दवडावयाची नाहीं. एखादी बाई काम मागावयास आली तर तिला कामावर ठेवण्याबद्दल आईजवळ ती रदबदली करी व त्यांत यश मिळवी. त्याचप्रमाणें एकादा अतिथिअभ्यागत अवेळीं आला तरी त्यास घरांत बोलवून वडील माणसांकडून त्याची जेवणाची सिद्धता करवीत असे.

x x x

[१०८] **नागुताईस लुगडें मिळालें!**

तिला संभाळावयास नागूताई नांवाची एक बाई ठेवली होती. "नागूताई, हिला चालायला शिकवा म्हणजे तुम्हाला लुगडें घेईन" असें ताईची आई म्हणाली. या वेळीं या बाई ताईला हातीं धरून चालवीत होत्या. त्या म्हणाल्या "ताई, चालायला लाग बाई! तूं चालूं लागलीस म्हणजे मला लुगडें मिळणार आहे." असें म्हणून त्यांनीं तिचा हात सोडला तों ती खरोखरच चालूं लागली आणि नागूताईस खरोखरच लुगडें मिळालें!

x x x

[१०९] **लिहिण्यांत सव्यसाची!**

वाचण्यासंबंधांतही तिनें असाच चमत्कार करून दाखविला. ती शाळेंत जाई, पण लहान असल्यामुळें नुसतीच जाऊन बसे; शिकत वगैरे नसे. तरी इतर मुलींना मास्तर शिकवीत तेवढयावर इचा कार्य-भाग होई. मास्तरांना मात्र याची जाणीव नव्हती. एकदां ते तिला थट्टे-नें म्हणाले, "ताई दगड आहे. तिला कांहींच येत नाहीं." त्याबरोबर ती पुस्तक घेऊन वाचूं लागली! पुढें थोड्याच दिवसांत तिची लिहि-ण्यांतही चांगली तयारी झाली. ती अक्षर टपोरें आणि वळणदार काढीत असे. तिला चांगली शिकवून विद्वान् करावयाची असें हरि-भाऊ नेहमीं मनोरथ बांधीत. पोरीच्या बुद्धीचा नूरही हे मनोरथ यशस्वी व्हावे असाच होता. लिहिण्याच्या कामांत ती सव्यसाची असे! डेस्का-जवळ बसून कादंबऱ्या लिहिण्याचा सर्व आविर्भाव ती हरिभाऊंप्रमाणें करी! त्यांच्यासारखींच हातांत सारखीं पुस्तकें बाळगीत असे. पण अल्पायुष्यामुळें हे सर्व गुण निष्फळ ठरले.

x x x

[११०] **खचित लग्न करशील ना?**

तिला लग्नाचें फार वेड असे. कोठें कोणाच्या येथें लग्नाला जाऊन आली कीं " आई माझें लग्न करून टाक ना ! " असें ती आपल्या आईला म्हणत असे. आजारी असतांना "मला आतां आठवें वर्ष लागेल, मग नववें व नंतर दहावें लागेल, मग माझें लग्न करावयाचें ना ?" असें ती म्हणत असे. एकदां डॉ० वाडिया आले, तेव्हां ती औषध घेईना. डॉ० वाडिया म्हणाले, "तूं बरी झाल्यावर तुझें लग्न करावयाचें ना ?" तेव्हां "खचित लग्न करशील ना ?" असें आईस विचारून तिनें औषध घेतलें !

x x x

[१११] **आयुष्याची दोरी तुटली !**

तिचा लग्नाचा ध्यास व हरिभाऊंची तिच्या शिक्षणाबद्दलची आस हीं दोन्ही अर्थातच आयुष्याच्या दोरीवर अवलंबून होतीं. ती दोरीच तुटल्यामुळें सर्वच ग्रंथ आटपला व हरिभाऊंचीं नंतरचीं सहा वर्षें सर्वस्वीं दुःखमय अशा स्थितींत गेलीं !

x x x

[११२] **पदराखालीं पुस्तकें व काखेंत जोडा !**

आतां स्त्रीशिक्षणाचा बराच प्रसार होत चालला आहे, तेव्हां त्यांत अपूर्वत्व वाटण्यासारखें अर्थातच कांहीं राहिलें नाहीं; पण चाळीस वर्षांपूर्वीं शिक्षणाकरितां बायकांनीं घरांतून बाहेर पडावयाचें म्हणजे मोठें दिव्य होतें ! शिक्षण म्हणजे जणुं काय एक गुन्हाच होय अशा सावधगिरीनें त्यांना वागावें लागत असे ! या काळांत येथें रा० ब० चिंतामणराव भट यांच्या येथें प्रौढ स्त्रियांकरितां होम-क्लासेस

होते. हे क्लास दुपारीं दोनपासून पांचपर्यंत चालत. रा० सा० वि. अ. पटवर्धन आदिकरून गृहस्थांच्या बायका या क्लासांत शिकण्याकरितां जात असत. पुस्तकें पदराखालीं झांकून न्यावीं लागत असत. त्याचप्रमाणें जोडा काखेंत घेऊन रस्त्यांत आल्यावर तो घालावयाचा अशा बंदोबस्तानें या बायकांना जावें लागत असे !

× × ×

[११३] **चाळीस वर्षांपूर्वीचें सहभोजन !**

येथें मेहेंदळ्यांच्या बागेंत सन १८९० सालीं सहभोजन झालें. आज सहभोजन याचा अर्थ निरनिराळ्या जातींच्या लोकांनीं एका पंक्तींत बसून जेवावयाचें असा समजला जातो. पण त्या वेळीं हा शब्द स्त्रिया आणि पुरुष यांचें एके ठिकाणीं भोजन याच अर्थी योजण्यांत येत असे ! या भोजनाच्या प्रसंगीं सोळा सतरा जोडपीं हजर होतीं. प्रो० पानसे, रा० दामूअण्णा कुळकर्णी, रा० गोविंद वासुदेव कानिटकर, रा० अण्णा वांगीकर वगैरे मंडळी हजर होती. काशीताई कानिटकर याही या प्रसंगीं हजर असून त्या पुढारीच होत्या. पंडिता रमाबाईही तेथें आल्या होत्या हें सांगावयास नकोच. कारण त्यांच्याकरितांच हा भोजनसमारंभ करण्यांत आला होता. दोन्ही पंक्तींच्या—एका बाजूस पुरुषांची आणि एका बाजूस स्त्रियांची—मधोमध पंडिताबाईंचें पान मांडलें होतें.

× × ×

[११४] **लाल भाजी व लाल पाणी !**

" काल येथें मेहेंदळ्यांच्या बागेंत भोजनसमारंभ झाला; त्यांत लाल भाजी व लाल पाणी हे पदार्थ होते " असा गांवांत गवगवा झाला. हरिभाऊंच्या येथें विशेष झाला. या गवगव्यामुळें सासुरवासिनींस कित्येक

दिवस फारच त्रास सोसावा लागला. मेजवानीच्या दिवशीं अंगांत पोलकें, डोळ्याला चष्मा किंवा पायांत जोडा अशा थाटाची त्यावेळीं एकही स्त्री नव्हती. नथ, बुगड्या वगैरे दागिने घालूनच सर्वजणी आल्या होत्या. जेवण मोठें गमतीनें झालें. भोजनोत्तर काशीताई कानिटकर व रा० सीतारामपंत देवधर यांचीं स्त्रीशिक्षण या विषयावर व्याख्यानें झालीं. व्याख्यान हा शब्द त्या दिवशींच स्त्रियांच्या कानावर प्रथम पडला !

x x x

[११५] **चव्हाट्यागणिक टीका !**

याच सुमारास पंडिता रमाबाईचें किबे वाड्यांतील आरसेमहालांत व्याख्यान झालें. त्याला बायका गेल्या होत्या. रा० सा० रानडे यांच्या येथें पंडिताबाई भागवत वाचून दाखवीत असत, त्यासही कित्येक बायका जात. त्यांच्यावरही जुन्या लोकांत, चव्हाट्यागणिक टीका होत असे.

x x x

[११६] **जुलमाचा रामराम !**

पुढें शारदासदन निघालें. यांत इतर कित्येक स्त्रियांबरोबर हरिभाऊंचें पहिलें कुटुंबही जात असे. हरिभाऊ स्वतः नेऊन पोहोंचवीत असत. दोन चार महिने बायकोला माहेरीं ठेवावयाची व तेथून शारदा-सदनांत पोहोंचवावयाची असा क्रम चालू असे. त्या बाईस यामुळें घरीं कशालाही शिवूं देत नसत ! त्या वेळच्या स्त्रियांनाही हें आवडत नसल्यामुळें त्यांनाही हा आपल्यावर जुलुम होतो असें वाटे. आणि जुलमाचा रामराम असल्यामुळें धड शिक्षणही होत नसे व घरांत वडीलधाऱ्या माणसांचा निष्कारण रोषही सहन करावा लागत असे !

x  x

[११७] **ताईनें सर्वांस धाब्यावर बसविलें !**

मुलीच्या दुखण्याकरितां हरिभाऊंनीं पुष्कळ खर्च केला, तिची शुश्रूषा वगैरे उत्कृष्ट ठेवली; पण अखेर मृत्यूनें ठरल्या वेळीं तिला इह-लोकांतून उचलून नेलेंच ! ती आसन्नमरण झाली तेव्हां दत्तापुढें चिठ्या टाकल्या, त्यांत ती बरी होणार असा जबाब मिळाला. पत्रिका पाहिली, तींतही लक्षणें चांगलीं दिसत होतीं. साईबाबांची उदीही कपाळाला लावली; पण ताई या सर्वांना धाब्यावर बसवून अखेर कायमची निघून गेली !

× × ×

[११८] **ती कशी कां असेना ! मला चालेल !**

हरिभाऊंना मुलांपेक्षां मुलीच अधिक आवडत. ही मुलगी होण्या-च्या सुमारास असेंच बोलणें निघालें असतां " मुलगी झाली तर तिला आम्ही घेऊं, मुलगा झाला तर तिकडे आम्ही पहाणारही नाहीं." असें हरिभाऊ म्हणाले. मुली प्रेमळ असतात. त्यांचें प्रेम निरपेक्ष असतें असें हरिभाऊ नेहमीं म्हणत असत. ताई आधीं जगायची कठीण, यदाकदाचित् जगलीच तर ती लंगडी व वेडी होईल असें डॉक्टरनीं सांगितलें. तेव्हां अशीच जर ही व्हायची असेल तर ती गेलेलीच बरी असें घरांतील मंडळींना साहजिकच वाटलें; पण कोणत्याही स्थितींत कां होईना, ती जगावी अशी अंतःकरणापासून इच्छा करणारे एकटे हरिभाऊच होते !

× × ×

[११९] **तुमची बायको वारली हो !**

पहिली बायको वारल्यानंतर हरिभाऊंना असेंच दुःख झालें होतें. या बाई बाळंतपणांतच आजारी पडल्या. औषधें सारखीं चालूच होतीं.

मनुष्याचा आजार मर्यादेबाहेर गेला म्हणजे आतां थोडें बरें आहे असें जें मायेच्या माणसांस वाटतें त्यांत कांहीं अर्थ नसतो. अगदींच डोळा उघडत नव्हता तो उघडला, कीं प्रकृति खरोखरच जरा बरी होत चालली आहे अशी सभोंवतालच्या माणसांची समजूत होते; किंवा तशी समजूत तीं करून घेतात. हरिभाऊंच्या कुटुंबाच्या आजाराची स्थिति अशाच स्वरूपाची होती! हरिभाऊ कुटुंबाच्या तब्बेतीची चौकशी करून (या वेळीं त्यांचें कुटुंब माहेरीं होतें.) नुकतेच आनंदाश्रमांत आले; तों पांचच मिनिटांत त्यांचें देहावसान झाल्याची बातमी हरिभाऊंना समजली! बातमी सांगावयास मनुष्य जो पाठविला होता तो अगदींच गैरधोरणी होता. त्यानें आनंदाश्रमांत पाऊल टाकतांच "तुमची बायको वारली हो," असें मोठयानें ओरडून बातमी दिली! ती ऐकून कोणाच्याही हृदयास एकदम धसका बसावा हें स्वाभाविकच होतें. हरिभाऊंवरही तसाच परिणाम झाला आणि ध्यानींमनीं नसतां एखादा प्रचंड आवाज झाला म्हणजे जसे कान बधिर झाल्यासारखे होतात त्याचप्रमाणें अचानक आलेल्या व विलक्षण पद्धतीनें सांगितलेल्या या बातमीनें हरिभाऊंच्या हृदयास व चित्तवृत्तीस बधिरता आल्यासारखी झाली! ही बधिरता जाण्यास कित्येक वर्षे लागलीं!

x x x

[१२०] **संन्यासाची तयारी!**

कुटुंब वारल्यानंतर हरिभाऊंचें मन अगदीं वैतागून गेलें. या वैतागाच्या भरांत संन्यास घ्यावा असेंही त्यांनीं ठरविलें! व ते कोणासही न विचारतां न सवरतां नाशकास रवाना झाले. मार्गांत कल्याणास त्यांचे एक जिवलग मित्र त्यांस भेटले. त्यांनीं त्यांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या आणि परत पुण्यास आणलें. यावेळीं या मित्राच्या उपदेशा-

स न जुमानतां आपण आपला संन्यास घेण्याचा निश्चय शेवटास नेला असता तर हा ताईच्या मृत्यूचा अत्यंत खडतर प्रसंग आपल्यावर आला नसता असेही उद्गार त्यांच्या तोंडून निघत !

× × ×

[१२१] **शरीर पोंखरून निघालें !**

ताईच्या मृत्यूनें हरिभाऊ कसे शोकविव्हल होऊन गेले या-संबंधाचा. चरित्रांतील उतारा येथें देतों. "या प्रसंगानें हरिभाऊंच्या मनाला फार मोठा धक्का बसला! त्यांची शरीरप्रकृति मूळची चांगली निकोप, त्यांचें शरीर साधारण गुटगुटीत, अंगांत कोट, डोक्याला लहानसा रुमाल, डोळ्याला चष्मा व अंगावर उपरणें नाहीं, अशी ती त्यांची साधारण मध्यम उंचीची मूर्ति अनेक वर्षे एकसारखी कायम होती. पन्नाशीचा सुमार झालेला तरी हरिभाऊ साधारण तरुणच दिसत. पण या मुलीच्या मृत्यूनें, तिच्या हृद्रोगानें त्यांचें शरीर थोडक्याच दिवसांत पार पोंखरून निघालें!" ( पान ९३ )

× × ×

[१२२] **मुलांशीं खरेपणानें वागावें !**

हरिभाऊंचें आपल्या कन्येवर फार प्रेम होतें. एके दिवशीं संध्याकाळीं ते बाहेर जात असतां " बरोबर मला न्या " असें ती म्हणाली. तिची तब्येत चांगली नव्हती म्हणून तिला त्यांनीं नेलें नाहीं; पण तुला मी बॅट व चेंडू आणून देईन अशी त्यांनीं तिची समजूत केली; पण ती समजूत न होतांच रुसून निजली. रात्रीं आठ साडेआठ वाजतां हरिभाऊ बाहेरून आले तों त्यांना ताईला दिलेल्या वचनाची आठवण झाली. त्याबरोबर टांगा जोडून ते बाजारांत गेले व बॅट आणि चेंडू घेऊन आले. या वस्तु इतक्या तांतडीनें आणण्याची काय गरज होती? सकाळीं

आणल्या असत्या तरी चाललें असतें असें घरांतील मंडळी म्हणाली. तेव्हां हरिभाऊंनीं उत्तर दिलें, " मुलाला कबूल केल्याप्रमाणें वागलें म्हणजे त्यालाही चांगलें वागण्याची ओळ लागते." त्यांनीं बॅट व चेंडू तिच्या उशाखालीं ठेवला व ती सकाळीं उठल्यानंतर ते तिला म्हणाले, "तें पहा काय आहे तें !" त्या वस्तु पाहिल्याबरोबर तिचें मन अर्थातच प्रसन्न झालें !

# ७

[१२३] **आजीचें प्रेम !**

नानासाहेबांच्या मातुःश्री म्हणजे हरिभाऊंच्या आजी फार आजारी पडल्या. त्यावेळीं हरिभाऊंचे चुलते आण्णासाहेब यांनीं आईपुढें रुपयांनीं भरलेलें एक ताट ठेवून तिला सांगितलें कीं, "तुला धर्म करावयाचा असल्यास किंवा कोणास कांहीं द्यावयाचें असल्यास यांतून दे." त्या वेळीं तिनें पहिल्याप्रथम हरिभाऊंस मूठ भरून रुपये दिले व "आतां तुम्ही त्यांतले दोन दोन रुपये घ्या" असें बाकीच्यांना सांगितलें. 'गणपतराव', 'पण लक्ष्यांत कोण घेतो?' इ० कादंबऱ्यांत त्यांनीं आजीच्या प्रेमळपणाचें जें वर्णन केलें आहे तें स्वानुभवावरूनच कसें केलें असलें पाहिजे हें यावरून उघड होण्यासारखें आहे.

x x x

[१२४] **संध्याही केली नाहीं !**

हरिभाऊंचें दुसरें लग्न सन १८९२ च्या जानेवारींत येथें भाऊमहाराजांच्या बागेंत झालें. त्यांचे श्वशुर कै० बळवंतराव चोळकर व आजेसासरे कै० तात्यासाहेब जोग हे कट्टे जुन्या मताचे होते. तात्यासाहेब जोगांनीं, सुधारकाच्या स्पर्शानें विटाळलेल्या बागेंतील पाण्यालाही स्पर्श केला कीं धर्म बिघडेल या भावनेनेंच कीं काय, हरिभाऊंच्या लग्नाच्या दिवशीं तेथें संध्याही केली नाहीं! मग जेवण्याचें तर दूरच राहिलें. त्यांनीं आपल्या सुनेलाही तेथें जेवूं दिलें नाहीं!

x x x

[१२५] **फ्लॅनेल सगळीच नाहींशी झाली!**

हरिभाऊंच्या एका स्नेह्यांना फ्लॅनेल विकत घ्यावयाची होती. ते स्नेही त्यांना म्हणाले, "फ्लॅनेल आकसते. जरा जास्तच घेतली पाहिजे म्हणजे कपडा आवळ होणार नाहीं." हरिभाऊंनीं उत्तर केलें, "जरा कां? पुष्कळच अधिक घेतली पाहिजे! कारण ती आकसतां आकसतां अखेर सगळीच नाहींशी होते! एकदां माझा एक फ्लॅनेलचा कपडा वापरतां वापरतां असाच शेवटीं नाहींसा झाला!"

× × ×

[१२६] **अमावास्येचे दिवशीं उघडें असलेलें खणांचें दुकान!**

हरिभाऊंच्या एक स्नेह्यांच्या मुलीला "तुला आज खास खण घेऊन देईन," असें तिच्या वडिलांनीं सांगितलें होतें. तिच्या घरीं, तिच्या वडिलांशीं हरिभाऊ बोलत बसले असतां ती मध्येंच आली आणि खण घ्यायला चला असें आपल्या बापाला म्हणाली. त्यावर "आपण सगळेच बाजारांत जाऊं" असें हरिभाऊ म्हणाले. इतक्यांत त्या दिवशीं अमावास्या असल्यामुळें बाजार बंद आहे या गोष्टीची आठवण झाली. तेव्हां हरिभाऊ म्हणाले, "चला, माझ्या ओळखीचें एक दुकान आहे, तेथें खण मिळाला तर पाहूं." असें म्हणून त्यांनीं स्नेह्याच्या मुलीला व तिच्या बापाला आपल्या घरीं नेलें व घरांतला एक उत्तम धारवाडी खण तिला दिला!

× × ×

[१२७] **स्तुतीनें ओशाळून गेले!**

एका संस्थेच्या संमेलनप्रसंगीं अध्यक्षस्थानीं हरिभाऊ नियोजित झाले होते. अध्यक्षस्थान स्वीकारण्यापूर्वीचें प्रास्ताविक भाषण त्यांच्या

एका स्नेह्यांनीं केलें. त्यांत त्यांनीं "हरिभाऊंसारखा लोकोत्तर माणूस, प्रतिभासंपन्न लेखक, प्रचंड विद्याव्यासंगी, आदर्शभूत नागरिक व जिवास जीव देणारा मित्र हिंदुस्थानांतच काय, पण इतरही देशांत क्वचितच सांपडेल!" अशा आशयाचे अतिरिक्त आदरबुद्धि दर्शविणारे उद्गार काढले. कोणालाही काय, आपली स्तुति झाली तर ती बरीच वाटते; पण तिलाही कांहीं मर्यादा असलीच पाहिजे. या मर्यादेचा अतिक्रम झाला म्हणजे त्या स्तुतींतील स्वारस्य निघून जातें. स्नेह्यांनीं केलेली वरील प्रशंसा ऐकून हरिभाऊ अगदीं ओशाळून गेले! आपल्या स्तुतीचा असा परिणाम व्हावा असा त्या स्नेह्यांचा उद्देश असणें अर्थातूच शक्य नव्हतें; पण बोलण्याच्या भरांत त्यांना भान न राहिल्यामुळें चांगल्या बाजूला कां होईना, पण त्यांच्या हातून असा अतिरेक झाला. याचें परिमार्जन तर केलें पाहिजे; पण तें करावें कसें याचा हरिभाऊंना बराच विचार पडला.

× × ×

[१२८] **वस्त्रपूतं जलं पिबेत्!**

अध्यक्षस्थान स्वीकारतांना यासंबंधानें त्यांना चार शब्द बोलणें भाग पडलें. ते म्हणाले, "माझ्या मित्रांनीं माझ्याबद्दल जे अत्यादर-दर्शक उद्गार काढले त्यांवरून त्यांचें मजवरील अकृत्रिम प्रेम जसें व्यक्त झालें तशीच माझी असमर्थताही अधिक उठावांत दिसेल कीं काय याबद्दल मला स्वाभाविकच भीति वाटूं लागली! मृत माणसाची निंदा करणें जरूरच पडलें तर तीसंबंधांत जसा सुमार बाळगावा लागतो त्याप्रमाणेंच जिवंत माणसाच्या स्तुतीच्या बाबतींतही प्रमाणशीरपणा राखणें जरूर असतें. प्रेमातिशयाच्या भरांत माझ्या मित्रांना हें अवधान राहिलें नाहीं तरी त्याबद्दल त्यांचा उपहास करण्याचें कारण नाहीं.

वस्त्रपूतं जलं पिबेत् या न्यायानें तुम्हीं ही माझी स्तुति गाळून, छानून नंतरच तिच्यांतला अल्प ग्राह्यांश ग्रहण कराल असा मला पूर्ण भरंवसा वाटतो." हरिभाऊंच्या तोंडचेच हे शब्द असणें शक्य नाहीं. हा त्यांच्या बोलण्याचा फक्त आशय आहे.

× × ×

[१२९] **हिरा व कोळसा हे सोदरच होत !**

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल निषेध दर्शविण्याकरितां येथें वीस वर्षांपूर्वी किर्लोस्कर थिएटरमध्यें सभा भरली होती त्या सभेंत हरिभाऊंचें भाषण प्रशंसा करण्यासारखें झालें. हिंदुस्थान हा इंग्लंडच्या बादशहाच्या मुकुटांतील अत्यंत देदीप्यमान असा हिरा आहे असें नेहमीं सांगण्यांत येतें; पण याच हीरकोपमित देशांतील लोकांना आफ्रिकेंत खुद्द हिऱ्याच्या खाणींतच अस्पृश्याप्रमाणें वागविण्यांत येतें. हिरा व कोळसा यांचा उद्भव एकाच द्रव्यांतून होतो, हें लक्ष्यांत ठेवलें म्हणजे आफ्रिकेंतील गोरे लोक आम्हांला काळे हिरेच समजत असले पाहिजेत असेंच म्हणावें लागतें ! अशा आशयाचे हरिभाऊंनीं विचार प्रदर्शित केले तेव्हां श्रोत्यांनीं टाळ्या वाजवून भाषणाबद्दलची आपली गौरवबुद्धि प्रदर्शित केली.

× × ×

[१३०] **घाल टांगा हौदांत !**

हरिभाऊंचे एक मित्र एकदां परगांवाहून आले. त्यांनीं गांवांत येण्याकरितां टांगा केला. टांगेवाल्याला त्यांनीं पुष्करिणीच्या हौदाची खूण सांगितली होती. हौदापाशीं टांगा आल्याबरोबर "रावसाहेब, हा पुष्करणीचा हौद !" असें टांगेवाला म्हणाला. "हौद आला ना !

मग सांगतोस काय? घाल टांगा हौदांत!" असें या मित्रांनीं टांगेवाल्यास उत्तर केलें! "असें हो कां रावसाहेब बोलतां!" असें टांगेवाला अर्थात्‌च जरा अदबीच्या स्वरांत म्हणाला. यावर मित्र म्हणाले, "हौद आला हें मला दिसत का नाहीं? तुझा टांगा चालू दे. माझें उतरण्याचें ठिकाण आलें म्हणजे मी टांगा थांबवितोंच आहें. तुला उगीच का मी गांवांत फिरवीत बसेन?" मित्रांनीं टांगेवाल्याशीं झालेला हा संवाद हरिभाऊंना सांगितला तेव्हां त्यांना अर्थातच मोठी मौज वाटली!

x x x

[१३१] **त्याला शेपटी नाहीं ना?**

हरिभाऊंच्या एका स्नेह्यास अनेक व्यंगें असलेला असा एक मुलगा झाला. त्याचा चेहरा मोठा पाणीदार आणि देखणा होता; पण या चिंतामणीच्या (आईबापास यानें चिंता लावली म्हणून याचें नांव चिंतामणी ठेवलें होतें) गुडघ्याची वाटी मागच्या बाजूस व लवण पुढच्या बाजूस, हाताचे कोंपर व लवणी यांचीही अशीच उलटापालट झालेली, अशी शरीराची विपरीत घडण होती! हरिभाऊ याला अष्टावक्र म्हणत व "अष्टावक्र कसा आहे?" म्हणून रोज त्याचा समाचार घेऊन जात. मुलाचे वडील सचिंत दिसले म्हणजे हरिभाऊ त्यांना म्हणत, "मलाही उपजतांच गालावर लव असलेला व केसाळ असा एक मुलगा झाला होता. मला चिडविण्याकरितां माझ्या बहिणीनें जेव्हां त्याचें वर्णन दिलें तेव्हां त्याला शेंपटी नाहीं ना? असें मीं तिला म्हटलें तेव्हां तिचें चिडविणें थांबलें!" हरिभाऊंच्या मुलाप्रमाणेंच चिंतामणीही तीन आठवड्यांत इहलोक सोडून गेला!

x x x

[१३२] **सर्व विधुर पुनर्विवाहाशिवायच उजवले!**

हरिभाऊंचें प्रथम कुटुंब वारलें त्या सुमारास त्यांच्या तीनचार स्नेह्यांच्याही बायका वारल्या. हे सर्व स्नेही अर्थातच पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे होते. या सर्वांच्या बायका एकदम नाहींशा करण्यांत यांच्या पुनर्विवाहाच्या मताची कसोटी पहाण्याचाच ईश्वराचा हेतु होता कीं काय समजत नाहीं! या सर्वांचे डोळे हरिभाऊंकडे होते. दोन वर्षे थांबून हरिभाऊंनीं लग्न केलें; त्याबरोबर यांचींही यथाविधि कुमारिकांशीं लग्नें झालीं! यांत हरिभाऊंचे एक परिचित पण त्यांच्या-पेक्षां वयानें दहा वर्षांनीं मोठे असे एक गृहस्थ होते. आतां पुन्हा लग्नाच्या भानगडींत पडावयाचें नाहीं, आपली प्रियतमा गेली तिचेंच पुण्यस्मरण करून जन्म घालवावयाचा, असा ते आपला संकल्प सर्वां-जवळ सांगूं लागले. कोणी मुलगी आणलीच तर आतां मला त्या व्यापांत घालूं नका, असें ते मोठ्या काकुळतीनें म्हणत. तरी लोकांचा आग्रह चालूच होता. अशाच एका प्रसंगीं, “ मीं तुम्हांला आपला संकल्प शेकडों वेळां निक्षून सांगितला तरी माझ्या मागील तुमचा ससेमिरा कायमच आहे ” असें म्हणून “ बरं, मुलगी तरी किती वर्षांची आहे?” अशी हळूच ते पृच्छा करूं लागले. यानंतर लग्न न करण्याच्या आपल्या निश्चयाचें पालवपद कायम ठेवून “ तिचा रंग कसा आहे? ” “ कांहीं शिकलेली आहे किंवा नाहीं? ” असे वैतागांतच प्रश्न करतां करतां एका मुहूर्तावर तेही पुन्हा चतुर्भुज झाले! अशा रीतीनें हे सर्व विधुर पुनर्विवाहाशिवायच उजवले गेले!

x x x

[१३३] **भांबुर्ड्यांची बागेश्री!**

हरिभाऊंना गायनाभिरुचि होती व त्यांचा गळाही सुरेल होता.

येथील सुप्रसिद्ध अण्णा घारपुरे यांच्या येथें ते कांहीं दिवस जातही असत. पण अण्णा हे गायनापेक्षांही किंबहुना अधिक मधुर अशा गोष्टी सांगण्यांत प्रवीण असल्यामुळें या अवधींत गायनापेक्षां संगीत-विषयक आख्यायिकांतच हरिभाऊंचा अधिक वेळ जात असे. अण्णा हे मोठे चतुर व चाणाक्ष आहेत असें हरिभाऊ त्यांच्यासंबंधानें गौरवपर उद्गार काढीत. एकदां उत्तर हिंदुस्थानांतील एक तंतुकार येथें आले होते. त्यांनीं बिनादर एक राग वाजवून दाखविला. याचें नांव काय, असें अण्णांनीं विचारलें. तेव्हां या मियाभाईंनीं याला 'आग्र्याची तोडी' असें म्हणतात अशी थाप ठोकून दिली! यावर अण्णांनींही बीन वाजविलें. तेव्हां " आपण कोणता राग छेडीत आहां " असा खांसाहेबांनीं त्यांना प्रश्न केला. तेव्हां " याला भांबुर्ड्याची बागेश्री म्हणतात " असें अण्णांनीं ताबडतोब उत्तर दिलें! अण्णांची ही गोष्ट हरिभाऊ मोठ्या कौतुकानें सांगत.

x x x

[१३४] **म्हातारीचा जीव खालीं पडला!**

कॉलेजमधलीं पोरें जोड्यानें पाणी पितात असें हरिभाऊंच्या आजीला कोणीं सांगितलें. तेव्हां ती हरिभाऊंस म्हणाली, " यांना भांडीं मिळत नाहींत काय ?" म्हातारीचा हा साधाभोळा प्रश्न ऐकून हरि-भाऊंना खरोखरच मौज वाटली. त्यांनीं उत्तर केलें, " अग, जोड्यानें म्हणजे जोडे न काढतां ! मुलें जोड्यांचा उपयोग भांड्याऐवजीं करतात असा त्याचा अर्थ नाहीं." हें ऐकून म्हातारीचा जीव कांहींसा खालीं पडला !

x x x

[१३५] **अंजनगड व पुष्करतीर्थ!**

हरिभाऊ रोज सकाळीं फिरावयास जात. पण वाटेंत रा०सा० गोविंदराव कानिटकर किंवा रा० ब० अंजनगांवकर यांच्या घरापाशीं एकदां अडखळले कीं, त्या दिवसाच्या फिरण्याची समाप्ति तेथेंच होत असे! अशा प्रसंगीं "हरिभाऊ, आज फिरावयास गेलां होतां का?" असें कोणीं विचारलें कीं, "पुष्करतीर्थापर्यंत किंवा अंजनगडापर्यंत गेलों होतों" असें उत्तर देत! रा० सा० कानिटकर यांचें घर पुष्करणीच्या हौदाजवळ आहे त्याला अनुलक्षूनच "पुष्करतीर्थ" हा शब्द ते योजीत.

× × ×

[१३६] **यम खाणार काय!**

हरिभाऊंच्या मित्रपरिवारांत बरेच वयस्क असे एक तिडतिडित गृहस्थ असत. अगदीं तरुणाला लाजवील असा यांच्या अंगीं उत्साह असे. अशा दीर्घायुष्यांत यांच्या अंगीं इतकी उमेद दिसे याचें मंडळी अर्थातच कौतुक करीत असत. अशा वेळीं हरिभाऊ म्हणत "यांना यम नेऊन काय करणार! या हाडाच्या सांपळ्यांत त्याला खाद्य काय मिळणार आहे?"

× × ×

[१३७] **बिनपरीक्षावाल्यांचें मायपोट!**

येथील म्युनिसिपालिटींत जागा भरावयाच्या असल्या म्हणजे उमेदवार येत. त्यांना आपली परीक्षा काय झाली आहे असा प्रश्न केला म्हणजे त्यांतील कित्येक "परीक्षा पास झाली असती तर म्युनिसिपालिटीकडे नोकरीकरितां कशाला आलों असतों महाराज!" असें

सरळपणानें उत्तर देत. हें ऐकून म्युनिसिपालिटी म्हणजे बिनपरीक्षा-वाल्या लोकांचें व थकल्या-भागलेल्यांचें मायपोट आहे ही वस्तुस्थिति हरिभाऊंच्या दृष्टीसमोर आल्याशिवाय रहात नसे! सर्व शहरम्युनिसि-पालिट्यांची मिळून एक स्वतंत्र म्युनिसिपल सर्व्हिस करून तींत सरकारी नोकरीच्या धरतीवरच भरती करण्यांत यावी असें त्यांचें मत असे.

x x x

[१३८] **सर्टिफिकेट अध्यक्षांच्या हातांत दिलें!**

रा० कृ. पु. परांजपे हे येथील म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर असतां एका गृहस्थास म्युनिसिपालिटीच्या नोकरींतून काढण्याचा बूट चालला होता. तो कानांवर येतांच या गृहस्थांनीं बाबासाहेब परांजप्यां-ची गांठ घेतली व "मला दुसरीकडे एक नोकरी आली आहे, आपण मला एक सर्टिफिकेट दिलें तर फार बरें होईल." असें सांगितलें. आपल्या सर्टिफिकिटानें यांचें काम होत आहे तर तें देण्यास अनमान कशाला करा, या विचारानें रा० परांजपे यांनीं त्यांस सर्टिफिकेट दिलें. पुढें त्यांचे बडतर्फीचें प्रकरण जनरल बॉडीपुढें आलें त्या वेळेस हे गृहस्थ आपल्या कामास नालायक कसे आहेत याबद्दल परांजप्यांनीं खुलासा केला. तो करण्यांत आल्यानंतर या गृहस्थांनीं परांजप्यांकडून आपल्याला मिळालेलें सर्टिफिकिट हळूच अध्यक्षांच्या म्हणजे हरि-भाऊंच्या हातांत दिलें व सर्टिफिकेटांतील मजकूर सभेस निवेदन केला! म्युनिसिपालिटींतून या गृहस्थांना काढल्यानंतर त्यांना दुसरी-कडेही कोठें पाय ठेवावयास जागा राहूं नये अशी आसुरी इच्छा परांजप्यांची नसल्यामुळेंच त्यांनीं सर्टिफिकेट दिलें. त्या सर्टिफिकिटानें प्रस्तुत चर्चेत मुळींच बाध येत नाहीं असा हरिभाऊंनीं निर्णय देऊन या हरकतीचें निरसन केलें.

x  x

[१३९] **आलोंच हो मी! मांडा पानें!**

हरिभाऊ हे अगदीं सकाळीं एक स्नेह्यांचे येथें जात व त्यांना बरोबर घेऊन फिरावयाला निघत. एके दिवशीं या स्नेह्याच्या घरच्या मंडळींनीं पहाटेचा झुंझुरमासाचा बेत केला. तो या स्नेह्यांना म्हणजे घरच्या मालकाला आधीं न कळवितां सर्व तयारी झाली म्हणजे अचानक कळवावयाचा, असाही घरच्या मंडळींनीं कट केला होता. त्याप्रमाणें सर्व तयारी झाल्यानंतर ते आपापसांत म्हणूं लागले, "त्यांना उठवा आतां. हरिभाऊ यायच्या आंत त्यांना जेवून तयार ठेवलें पाहिजे." इतक्यांत हरिभाऊ बाहेरून ओरडले, "आलोंच हो मी. मांडा पानें!" घरांत सर्व एकच हंशा उडाला व त्या आनंदांत तो झुंझुरमास हरिभाऊंसह मजेंत पार पडला!

x x x

[१४०] **रात्रींतल्या रात्रींत कचरा काढून टाकला!**

गांवांतील कचरा वाहून नेण्याच्या कंत्राटासंबंधानें कांहीं वांधा उत्पन्न झाल्यामुळें बरेच दिवसांचा कचरा सांठून राहिला. याच सुमारास सॅनिटरी कमिशनर शहरच्या आरोग्याची व साफसफाईची पहाणी करण्याकरितां येणार असें समजलें. हरिभाऊंनीं एका हुषार कुंभाराला तयार करून सर्व कचरा एका रात्रींतल्यारात्रीं हलवून टाकला!

x x x

[१४१] **म्युनिसिपालिटीच्या बाहेर व आंत!**

आगगाडीच्या डब्यांत बसलेलीं माणसें नवीन येणाऱ्या माणसाच्या अंगावर "आतां का आमच्या डोक्यावर बसतोस काय?" असें एकजुटीनें ओरडत सुटतात. त्या माणसास एकदां जागा मिळून त्याचें

आसन स्थिर झालें म्हणजे तोही या कंपूत मिळून, पुन्हा कोणी नवीन माणूस आला म्हणजे आरडाओरड करून त्याला न येऊं देण्याची शिकस्त करतो. हरिभाऊ म्हणत, आगगाडीसंबंधांत ही जी स्थिति दिसून येते तशीच साधारण स्थिति म्युनिसिपालिटीचीही असते. मनुष्य जोंपर्यंत म्युनिसिपालिटीच्या बाहेर असतो तोंपर्यंत "शहराची ही काय गलिच्छ स्थिति ! या म्युनिसिपल कौन्सिलरांना फुकटचा मोठे-पणा मात्र मिरवायला पाहिजे ! शहरसुधराईकडे यत्किंचित् लक्ष्य पुरवितील तर शपथ !" अशी त्याची सारखी टकळी चालू असते. पण तोच गृहस्थ कौन्सिलर म्हणून म्युनिसिपालिटींत आला कीं, म्युनिसिपालिटीविरुद्ध होणारी अशाच प्रकारची टीका त्याला सर्वस्वी असह्य होऊन जाते !

× × ×

[१४२] **आपण कांहीं अगदींच अडाणी नाहीं !**

हरिभाऊंचे माधवराव रानड्यांच्याबद्दल फारच चांगलें मत असे. सर्व विषयांना पुरून उरणारा त्यांच्या बुद्धीचा प्रचंडपणा, मागें कितीही व्यवसाय असले तरी त्यांची दिसून येणारी निवांत स्थिति, आणि देशकार्याबद्दलची त्यांची उत्कट कळकळ या गुणांचें तर ते नेहमीं मोठ्या पूज्यबुद्धीनें वर्णन करीत. शहाणपणाचा तोरा मिरविणारा असा कोणी गृहस्थ त्यांच्याकडे गेला आणि त्याचें त्यांच्याशीं थोडें बोलणें चालणें झालें कीं, 'या पुरुषाच्या मानानें आपलें ज्ञान किती आकुंचित आहे' असें वाटून त्याचा अभिमान पार जिरून जावा ! उलटपक्षीं एखादा खेडवळ मनुष्य त्यांच्याकडे गेला कीं, माधवराव त्याच्याकडून खेड्यांतील स्थितीसंबंधानें बरीच माहिती काढून घेत व आपण श्रोते बनून त्यालाच बोलूं देत ! शेवटीं त्या मनुष्याला वाटे

कीं, आपण कांहीं अगदींच अडाणी नाहीं. येवढे रावसाहेब रानडे पण त्यांनींही आपलें बोलणें एक तासभर लक्ष्य लावून ऐकून घेतलें !

x x x

[१४३] **मेमोरियल तयार झालें !**

मनुष्य सांपडला, कीं माधवरावांनीं त्यांस वेठीला धरलेंच ! यासंबंधाचा स्वतः आलेला अनुभव हरिभाऊ सांगत असत. एकदां शनिवारीं सायंकाळीं ते माधवरावांच्या येथें गेले. थोडा वेळ कुशल प्रश्न झाल्यानंतर "हरिभाऊ, तें टेबलावरचें बाड घ्या पाहूं. पाहूं एकदां त्यांत काय आहे तें" असें माधवराव म्हणाले. हरिभाऊंनीं तें बाड काढलें आणि वरखालीं चाळून पाहिल्यासारखें केलें. "यांत कांहीं विशेष दिसत नाहीं" असें त्यांनीं उत्तर दिलें. "तेंच पाहूं ना आतां !" रावसाहेब म्हणाले. हें ऐकतांच "आपण आतां दावणींत सांपडलों, त्यांतून कांहीं आपली सुटका होणार नाहीं" अशी हरिभाऊंची खात्री झाली व त्यांनीं त्या बाडांतील पहिला कागद वाचावयास सुरुवात केली. सार्वजनिक सभेनें गांवोगांव पत्रें पाठवून तेथील पर्जन्यमान व स्थानिक पिकांची स्थिति यासंबंधानें माहिती मागविली होती. त्याप्रमाणें उत्तरें येऊन त्यांत बाजरी, तांदूळ, ज्वारी, गहूं, हरभरा वगैरे पिकांसंबंधींची ठिकठिकाणची हकीगत, त्याचप्रमाणें भाजीपाला, फळफळावळ यासंबंधींची माहिती दिलेली होती. हरिभाऊ जसजसें वाचीत तसतसें, त्याचा तपशीलवार तक्ता करण्याचें माधवरावांचें काम इकडे चालूच होतें. या पत्रांत कांहीं हंशील दिसत नाहीं असें म्हणून काम लवकर उरकण्याचा हरिभाऊंचा प्रयत्न चालूच होता; पण "एकदां वाचा तर खरें पाहूं त्यांत काय आहे तें" असें म्हणून माधवरावांनीं हरिभाऊंकडून एकामागून एक सर्व पत्रें वाचून घेतलीं. या कामास

रात्रीचे दहा वाजले. हरिभाऊ त्या रात्रीं माधवरावांच्याच घरीं वस्तीस राहिले. दुसऱ्या दिवशीं या तक्त्यावरून सरकाराकडे सारा तहकुबी-संबंधानें पाठवावयाचें मेमोरियल तयार करण्याचें काम चालू झालें. आणि तें संपतां संपतां रविवारची संध्याकाळ आली व मग हरिभाऊंची मुक्तता झाली ! कामाला लावलेलीं माणसें कंटाळून जावींत; पण एक संपलें कीं दुसरें, दुसरें संपलें कीं तिसरें, असा माधवरावांचा क्रम अखंड रीतीनें चाललेला असे. हरिभाऊ माधवरावांच्या अशा कितीतरी गोष्टी मोठ्या कौतुकानें सांगत.

# ८

**[१४४]** **स्वयंपाकांत खोडी काढूं नयेत!**

हरिभाऊंची जेवणांत फारशी खोड नव्हती. कोणाच्या घरच्या अन्नाची ते केव्हांही निंदा करीत नसत. अशी निंदा करण्यानें स्त्रियांच्या मनाला दुःख होतें तेव्हां ती करूं नये असें ते नेहमीं म्हणत असत. या साध्या गोष्टींतही त्यांचें स्त्रीदाक्षिण्य उत्कृष्टपणें दिसून येत असे. आपल्या स्वयंपाकास कोणीं नांवें ठेवल्यानें स्त्रियांना जितकें वाईट वाटतें तितकें तें दुसरें कशानेंही वाटत नाहीं! आपल्या अपत्याचें दुसऱ्यांनीं कोडकौतुक केलें म्हणजे स्त्रियांना जसें समाधान होतें तसेंच त्यांच्या स्वयंपाकासही बरें म्हटलें, निदान नांवें ठेवलीं नाहींत तर त्या संतुष्ट असतात, असेंही ते जेवणांत खोडी काढणारांना निक्षून सांगत असत.

× × ×

**[१४५]** **बारमहा गार पाणी!**

रंगोपंत अत्रे यांच्यावर हरिभाऊंचें फार प्रेम असे. फुरसतीच्या वेळेस रंगोपंत हरिभाऊंबरोबर छायेप्रमाणें असत. दर रविवारीं हरिभाऊंची त्यांची आनंदाश्रमांत पंगत होत असे. इतकेंच नव्हे तर एखाद्या रविवारीं हरिभाऊ पुण्यास नसले तरी रंगोपंतांचें आनंदाश्रमांतील रविवारचें जेवण टळावयाचें नाहीं! हा त्यांचा नियम कित्येक वर्षें अखंड रीतीनें चालू होता. पुढें पुढें वयाच्या मानानें हरिभाऊंना अद्वातद्वा खाल्लेलें सोसत नसे; पण मूळचे ते नामांकित जेवणारांपैकीं होते! विशेषतः चमचमीत पदार्थांची त्यांना विशेष आवड असे.

प्रसंगीं लिंबाएवढा तिखटाचा गोळा ते एका घासांत खात! मागल्या भांतांच्या वेळीं ताटांत अवशिष्ट राहिलेल्या सर्व पदार्थांचें एकत्रीकरण करून ते मोठ्या आवडीनें खात! या चमचमीत खाण्यामुळेंच कीं काय त्यांना फार गार पाणी प्यावयास लागे. त्यांच्याइतकें गार पाणी एखाद्यानें प्यालें तर त्याच्या दांतांच्या कळाच निघतील किंवा पोट गारठून जाईल इतकें गार पाणी ते बारमहा पीत असत!

× × ×

[१४६] **नुसत्या पहाण्यानेंच हुडहुडी भरे!**

त्याचप्रमाणें आजन्म थंड पाण्यानें स्नान करण्याची त्यांची वहिवाट असे. थंडीच्या दिवसांत लखनौ, लाहोर, अलाहाबाद, बनारस इत्यादि ठिकाणीं कॉंग्रेस वगैरेच्या निमित्तानें ते गेले तरी तेथेंही अगदीं सकाळीं उघड्यावर ते गार पाण्यानें स्नान करीत! अशा वेळीं त्यांच्याकडे पाहूनच इतरांना हुडहुडी भरावी असा त्यांचा हा स्नानाचा देखावा असे! ते बर्फ कडाकड फोडून खात व रात्रभर डोक्याला वारें लागेल अशा खुल्या जागेंत निजत!

× × ×

[१४७] **साखरेंतच चहा घाल!**

हरिभाऊंना जसे चमचमीत पदार्थ आवडत तशीच रंगोपंतांची गोडावर भक्ति असे. चहाकरितां ते अधिक साखर मागूं लागले म्हणजे साखरेंतच चहा घाल! असें हरिभाऊ त्यांना विनोदानें म्हणत असत. लाडू, पुरणाची पोळी, साखरभात वगैरे पक्वान्न रंगोपंतांच्या पानांत वाढलें म्हणजे हरिभाऊंच्या सांगण्यावरून त्यावर मूठ दोन मुठी साखर पेरण्यांत येत असे आणि मग तें रंगोपंतांच्या पोटांत जात असे! कधीं कधीं याचा अतिरेक होई तेव्हां रंगोपंतांना अर्थातच त्रास होई. पण

एकंदरीनें गोडावर त्यांचें लक्ष अधिक असे हें खरें. हरिभाऊ त्यांना आग्रहही फार करीत. रंगोपंतांचे वडील बंधु वारले त्या वेळेस त्यांनीं रंगोपंतांना हरिभाऊंच्या स्वाधीन केलें. हरिभाऊ त्यांच्याशीं खरोखरच बंधूप्रमाणें वागत. रंगोपंत फार सच्छील, निष्कपट व सरळमार्गी होते. हरिभाऊनंतर दोनच वर्षांनीं त्यांचेंही देहावसान झालें !

× × ×

[१४८] **यात्रेकरितां दोनशें रुपये !**

हरिभाऊंनीं आपल्या कादंबऱ्या अर्थलाभाकरितां कोणा संस्थानिकास किंवा लक्ष्मीपुत्रास कधीं अर्पण केल्या असें केव्हांही घडून आलें नाहीं. तरीसुद्धां त्यांच्या एका म्हणजे " मधली स्थिति " या पहिल्याच कादंबरीस अनाहूत रीतीनें पांचशें रुपयांचें बक्षिस मिळालें ! जव्हारचे राजे हे हरिभाऊंच्या चुलत्यांचे स्नेही होते. त्यांनीं हरिभाऊंची ही कादंबरी मागवून ती वाचली व वरीलप्रमाणें त्यांना बक्षिसादाखल रक्कम पाठविली. त्यांतून त्यांनीं चिमामावशीस रामेश्वराच्या यात्रेकरितां दोनशें रुपये दिले. हे पुस्तकाबद्दल मिळालेल्या बक्षिसांतील आहेत असें म्हातारीला कळलें तेव्हां तिला अतिशय आनंद झाला !

× × ×

[१४९] **दृष्टांतावर श्रद्धा !**

आनंदाश्रम सोडून स्वतंत्र व्हावें असें हरिभाऊंच्या मनांत वरचेवर येत असे. पण एके दिवशीं त्यांच्या चुलत्यांनीं स्वप्नांत येऊन " असा अविचार करूं नका " असें सांगितलें व तेव्हांपासून आनंदाश्रमावर त्यांचें मन स्थिर झालें. " स्वप्नो नु माया नु मतिभ्रमो नु " असे प्रसंग हरिभाऊंना अनेक प्रसंगीं आल्यामुळेंच त्यांचा स्वप्न, दृष्टान्त,

भविष्य काळांत घडणाऱ्या गोष्टींचें पूर्वदर्शन यांवर अश्रद्धा नसावी असें दिसतें.

× × ×

[१५०] **त्यांतही कांहीं तरी तथ्य आहे !**

सुप्रसिद्ध मॅडम ब्लॅव्हाट्स्की या सन १८९१ च्या मे महिन्यांत वारल्या. करमणुकीच्या दुसऱ्या वर्षीच्या तिसाव्या अंकांत त्यांच्या मृत्यूसंबंधानें लिहितांना हरिभाऊ म्हणतात, " पण येवढी गोष्ट खरी कीं ज्या मंत्र, योग वगैरे गूढ शास्त्रांवर अलीकडील विद्वान लोकांचा मुळींच विश्वास नसे, किंबहुना जीं त्यास सब झूट वाटत असत त्या शास्त्रांत कांहीं तरी तथ्य असेल असे विचार तिच्यामुळें आमच्या विद्वानांच्या डोक्यांत येऊं लागले यांत संशय नाहीं."

× × ×

[१५१] **वामकुक्षींतलें स्वप्न !**

करमणुकीच्या चवथ्या वर्षाच्या अंक ३३ पासून अंक ४० पर्यंतच्या प्रत्येक अंकांत स्वप्न खऱ्या झालेल्या विलक्षण हकीकती नांवनिशीवार प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांतील एका अंकांत परशुराम अमृत नागपूरकर, ( बडोदें प्रांत ) विजापूर, यांचें एक पत्र आहे. त्यांत, " दवाखान्याच्या मागल्या बाजूच्या तळ्यांत दोन मुलें पडून मेलीं " असें त्यांना दुपारची वामकुक्षी घेत असतांना स्वप्न पडलें व तत्काळ तें खरें ठरल्याचेंही त्यांच्या प्रत्ययास आलें असा मजकूर आहे !

× × ×

[१५२] **बापू लंगडा वारला !**

याच वर्षाच्या अंक ३६ मध्यें कराचीची एक गोष्ट आहे. त्यांत " अरे ! ज्यास आम्ही नेण्यास आलों तो हा बापू नव्हे. घर चुकलें. "

असें यमदूत बोलल्याचें बापूस स्वप्न पडलें आणि त्याच वेळीं 'बापू लंगडा' नांवाचा दुसरा बापू वारला इत्यादि हकीकत आहे.

× × ×

[१५३] **शेंडे शास्त्र्यांचा मृत्यु!**

अंक ३८ मध्यें रा० वा. गो. आपटे यांचें पत्र आहे. त्यांत "आपली आई एकाएकी आजारी पडल्याचें आपल्याला स्वप्न पडलें व तें खरें झालें" असा मजकूर आहे. अंक ४० मध्यें अशाच प्रकारचीं सहा पत्रें छापलीं आहेत. त्यांत मुजुमदार म्हणून एका गृहस्थाच्या पत्रांत, शेंडेशास्त्र्यांचा मृत्यु, त्या गृहस्थांना त्याजबद्दलचें आधींच स्वप्न पडून घडला असल्याचें लिहिलें आहे.

× × ×

[१५४] **असल्या गोष्टी तुच्छ करण्यासारख्या नसतात!**

असे कोणास अनुभव आले असतील तर ते त्यांनीं आम्हांस अवश्य कळवावेत असें करमणुककर्त्यांनीं अंक ३३ मध्येंच जाहीर केलें होतें. अशी विनंति करतांना ते म्हणतात, "आत्म्याचें जग म्हणून कांहीं भिन्न आहे कीं काय, याविषयीं विवेचन करण्यास अशा गोष्टी जितक्या मिळतील तेवढ्या अवश्य पाहिजेत. आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं अशा तऱ्हेच्या गोष्टी ऐकल्या असतील; परंतु त्या जर अगदीं खात्रीलायक विश्वासाच्या असतील तर आम्ही फार आभारी होऊं. आमच्यांत असले अनुभव नमूद करण्याची पद्धति नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. असल्या गोष्टी केवळ तुच्छ करण्याजोग्याच असतात असें नाहीं. त्यांत विचार करण्याजोग्या गोष्टी पुष्कळ असतात."

× × ×

[१५५] **कादंबऱ्यांतील स्वप्नसृष्टि!**

यावरून यासंबंधांतील हरिभाऊंची भूमिका स्पष्ट रीतीनें लक्ष्यांत येते. त्यांच्या सामाजिक काय किंवा ऐतिहासिक काय सर्वच कादंबऱ्यांत प्राय: स्वप्न, दृष्टान्त किंवा साक्षात्कार यांचीं वर्णनें आलीं आहेत. वर जे प्रसंग दिले आहेत त्यांवरून अगदीं तरुणपणांतच हरिभाऊंचा कल या गोष्टींवर विश्वास ठेवण्याकडे कसा होता हें दिसून येतें. त्यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो', पासून 'कर्मयोगा'पर्यंतच्या सर्व कादंबऱ्यांतून असे प्रकार वर्णिलेले आहेत, यावरून या प्रकारांच्या खरेपणाबद्दलची भावना त्यांच्या मनांत अगदीं अखेरपर्यंत जागृत असावी असें दिसतें.

x x x

[१५६] **मुलगी खुशाल आहे ना?**

त्यांच्या वयाच्या पन्नाशीच्या सुमारास त्यांची मुलगी आपल्या आईबरोबर नागपुरास आजोळीं गेली होती. ती गेल्यानंतर कांहीं दिवसांनीं ती आजारी आहे असें हरिभाऊंस स्वप्न पडलें. त्याबरोबर त्यांनीं ताईच्या प्रकृतीसंबंधानें विचारपूस करण्याकरितां नागपुरास तार केली. मुलगी खुशाल आहे असें त्यांना तारेनेंच उत्तर आलें तेव्हां त्यांचा जीव खालीं पडला! इतक्या उतावीळपणानें मुलीच्या प्रकृतीची खुशाली आणविण्यांत मुलीवरील त्यांचें प्रेम हें तर प्रमुखत्वानें कारण होतेंच. पण त्यांत त्यांचा स्वप्नावरील विश्वास, निदान त्याच्या खरेखोटेपणाबद्दलची अनिश्चयाची भावनाही व्यक्त होते.

x x x

[१५७] **पुढारी होण्याची योग्यता!**

लॉर्ड सीडनहॅम यांनीं युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांतून इतिहास

विषयाचें उच्चाटन करण्याची शक्कल काढली. त्या वेळेस त्यांनीं एक एक गृहस्थांना आपल्या मुलाखतीस बोलावून सेनेटमध्यें हा प्रश्न येईल त्या वेळेस इतिहासास गचांडी देण्याच्या बाजूस आपण हातभार लावला पाहिजे, अशी कित्येकांना भीड घातली. या प्रकरणाचा निर्णय लॉर्ड सीडनहॅम यांच्या मनोदयाप्रमाणें व्हावा अशाबद्दल इतरही हुद्देदार युरोपियन अधिकाऱ्यांनीं खटपट केली. पण सेनेटच्या सभेंत सर फेरोजशहा मेथा यांनीं उत्कृष्ट भाषण करून लॉर्ड सीडनहॅम यांचा हा सर्व व्यूह ढांसळून पाडला. हरिभाऊ त्या वेळीं सेनेटचे सभासद होते. सर फेरोजशहा हे पुढारी होण्याच्या योग्यतेचे खरोखरच कसे आहेत ही गोष्ट या प्रसंगीं माझ्या मनावर पूर्णपणें ठसली, असें हरिभाऊ म्हणत. त्यांच्या भाषणांतील ओजस्विता व श्रोत्यांचें हृदय हलवून सोडण्याचें सामर्थ्य यांची हरिभाऊंनीं फारच प्रशंसा केली !

x x x

[१५८] **कायदाच झाला तर गोष्ट निराळी !**

हरिभाऊ कधींही विजार घालीत नसत. सेनेटच्या वगैरे बैठकीस ते नित्याच्या पोषाखांत जात. एके दिवशीं सर नारायणराव चंदावरकर त्यांना म्हणाले, " हरिभाऊ, सर्वांनीं पॅंट-बूट घालून आलेंच पाहिजे असा आतां कायदा झाला पाहिजे ! " त्यावर हरिभाऊंनीं उत्तर केलें, तसा कायदाच झाला तर उपाय नाहीं ! पण तोंपर्यंत मी आपल्या पोषाखांत फरक करणार नाहीं.

x x x

[१५९] **बाईंना मुक्कामावर पोहोंचविलें !**

एकदां एक बाई स्टेशनहून गांवांत छकड्यामधून येत होत्या. बाईंनीं आपल्या बिऱ्हाडाचा पत्ता बुधवारांत सांगितला होता. छकडे-

वाल्यानें बुधवारांत छकडा उभा केला व बाईशीं भांडण सुरू केलें. बिचारी बाईमाणूस ! ती घाबरून गेली व अगदीं रडकुंडी आली. हरिभाऊ आपल्या एका स्नेह्यासह त्या रस्त्यांतून जात होते. त्यांच्या दृष्टीस हा प्रकार पडला त्याबरोबर त्यांनीं एक हमाल करून बाईचें सामान खालीं उतरविलें व त्यांना मुक्कामावर पोहोंचवून दिलें !

× × ×

[१६०] **छत्री उघडली नाहीं !**

हरिभाऊ एकदा कांहीं प्रसंगानिमित्त पुण्यापासून एक दोन मैलांवर गेले होते. त्यांच्याबरोबर त्यांचे पांचचार सवंगडी होते. इतक्यांत अचानक पाऊस पडूं लागला. हरिभाऊंच्याजवळ छत्री होती; पण बाकी कोणाजवळही नव्हती. हरिभाऊ छत्री न उघडतांच पावसांत भिजत चालूं लागले. तेव्हां 'तुम्ही आपली छत्री उघडून चाला', असा मंडळींनीं बराच आग्रह केला; पण बाकीच्यांना पावसांत ठेवून स्वतः छत्रीखालीं चालणें त्यांना अर्थातच पसंत पडलें नाहीं.

× × ×

[१६१] **खरबुजाचें सरबत**

एकदां आनंदाश्रमांत खरबुजासंबंधानें गप्पा निघाल्या असतां एक गृहस्थ म्हणाले, खरबुजांत साखर मिसळून तें खाल्लें तर कॉलरा होतो. "एकानें दोनतीन खरबुजें आणलीं होतीं, तीं पिठाळ व बेचव निघालीं. तेव्हां त्यानें त्यांत साखर घालून त्याचें सरबत केलें. तें स्वतः घेतलें व घरांतील सर्व मंडळीस दिलें. थोडा वेळ गेला तोंच त्यांताल दोनतीन माणसें कॉलऱ्यानें आजारी पडलीं." अशी त्या गृहस्थानें प्रत्यक्ष माहीत असलेली एक गोष्ट मंडळींत सांगितली. दोनतीन तासांपूर्वीं हरिभाऊ व त्यांचे पांचसहा मित्र यांनीं खरबुजाचें सरबत घेतलें होतें।

यांपैकीं कॉलऱ्यानें पडण्याची कोणावर पाळी येते अशी ज्याला त्याला दहशत वाटूं लागली! वरील वृत्तान्त ऐकल्याबरोबर एक दोघांच्या पोटांत गुरगुरूंही लागलें! पण दैवयोगानें कॉलरा होण्यापर्यंत कोणाचीही मजल पोहोंचली नाहीं!

## ९

[१६२] **मानसिक सहस्रभोजन !**

मनुष्याला कोणत्याही गोष्टीची ददात नसावी, सर्व वस्तूंची समृद्धि असावी असा गप्पांत विषय निघाला म्हणजे हरिभाऊंच्या स्नेह-परिवारापैकीं कोणास तरी अशा स्थितीचें शब्दचित्र कथन करण्याची बुद्धि व्हावयाची. कामकाजाकरितां किंवा इतर कारणाकरितां आपलें ज्या ज्या गांवीं वास्तव्य होण्याचा संभव असेल तेथें तेथें आपला एक बंगला असावा, बंगल्याभोंवतीं बाग असावी; मोटारी, अंगांत घालावयाचे कपडे, जेवणाखाण्याची सोय वगैरे सर्व तरतूद जागच्या जागीं जय्यत असावी, असें कोणी या स्थितीचें चित्र रेखाटलें कीं, दुसरा एखादा मध्येंच म्हणे कीं, इतके बंगले, बगीचे आणि मोटारी असण्याचें कांहीं कारण नाहीं. मुख्य मुख्य ठिकाणीं साधारण तरतूद असली म्हणजे बस्स आहे. तिसरा यालाही कांहीं बाबतींत मोडून काढी. चवथा यांतही आणखी किती काटकसर करतां येईल याबद्दल आपलें म्हणणें पुढें मांडी. सुस्थितीच्या केवळ काल्पनिक चित्राबद्दल असा वाद माजलेला पाहून हरिभाऊ म्हणत, "मानसिक सहस्र-भोजनांतही आगांतुक घ्यावयाचा किंवा नाहीं याबद्दल वाद कशाला? बोलून चालून कल्पनाच ही ! तिच्यांतही कंजुषपणा दाखविण्याचा आग्रह कां धरावा ?"

× × ×

[१६३] **घरच्या घरीं फायदा मुरला !**

शिळोप्याच्या गप्पांत सर्व विषयांना साधारण मुक्तद्वारच असतें.

त्यांत कोणत्या वेळेला कोणता विषय निघेल याचा कांहीं भरंवसा नसतो ! ब्राह्मणांनीं आतां व्यापारधंद्यांत पडलें पाहिजे असें सहज बोलणें निघालें असतां हरिभाऊंच्या एका स्नेह्यांनीं प्रत्यक्ष घडलेली एक गमतीची गोष्ट सांगितली. एका गृहस्थाजवळ एकदम एक दोन हजार रुपयांची रक्कम आली. व्यापारदेपार करण्याची आपली फारा दिवसांची इच्छा सफळ होण्याचा योग आलेला पाहून या गृहस्थास अर्थातच आनंद झाला. त्यानें सुगीच्या दिवसांत या सर्व रकमेचे तांदूळ खरेदी करून घरीं ओटीवर तांदळाची ठेक लावून दिली. या गृहस्थाच्या गांवीं प्रत्येक गुरुवारीं मोठा बाजार भरत असे. त्या दिवशीं आपल्या मुलाला बाजारांत पाठवून हे तांदळाच्या भावाचा शोध आणवीत असत. मुलगा आला कीं "राम्या, आज काय भाव पडला आहे बुवा !" म्हणून विचारीत. राम्यानें सांगितलें कीं, "दादा, आज पांच शेर भाव आहे." त्याबरोबर हे गृहस्थ म्हणत, "आपल्याला तांदूळ आठ शेरांनीं पडले आहेत ना ? मग फोड पोतीं आणि त्यांतले रुपयामागें तीन शेर तांदूळ फायदा म्हणून बाजूला काढ." हे फायद्याचे तांदूळ बाजूला निघाले कीं, त्याचें दुसऱ्या दिवशीं ब्राह्मण-भोजन व्हावयाचें ! याप्रमाणें दर आठवड्यास फायद्यांत ब्राह्मणभोजन घालण्याचा क्रम सुरू राहून चार दोन महिन्यांतच फायदा आणि त्याबरोबर खरेदी केलेले तांदूळ दोन्ही घरच्या घरींच मुरलीं ! तांदळास बाजारचें दर्शन एकदांसुद्धां घडलें नाहीं !

× × ×

[१६४] **याचें नांव पुस्तकावरील प्रेम**

हरिभाऊ सहज एका गृहस्थांच्या घरीं गेले. तेथें त्यांना कांहीं पुस्तकें दिसलीं. त्यांतलें एक नवीनच पुस्तक हातांत घेऊन हरिभाऊ

म्हणाले, " पुस्तक बरं दिसतंय हो !" त्यावर ते गृहस्थ म्हणाले, " बरं म्हणजे काय, उत्तमच आहे ! आपल्याला पाहिजे तर घेऊन जा !" हरिभाऊंनीं तें पुस्तक घरीं आणलें तों त्याचीं पानेंही फाडलेलीं नाहींत असें त्यांना दिसून आलें ! जवळच एक स्नेही होते त्यांना हरिभाऊ म्हणाले, " पाहिलंत का हें पुस्तक ! हें उत्तम आहे असा याच्या मालकांनीं आमच्याजवळ अभिप्राय दर्शविला ! पुस्तका-बद्दल त्यांचें इतकें प्रेम कीं, त्याचीं पानें फाडूनसुद्धां त्यांनीं त्याला दुखावलें नाहीं ! " याचें नांव पुस्तकावरील प्रेम !"

× × ×

[१६५] **अरसिकेषु कवित्वनिवेदनम् !**

एखाद्या पुस्तकांत उत्तम भाग निघाला म्हणजे तो समीपवर्ती मित्रास वाचून दाखविण्याचा हरिभाऊंस अनावर मोह होत असे. चार दोन ओळी वाचून झाल्या कीं, " हरिभाऊ, आतां ऑफिसची वेळ झाली ! साहेब अगदीं अकराच्या ठोक्याला येतो." असें म्हणून किंवा इतर असेंच कांहींतरी कारण सांगून ते गृहस्थ जावयास निघाले, कीं हरिभाऊंचा अर्थातच हिरमोड होई. " अरसिकेषु कवित्व-निवेदनम् शिरसि मा लिख मा लिख मा लिख " असे उद्गार काढण्याचे त्यांच्यावर अनेक प्रसंग येत. यांची साहित्यसेवा म्हणजे साहेबसेवा असेंही अशा मित्रांच्यासंबंधानें हरिभाऊ कित्येक वेळां विनोदानें म्हणत !

× × ×

[१६६] **साहेब राजी रखना बे !**

हरिभाऊंच्या मित्रमंडळांत हुद्देदार असे कित्येक गृहस्थ असत. त्यांपैकीं कोणाला बढती मिळाली कीं, हरिभाऊ त्यांचें अभिनंदन करीत. एका मित्रास ठराविक क्रमाच्या मानानें लवकर लवकर बढती

मिळत गेली. तेव्हां " आपण पुष्कळांना मागें सारून पुढें गेलांत ! " असे हरिभाऊंच्या तोंडून साहजिकच संतोषदर्शक उद्गार निघाले. ते ऐकून हे गृहस्थ म्हणाले, " बंदे हुषार रहिना बे, **साहेब** राजी रखना बे " हा साधुवर्य कबिराचा गुरुमंत्र लक्ष्यांत ठेवून आम्ही वागतों त्याचेंच हें फळ होय. कबिरांचे 'साहेब' म्हणजे ईश्वर आणि यांचा ईश्वर साहेब !

× × ×

[१६७] **स्वभाव-खातें**

स्वभावाला औषध नाहीं, असे संभाषणाच्या संदर्भानें कोणाच्या तोंडून उद्गार निघाले कीं, हरिभाऊ एक गोष्ट सांगत असत. एक धनाढ्य पेढीवाला होता. संध्याकाळीं पेढीवर येऊन व मुनिमाचा डोळा चुकवून एक दहा रुपयांची नोट लांबवावयाची असा या पेढीवाल्याच्या मुलाचा रोजचा क्रम असे. प्रथम प्रथम ही गोष्ट मुनिमाच्या लक्ष्यांत न आल्यामुळें संध्याकाळीं शिल्लक जमविण्याच्या वेळीं त्याचा गोंधळ उडत असे. यजमानाचे चिरंजीव संध्याकाळीं येतात ते तर कांहीं घालमील करीत नसतील ना ? अशी त्याला शंका येऊन एके दिवशीं त्यानें त्यांच्यावर डोळा ठेवला; तों खरा प्रकार त्याच्या निदर्शनास आला. कुंपणच शेत खाऊं लागलें तर आतां कोणती युक्ति लढवावी हा त्याच्यापुढें प्रश्न उभा राहिला. शेवटीं त्यानें कीर्दींत एक स्वभावखातें सुरू केलें व त्यांत रोज दहा रुपये खर्ची घालण्याचा क्रम चालू केला. कांहीं दिवसांनीं शेटजी जमाखर्च तपासूं लागले तेव्हां बरीच रक्कम 'स्वभाव खातें' या सदराखालीं खर्ची पडलेली त्यांना दिसून आली ! हें लचांड काय आहे ? असा त्यांनीं मुनिमास प्रश्न केला, तेव्हां मुनिमानें वस्तुस्थिति त्यांना सांगितली. शेटजींना

चिरंजिवांच्या हाताळपणाबद्दल थोडी कल्पना होतीच. तेव्हां मुनिमाच्या बोलण्याबद्दल बेभरंवसा धरण्याचें त्यांना अर्थातच कारण पडलें नाहीं. खात्याचें नांव ठेवण्यासंबंधांत मुनिमानें जो मार्मिकपणा दाखविला त्याचें मात्र त्यांना कौतुक वाटलें !

x x x

[१६८] **पांचशें रुपयांत कसें होत असेल !**

हरिभाऊंच्या एका संपन्न स्नेह्यांना नेहमीं आपल्या घरची कर्मकहाणी सांगण्याची संवय असे. घरांत "आजारीपण असल्यामुळें फार खर्च झाला; सर्व मंडळी एका आप्ताच्या येथें लग्नाला घेऊन गेलों त्यामुळेंही बराच खर्चांत आलों; पाहुणेमंडळींनीं तर अगदीं दमवून सोडलें आहे; पाहुणा नाहीं असा एक दिवस जात नाहीं, असें त्यांचें नेहमीं रडगाणें चालत असे. एके दिवशीं यांचें हें पुराण अंदाजापेक्षां लांबलेलें पाहून हरिभाऊंचे दुसरे एक मित्र त्यांना म्हणाले, "दादासाहेब, आपली ही अशी खर्चाची ओढ होत असेल हें का सांगायला पाहिजे का ? आपलें स्मरण झालें कीं, खरोखरच पोटांत अगदीं भडभडून येतें ! दरमहा पांचशें रुपयांत हा गृहस्थ चार-पांच माणसांचा प्रपंच कसा हाकीत असेल असा विचार येऊन आपल्याबद्दल अगदीं हळहळ वाटते ! आपलें कांहीं माझ्यासारखें नाहीं. मला दरमहा चांगले पन्नास रुपये मिळतात व माझ्या प्रपंचांत आपल्याहीपेक्षां दोन तीन माणसें अधिकच आहेत. माझें साहजिकच ठीक चाललें आहे. पण आपल्याकडे पाहून मात्र जीव अगदीं कळमळून जातो !" या मित्रांची ही मात्रा बसल्याबरोबर दादासाहेब यानंतर रडगाणें गाण्यासंबंधांत अर्थातच जरा अधिक खबरदारी घेऊन वागूं लागले ! या मार्मिक प्रसंगाचें हरिभाऊंना नेहमीं स्मरण होत असे.

x  x

[१६९] **खापरें तरी फुटकीं वापरूं नका !**

हरिभाऊंचें आपल्या मुलीवर अत्यंत प्रेम असे. कढी, अंजीर अंबा, केळें, चहा वगैरे तिला फार आवडणाऱ्या वस्तूंना तिच्या पश्चात् त्यांनीं स्पर्शही केला नाहीं! पण त्यापूर्वीं त्यांच्या येथें चहाचें प्रस्थ विशेष वाखाणण्यासारखें असे. चहा पिणाराचे येथें एकादी तरी टवका गेलेली बशी किंवा चीर गेलेला पेला हा असतोच ! हरिभाऊ मात्र, भंगलेली मूर्ति पूजेच्या उपयोगांत आणीत नाहींत त्याप्रमाणेंच तडा गेलेल्या कप-बशांना ताबडतोब रजा देत. "खापराचीं भांडीं वापरतां तीं तरी फुटकीं वापरूं नका" असें त्यांची आजी म्हणत असे त्याचें यासंबंधांत त्यांना नेहमीं स्मरण होई.

× × ×

[१७०] **पेल्याच्या खांचेंतील रोगबीज !**

चहाचे फुटके पेले वापरण्यासंबंधांत प्रत्यक्ष घडलेली एक गोष्ट हरिभाऊ सांगत असत. येथें एक गृहस्थ ऑफिसमधून परत येतांना एका उपाहारगृहांत चहा घेण्यास जात असत. हा त्यांचा क्रम कित्येक दिवस नियमानें चालू होता. असें चालतां चालतां एके दिवशीं त्यांच्या ओंठांस कंड सुटूं लागली; व थोडक्याच दिवसांत तेथें एक लहानशी जखमही उद्भवली. जखमेला एरव्हींचीं औषधें करून पाहिलीं; पण गुण कांहीं केल्या येईना. शेवटीं ती जखम त्यांनीं एका डॉक्टरना दाखविली. त्यांनीं ती खरवडून पाहिली. तों तींत एका स्पर्शजन्य रोगाचें बीज असल्याचें त्यांना आढळून आलें ! हें बीज यांनीं कोठून पैदा केलें असेल असा तर्क करतां करतां ज्या हॉटेल-मध्यें हे गृहस्थ चहा प्यावयास जात असत तेथील पेले तपासून पहावे असा विचार डॉक्टरांच्या मनांत आला व त्याप्रमाणें त्यांनीं पेल्यांची

तपासणी केली. तों वरचा कांठ फुटलेल्या दोन-तीन पेल्यांवर अगदीं ओंठ लावण्याच्या जागीं पडलेल्या खाचींत हीं रोगबीजें असल्याचें त्यांना आढळून आलें ! हॉटेलमध्यें चहा पिण्यांत प्रसंगीं केवढा धोका उत्पन्न होण्याचा संभव असतो याचा या प्रसंगावरून चांगलाच बोध घेण्यासारखा आहे !

× × ×

[१७१] **घोर हा नको फार कष्टलों !**

आनंदाश्रमांत उत्सवानिमित्त कीर्तन होतें; त्याला हरिभाऊंची कित्येक मित्र-मंडळी आली होती. कीर्तनोत्तर कांहीं वेळ गप्पा होऊन कांहीं मंडळी तेथेंच दिवाणखान्यांत निजली. सकाळीं मंडळी उठल्या-नंतर " का, झोंप कशी काय आली ? " असें हरिभाऊंनीं विचारलें. तेव्हां त्यांतील एक गृहस्थ म्हणाले, " आपल्याला तर एक मिनिट-सुद्धां झोंप आली नाहीं." हें ऐकून दुसरे एक गृहस्थ म्हणाले, " अहो, त्यांना झोंप येईल कशी ? यांची सारी रात्र घोरण्यांत गेली ! झोंपेला अवसर कोठें होता ? " हेंच अनुसंधान घेऊन तिसरे गृहस्थ म्हणाले, " पुष्कळ घोरणारे पाहिले. पण हा नमुना कांहीं वेगळा आहे ! यांचें घोरणें ऐकून 'घोर हा नको फार कष्टलों !' हे गोसावीनंदन कवीचे उद्गार माझ्या तोंडून कितीतरी वेळां निघाले ! आणि शिवाय गृहस्थ म्हणतो एक मिनिटसुद्धां झोंप आली नाहीं म्हणून ! " या संवादानें मंडळींत एकच हंशा पिकावा यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

× × ×

[१७२] **स्पिरिटसारखा जळून जाईल !**

गांवांतील अमुक माणूस फार दारू पितो अशाबद्दल हरिभाऊंच्या स्नेहीमंडळींत गोष्टी निघाल्या म्हणजे, " शेवटीं त्याला सर्पणही

लागावयाचें नाहीं ! नुसती काडी लावली कीं, स्पिरिटसारखा जळून जाईल ! " असें त्यांचे एक मित्र म्हणत तेव्हां मंडळींत एकच हंशा पिके !

× × ×

[१७३] **पोटाचें आयतेंच टेबल झालें !**

हरिभाऊ उदराच्या विकारानें शरपंजरीं पडले होते तरी त्यांच्या हातांत प्रायः एखादें पुस्तक असेच. दुखण्याच्या व्यथेंतून थोडी उसंत सांपडली कीं, ते पुस्तकावरून नजर फिरविण्यास विसंबत नसत ! वाचनाचा हा त्यांचा व्यासंग खरोखरच विस्मयकारक होता ! पुस्तक पोटावर ठेवून वाचीत असतां " पोटाला त्रास होत नाहीं ना ? " असें कोणी म्हणाल्यास " छे मुळींच नाहीं ! पोटाचें आयतेंच टेबल झालें आहे " असें ते उत्तर देत. त्यांची मनःशांति व वाचनाची अभिरुचि यांपैकीं कोणत्या गुणाचें अधिक कौतुक करावें याबद्दल निर्णय करणें अशा प्रसंगीं खरोखरच कठिण पडे !

× × ×

[१७४] **एकच अपवाद !**

हरिभाऊंनीं लिहिलेल्या गोष्टी आपल्या मासिकांतून प्रसिद्ध होऊन त्याचा दर्जा वाढावा अशी इच्छा बाळगून अनेक मासिककार त्यांना एखादी गोष्ट देण्याबद्दल स्वाभाविकच विनंति करीत; पण करमणुकी-मुळें 'घरचें झालें थोडें आणि व्याह्यांनीं धाडलें घोडें' अशी हरि-भाऊंची स्थिति असल्यामुळें म्हणा किंवा इतर कारणांमुळें म्हणा त्यांना ही विनंति मान्य करणें केव्हांही शक्य झालें नाहीं. याला अपवाद एकच आणि तो आनंद मासिकाचा होय. आनंदाच्या दिवाळी अंकाकरितां हरिभाऊंनीं एखादी गोष्ट लिहावी अशाबद्दल त्या

मासिकाचे संपादक कै० रा० वासुदेवराव आपटे यांनीं त्यांचा पिच्छा पुरविला; पण हरिभाऊ प्रसन्न होण्याचें कांहीं चिन्ह दिसेना ! शेवटीं नर्कचतुर्दशीच्या दिवशीं पहांटे वासुदेवराव अगदीं खणपटीसच बसले; तेव्हां हरिभाऊंनीं त्यांना एक लहानशी गोष्ट ताबडतोब म्हणजे अर्ध्या तासांतच लिहून दिली !

× × ×

[१७५] **मामाची देणगी !**

ही गोष्ट आनंद मासिकाच्या सन १९१२ मधील नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. गोष्ट अर्थातच पांच-चार पानांची छोटीच आहे. पण तींतही हरिभाऊंची कल्पकता व बालबोधता उत्कृष्ट रीतीनें दिसून येते. ही गोष्ट 'मामाची देणगी' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झाली आहे.

× × ×

[१७६] **आळसासुराचा शत्रु !**

या गोष्टीचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें आहे :—आनंद नांवाचा एक मुलगा होता. " यंदांच्या दिवाळींत मी तुला फटाकडे देणार नाहीं. पण जिचा तुला बरींच वर्षें उपयोग होईल अशी एक वस्तु देईन." असें त्याच्या मामानें सांगितलें. ही वस्तु काय असावी याबद्दल आनंदानें अनेक तर्क केले, घरांतल्या माणसांनाही विचारून पाहिलें पण ती कोणासही ओळखतां आली नाहीं. वस्तु समजण्याबद्दल आनंद फारच उत्सुकता दाखवूं लागला. तेव्हां मामानें त्याला एवढेंच सांगितलें कीं, " ती वस्तु नर्कचतुर्दशीच्या दिवशीं पहांटे आपण होऊनच तुला उठवून 'हें पहा मामानें दिलें तें' असें तुला म्हणेल." शेवटीं चतुर्दशीची पहांट झाली तों आनंदाला एक स्वप्न पडून त्या

स्वप्नांत " थंडीचा कशाला उठतोस ? आपली झोप घ्यावी तें चांगलें." असें नरकासुर आपल्याला सांगत आहे असा त्याला भास झाला. नरकासुर असें सांगून तेथून जाऊं लागला तोंच श्रीविष्णूनें त्याच्या डोक्यांत गदा घालून त्यास ठार केलें. " मीं तुला एका जन्मीं मारलें तेव्हांपासून तूं असें आळसासुराचें मोहक रूप घेऊन या बिचाऱ्या आनंदासारख्या मुलाला आळशी बनवून आपल्याकडे ओढतोस काय ?" असेंही या वेळीं श्रीविष्णूंनीं त्याला बजावलें. इतक्यांत अलार्म असलेल्या नव्या कोऱ्या घड्याळाचा गजर होऊन आनंद जागा झाला व " मी जी वस्तु तुला देईन म्हणून म्हणत होतों ती हीच ! ही वस्तु आळसासुराला गचांड्या देऊन रोज तुला लवकर उठवील व आपलीं सारीं कामें वेळच्या वेळीं करावयास तुला शिकवील !" असें मामांनीं त्याला सांगितलें. फटाक्यापेक्षां ही वस्तु किती तरी उपयोगी आहे असें वाटून आनंदाला खरोखरच आनंद झाला !

x x x

[१७७] **श्राद्धाची तिथि टळूं देऊं नका !**

हल्लींच्या जागृतीच्या काळांत भट-भिक्षुकांतही राजकीय विषयाची चर्चा कशी चालते यासंबंधानें बोलणें निघालें असतांना हरिभाऊंचे एक मित्र म्हणाले, एका गृहस्थाच्या घरीं श्राद्ध होतें. त्यासाठीं त्यानें ब्राह्मणांना बरोबर अकरा वाजतां बोलाविलें होतें. एक वाजायला आला तरी ब्राह्मणांचा ठिकाण नाहीं असें पाहून ते गृहस्थ अर्थातच गोंधळून गेले. शेवटीं नदीवर एक हेलपाटा मारून यावा, तेथें कदाचित् हे ब्राह्मण सांपडतील असा विचार करून हे गृहस्थ घाटावर गेले. तेथें पहातात तों " रूसशीं इंग्रजांच्या होणाऱ्या लढाईचा खर्च हिंदुस्थाननें काय म्हणून द्यावा ?" हा वाद निघून ब्राह्मण

आपापसांत मारे शिरा ताणताणून बोलत आहेत असा देखावा त्यांना दिसला. त्याबरोबर हात जोडून ब्राह्मणांना ते म्हणाले, "लढाईचा निम्मा खर्च पाहिजे तर मी देतों, पण येवढी श्राद्धाची तिथि टळूं देऊं नका!"

× × ×

[१७८] **सर्व धर्मशाळाभर खापरांचा सडा!**

भिक्षुकांची लष्करच्या भाकरी भाजण्याची ही लकब माहीत असलेल्या कुंभाराची एक गमतीची गोष्ट हरिभाऊ सांगत. उतारूंना किंवा पांथस्थांना उतरण्याकरितां एका कुंभारानें एक मोठी थोरली धर्मशाळा बांधली. पुढें त्याचें देहावसान होण्याचा समय जवळ आला तेव्हां त्यानें मुलाला जवळ बोलावून सांगितलें कीं, "या धर्मशाळेंत उतरण्याला कोणासही मुभा ठेव, पण येथें भट-भिक्षुकांना मात्र उतरूं देऊं नकोस!" बापाचा हा उपदेश लक्ष्यांत ठेवून धर्मशाळेस भिक्षुकांचे पाय न लागतील अशी मुलानें अर्थातच खबरदारी ठेवली. शेवटीं एकदां थंडीच्या दिवसांत रात्रींचे वेळीं कांहीं ब्राह्मण त्याच्या दारापाशीं येऊन धर्मशाळेंत जागा मिळण्याबद्दल त्याची विनवणी करूं लागले. थंडीनें कुडकुडणाऱ्या त्या ब्राह्मणांची केविलवाणी स्थिति पाहून मुलगा दयेनें विरघळला व "रातोरात धर्मशाळेंत रहा, कांहीं हरकत नाहीं" असें तो ब्राह्मणांना म्हणाला. ब्राह्मण धर्मशाळेंत जाऊन जरा स्थिरस्थावर होतात तोंच 'हिंदुस्थानांत ताम्रांचें राज्य रहाणार का पेशवाई पुन्हा येणार' असा वाद ब्राह्मणांत सुरू झाला. वादास रंग चढतां चढतां तो लवकरच हातघाईवर आला. आणि धर्मशाळेंत एका बाजूला कुंभारानें आवा रचून ठेवला होता त्यांतील एक एक मडकें घेऊन ब्राह्मण तीं एकमेकांच्या अंगावर भिरकवूं लागले!

गाडगीं फुटण्याचा आवाज कानीं येतांच त्याची वर्दी शेजारच्या लोकांनीं कुंभारास दिली. कुंभार येऊन पहातो तों सर्व धर्मशाळेंत खापरांच्या तुकड्यांचा सडा झालेला त्याच्या दृष्टीस पडला! बापानें मरतेसमयीं दिलेल्या कानमंत्राच्या रहस्याचा त्याला आतां अर्थातच पूर्णपणें उलगडा झाला!

× × ×

[१७९] **जेवावें केव्हां!**

" मनुष्यानें जेवावें केव्हां " अशाबद्दल मंडळींत बोलणें निघे तेव्हां " गरिबांनीं जुळेल तेव्हां व श्रीमंतांनीं लहर येईल तेव्हां." असें सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ डायोजिनीस याचें वाक्य हरिभाऊ मोठ्या तत्परतेनें व कौतुकानें सांगत असत.

# १०

[१८०] **दत्तकही लाभत नाहीं!**

हरिभाऊंच्या एका मित्रांनीं कृत्रिम दांत लावले होते. त्यांतलेही दोन दांत पडले, हरिभाऊ त्यांना म्हणाले "लावलेल्या दातांतीलही दांत पडले का हो?" यावर स्नेह्यांनीं उत्तर केलें, "औरस संतति जगत नाहीं म्हणून दत्तक घ्यावा; पण तोही लाभूं नये असाच दांतांच्या संबंधांत आमचा योग दिसतो!" "जरा बोलणें बेतानें ठेवा म्हणजे दातांना जिभेचा होणारा उपसर्ग थोडा कमी होऊन दांतही अधिक टिकतील!" असें हरिभाऊंनीं यावर प्रत्युत्तर केलें, तेव्हां मंडळींत एकच हंशा पिकला!

× × ×

[१८१] **रुपायापुढें निरुपाय!**

वेदान्त सांगण्याला सोपा आहे; पण आचरणांत आणण्याला कठिण आहे असें बोलणें निघालें म्हणजे हरिभाऊ म्हणत, "एकदां बरेच वेदान्ती एकत्र जमून ब्रह्म आणि माया यांचा खल करीत होते. इतक्यांत एकाच्या कडुसरीला असलेला रुपया खालीं पडून त्याचा छन्न असा आवाज झाला. त्याबरोबर जो तो आपली कडुसरी चाचपून 'माझा रुपया पडला वाटतें' असें म्हणूं लागला! आणि रुपयाबद्दल बाचाबाची सुरू होऊन लवकरच प्रकरण हातघाईवर आलें! 'ब्रह्म तेंचि माया व माया तेंचि ब्रह्म' याचा त्या वेदान्त्यांनीं हा वस्तु-पाठच दिला!" असा प्रसंग सांगून "वेदान्त काय आणि दुसरें कांहीं काय, सर्वांचाच रुपायापुढें निरुपाय होतो!" असा ते एकंदर परिस्थितीचा उपसंहार करीत!

[१८२] **रावबाजींना भिक्षुक बनविलें !**

पूर्वीच्या लोकांतही बाणेदारपणा कसा होता याबद्दल गोष्टी निघाल्या म्हणजे हरिभाऊ किब्यांच्या वाड्यासंबंधांतील आख्यायिका मोठ्या कौतुकानें सांगत. हा वाडा मूळचा पेशव्यांचे सावकार सुप्रसिद्ध गद्रे यांचा होता. थोरल्या माधवरावांना यांनीं बरीच रक्कम कर्जाऊ दिली होती. माधवरावांचा मरणकाळ समीप आला तेव्हां गद्र्यांचें कर्ज कसें फिटेल या विचारानें त्यांची मुद्रा सचिंत दिसली. गद्र्यांना हें समजल्याबरोबर त्यांनीं सर्व कर्जरोखे माधवरावांच्या समक्ष फाडून टाकून त्यांच्या जिवाला निश्चितपणा आणला. पुढें रावबाजी गादीवर आले, तेव्हां त्यांनींही गद्र्यांना कर्ज मागितलें. पण गद्रे यांनीं ही मागणी स्पष्टपणें नाकारली. तेव्हां रावबाजींनीं गद्र्यांचा वाडा लुटण्याचा हुकूम दिला. वाड्यांतील सर्व द्रव्य व चीजवस्त बाहेर काढण्यांत येऊन ती गाड्यांतून भरण्यांत आली. गाड्या पेशव्यांच्या वाड्याकडे रवाना होणार इतक्यांत गद्र्यांनीं तुळशीवृंदावनांतलें एक तुळशीचें झाड उपटून एक एक तुळशीपत्र प्रत्येक गाडींत भरलेल्या ऐवजावर टाकलें आणि बाजीरावांना भिक्षुक बनविलें ! किब्यांचा वाडा अग्निप्रलयानें भस्मसात् झाल्यास आज पांच वर्षें झालीं. पण त्याशीं संलग्न असलेली ही आख्यायिका मात्र अजरामर होऊन राहण्यासारखी आहे !

× × ×

[१८३] **आम्ही झोंपडींत आहोतच !**

दुसऱ्याला धैर्याच्या गोष्टी सांगून स्वतः मात्र नामानिराळे रहाणाऱ्या लोकांसंबंधानें बोलतांना हरिभाऊ एका गृहस्थांचा निर्देश करीत. हे गृहस्थ प्लेगमुळें शहराबाहेर झोंपडींत रहावयास गेले होते. गांवांतील

आपल्या घराचें संरक्षण करण्याकरितां त्यांनीं एक भय्या ठेवला होता. संध्याकाळीं झोंपडींत परत जातांना ते भय्याला रोज बजावीत, " गांवांत चोऱ्या व्हावयास लागल्या आहेत. घरावर नीट पहारा कर हं ! अगदीं भिऊं नकोस ! आम्ही झोंपडींत आहोंतच ! "

× × ×

[१८४] **हवा खातों !**

येथें एक पेन्शनर प्रोफेसर असत. त्यांचें आणि हरिभाऊंचें बरेंच सख्य असे. सकाळच्या वेळेस हिंडायला जातांना या गृहस्थांची कित्येक वेळां गांठ पडत असे. ते तोंड उघडें ठेवून श्वासोच्छ्वास करीत हिंडण्याचा व्यायाम घेत असत. कोणीं याचें कारण विचारलें असतां " हवा खातों " असें ते म्हणत असत !

× × ×

[१८५] **प्रतिस्पर्ध्याचें मत कमी केलें !**

मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटच्या निवडणुकींत यांना मत असे. हरिभाऊंचे एक स्नेही या निवडणुकीस उभे राहिले होते. त्यांना या प्रोफेसरांनीं मत द्यावें अशी हरिभाऊंनीं विनंति केली. तेव्हां ते म्हणाले, " मत देण्यासंबंधांत मी आधींच वाचादत्त होऊन बसलों आहें. तेव्हां आपल्या स्नेह्यांस मला मत देतां येत नाहीं." मत देण्याच्या तारखेस हे मुंबईस जाणार होते. जाण्यापूर्वी ते हरिभाऊंना भेटले व त्यांनीं त्यांना विचारलें, " मुंबईस कांहीं प्लेगबीग नाहीं ना ? " हरिभाऊंनीं ताबडतोब उत्तर केलें, " काय, आपण जाणार आहांत कीं काय ? आपण जाण्यासारखी मुंबईची स्थिति नाहीं ! " प्रोफेसरांनीं मुंबईस जाणें अर्थातच रहित केलें. " आपल्या या स्नेह्यास यांचें मत पडलें

नाहीं तरी त्याच्या प्रतिस्पर्ध्याचें तरी एक कमी झालें!" एवढेंच हरिभाऊंना यांत समाधान वाटलें.

× × ×

[१८६] **वाकनिसांची दौंडास रवानगी!**

येथें रा० कृष्णराव ढोले म्हणून गृहस्थ असत. विशेषतः म्युनिसिपालिटीच्या उलाढालीसंबंधांत ते विशेष प्रसिद्धीस आले होते. म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीच्या बाबतींत तर हे अनेक शकला लढवून मतदारांची चाळवाचाळव करीत. एकदां निवडणुकीच्या ऐन सकाळीं ते हरिभाऊंचे मित्र रा० दिनकर हरि वाकनीस यांना भेटले व दौंडास एका गृहस्थाच्या खटल्याची आज तारीख आहे तिला आपण हजर राहिलें पाहिजे अशी त्यांनीं त्यांना विनंति केली. त्याप्रमाणें वाकनीस ताबडतोब दौंडास गेले. पण तेथें पहातात तों ढोले यांनीं सांगितलेला माणूसही नव्हता व त्याचा खटलाही नव्हता! वाकनिसांना संध्याकाळीं तसेंच परत यावें लागलें. निवडणुकीच्या दिवशीं आम्हांला पुण्यांतून बाहेर काढून प्रतिस्पर्ध्याचें एक मत कमी करण्याची ही ढोले यांची शक्कल होती हा रा० वाकनीस यांना नंतर प्रकाश पडला! हरिभाऊंच्या मित्र-मंडळींत कित्येक दिवसपर्यंत हा करमणुकीचा विषय व्हावा हें स्वाभाविकच होतें!

× × ×

[१८७] **केळीखालींच केळीं पुरून टाकीत!**

वरील प्रोफेसरांच्या येथें कांहीं केळीचीं झाडें होतीं! त्यांना केळीं पुष्कळ येऊन तीं चांगल्या जातीचींही असत. प्रोफेसरसाहेब केळीचे घड गड्याच्या डोक्यावर देऊन मंडईंत विकण्याकरितां पाठवीत. मात्र त्याला बजावून सांगत कीं, अमुक भावानें गेलीं तरच दे. नाहींतर

परत आण. यांचा भाव कित्येक वेळां गिऱ्हाइकांस पटण्यासारखा नसे. त्यामुळें घड जसेचे तसेच परत येत. कांहीं प्रसंगीं घडांना असे दोन चार हेलपाटेही पडत. शेवटीं तीं केळीं केळीखालींच ते पुरून टाकीत! पण मनांत संकल्पित केलेल्या भावापेक्षां कमी भावानें ते कधींही विकत नसत. हीं केळीं कांहीं फुकट जात नाहींत, आयतें केळींना खत होतें, असेंही ते समाधान मानीत आणि फुकट गेलीं तरी हरकत नाहीं, पण गिऱ्हाईक स्वस्त भावाला सोकावतां उपयोगी नाहीं असेंही यासंबंधानें बोलणें निघालें असतां हरिभाऊंना सांगत!

× × ×

[१८८] **आतां आम्हीं मरणार!**

हरिभाऊंचे एक स्नेही सत्तरीच्या घरांत आले होते. आम्हीं आतां मरणार असें ते नेहमीं म्हणत असत. यावर हरिभाऊ उत्तर करीत, "छे, भलतंच कांहीं तरी बोलतां! सत्तर वर्षांत जी गोष्ट घडली नाहीं ती आतां कशी घडेल?" हे गृहस्थ अगदींच बाळबोध वळणाचे होते. हरिभाऊंच्या या उत्तरानें त्यांना थोडा धीर आल्यासारखेंच होई. पण भोंवतालच्या मंडळीची मात्र करमणुक होत असे!

× × ×

[१८९] **सरस्वतीला वृश्चिकदंश!**

एखादे कंटाळवाणे वक्ते असले म्हणजे त्यांचें भाषण बंद व्हावें म्हणून श्रोतेजन टाळ्या वाजवितात; पण आपलें भाषण व्हारींचें वाटूनच हे लोक टाळ्या वाजवितात अशीही कांहीं वक्त्यांची समजूत होऊन ते आपलें भाषण तसेंच चालू ठेवतात! अशाच एका प्रसंगाला अनुलक्षून हरिभाऊ भारती नाटकांतील एका सरस्वतीची गोष्ट सांगत. एकदा ही सरस्वती फार जोरजोरानें नृत्य करूं लागली.

इतकी कीं, त्यामुळें श्रोतृवृंदांतून प्रशंसापर टाळ्यांचा कडकडाट होऊं लागला. नृत्याचा जोर व कडकडाटाचा जोर यांची जणूं कांहीं वेळ चढाओढच लागली ! शेवटीं सरस्वती मोठ्यानें किंकाळ्याही फोडूं लागली, पण टाळ्यांच्या गर्दीत त्या कोणासही ऐकूं येईनात. शेवटीं वुइंगमधल्या लोकांना त्या ऐकूं येऊन त्यांनीं पडदा पाडला, व पहातात तों "सूत्रधाराप्रत कल्याण देणारी" आदिमाता स्टेजवर दुःखानें विवळत पडली असल्याचें त्यांना दिसून आलें ! याचें कारण काय असावें, याचा कोणासच उलगडा होईना ! तों सरस्वतीच्या मुखवटयांत एक मोठा थोरला विंचू असल्याचें आढळून आलें ! सरस्वतीच्या नृत्याला आज जो रंग चढला होता तो तोंडावर झालेल्या वृश्चिकदंशामुळेंच होय, हें समजल्यावर सर्वांना अर्थातच फार हळहळ वाटली !

× × ×

[१९०] **विजारीचा संसर्ग घडला नाहीं !**

युरोपियन लोकांत भोजनोत्तर नाटकास जाण्याचा परिपाठ असल्यामुळें नाटकगृहांत त्यांच्या अंगावर डिनरचाच पोषाक असतो. हरिभाऊंना एकदां इंग्लिश नाटकास जाण्याची लहर आल्यामुळें त्यांनीं हा पोषाक मुद्दाम करविला ! या बाबतींत ते अनभ्यस्त असल्यामुळें या पोषाकाच्या रंगाची वगैरे त्यांनीं चांगली माहिती मिळवून ठेवली होती. पण शिंप्याच्या चुकीमुळें कोट व पँट यांच्या रंगाची आलटापालट झाल्यामुळें इंग्लिश नाटकास जाण्याचा त्यांचा हा योग अर्थातच फिसकटला ! या कारणानें तरी त्यांना विजारीचा संसर्ग घडावयाचा तोही घडला नाहीं !

× × ×

**[१९१] आवाजाची पट्टी जरा खालीं लावा !**

आनंदाश्रमांत सायंकाळीं दोन घटका करमणुकीकरितां मंडळी येत. त्यांत कित्येक हुद्देदार सरकारी नोकर असत. ऑफिसांत कारकून, शिपाई वगैरेशीं बोलतांना त्यांच्या आवाजांत हुकुम करण्याची ढब साहजिकच आलेली असते. आनंदाश्रमांत खासगी मित्रमंडळींतही बोलत असतां त्यांची ही ढब क्वचित् प्रसंगीं डोकावूं लागली म्हणजे " साहेब, आपण कचेरींत नाहीं किंवा ही मंडळी आपली आश्रित नाहींत. आवाजाची पट्टी जरा खालीं लावा ! " असें हरिभाऊ त्यांना विनोदानें बजावीत. यामुळें उत्पन्न होणाऱ्या हंशांत साहेबही अर्थात-च मिसळत !

× × ×

**[१९२] चुकल्या चुकल्यासारखी वृत्ति !**

कांहीं माणसांचें मन नेहमींच अनिश्चित व संशयग्रस्त असतें. त्यांच्या मनांतला किंतु हा केव्हांही दूर होत नाहीं. त्यांची वृत्ति नेहमीं चुकल्या चुकल्यासारखी कशी असते याचा दाखला देतांना हरिभाऊ हे एका बाईची गोष्ट सांगत असत. एका बाईला गांवाला जावयाचें होतें. तिनें गाडींत सर्व सामान भरलें व एकदां सर्व बोजे मोजून पाहिले. तरी न जाणो, घरांत कांहीं राहिलें आहे काय म्हणून बघून यावें या विचारानें ती घरांत गेली. घरांत कांहीं राहिलें नाहीं अशी खात्री झाल्यानंतर ती पुन्हा गाडीजवळ आली आणि बोजे मोजूं लागली ! कांहीं सामान राहिलें नाहीं ना ? म्हणून घरांत जावयाचें व सर्व सामान आलें आहे का, म्हणून गाडींतलि सामान तपासून पहावयाचें ! अशा तिच्या कित्येक येरझारा झाल्या तेव्हां " आतां चढा गाडींत. कांहीं राहिलेंच तर आम्ही देऊं मागून पाठवून " असें म्हणून घरांतील

माणसांनीं तिला अखेर गाडींत चढविलें! गाडींत चढल्यानंतरही "अमुक घेतलें का, तमुक घेतलें का," असें आपल्याशींच पुटपुटत बोजे चाचपण्याचें तिचें काम कित्येक वेळपर्यंत चालूच होतें!

x x x

[१९३] **संत सखूबाई.**

हरिभाऊ माणसांचे फार लोभी असत. इतके कीं, एखादें निकडीचें काम करीत असतांही जवळ एखादें मनुष्य असावें असें त्यांना वाटे! माणसांच्या संगतीचे ते फारच भुकेलेले असत. संत सखूबाई नाटक, प्रकाशकांचा ससेमिरा अगदीं गळ्याशीं आला तेव्हां ते लिहावयास बसले. या वेळीं आपल्या एका मित्रांना त्यांनीं बजावलें कीं, मी तुमच्या ऑफिसांत बसून हें नाटक लिहून काढतों. पण तें संपेपर्यंत तुम्हीं माझ्याजवळ बसलें पाहिजे. मित्रांनीं हें आनंदानें कबूल केलें; आणि हरिभाऊंनीं तें नाटक सुमारें सात आठ तासांची एक एक बैठक अशा दोन तीन बैठकींतच लिहिलें!

x x x

[१९४] **वूमन् इन् व्हाइट!**

'मी, वज्राघात' वगैरे हरिभाऊंच्या कादंबऱ्यांना पर्यवसानाकरितां कित्येक दिवस ताटकळत बसावें लागलें. याबद्दल एखादे वेळीं गोष्ट निघाली म्हणजे, हरिभाऊ म्हणत "कादंबरीसंबंधांत दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे तिचें नांव व पर्यवसान या होत. पर्यवसानासंबंधांत माझ्यासारखी-च तारांबळ उडाली असल्याचीं कित्येक कादंबरीकारांचीं उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. तीच स्थिति नांवासंबंधाची होय. पण माझ्या कादंबऱ्या करमणुकींत प्रसिद्ध झाल्यामुळें कादंबरीचें नांव मला आरंभींच ठरवावें लागे. यामुळें ती भानगड प्रथमच मिटत असे.

पण जे लोक कादंबऱ्या संपूर्ण लिहून झाल्यानंतर एकदंडीच प्रकाशित करतात त्यांना ही नांवाची भानगड कित्येक वेळां बरीच सतावून सोडते. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे विल्की कॉलिन्स याचें होय. त्यानें आपली वूमन् इन् व्हाइट ही उत्कृष्ट कादंबरी लिहिली तेव्हां तिचें आटपसर आणि समर्पक असें नांव काय ठेवावें याबद्दल त्याच्या मनाची कित्येक दिवस धडपड चालू होती. शेवटीं त्यानें आपली कादंबरी लेडी लिट्न् या बाईस वाचावयास दिली. बाईची कादंबरी वाचून झाल्यानंतर "इला नांव काय द्यावें" असा कादंबरीकारानें तिला प्रश्न केला. तिनें "वूमन् इन् व्हाइट" असें ताबडतोब उत्तर दिलें. तें ऐकून विल्की कॉलिन्स याला फारच आनंद झाला व अखेर तेंच नांव त्यानें आपल्या कादंबरीस दिलें !

× × ×

[१९५] **विस्कळित विचारांना संगति लावली !**

हरिभाऊंच्या एका स्नेह्यांचें येथील वसंतव्याख्यानमालेंत भाषण झालें. या व्याख्यात्यांना पूर्वी झालेल्या भाषणावर टीका करण्याचा आवेश आला होता. त्या आवेशाच्या भरांत त्यांचें सुसंगतीचें अवधान नाहींसें होऊन आपण काय बोलतों याचें त्यांचें त्यांनाच भान नाहींसें झालें व श्रोत्यांना आश्चर्यचकित करून ते दहा मिनिटांनीं खालीं बसले. दुसरे दिवशीं त्यांच्या व्याख्यानाचा सारांश वर्तमानपत्रांत आला. तो पाहून त्यांना फारच कौतुक वाटलें. हा वर्तमानपत्राचा अंक घेऊन ते ताबडतोब हरिभाऊंकडे गेले आणि त्यांना म्हणाले, "काल काय हो मी आचरटपणानें बोललों ! पण हा पाहिला का माझ्या भाषणाचा या पत्रांत दिलेला सारांश ? मला काय बोलावयाचें होतें तें नेमकें ओळखून या गृहस्थानें माझ्या विस्कळित विचारांना उत्कृष्ट

संगति लावून दिली आहे. वक्त्याची अब्रू बचावणारा हा रिपोर्टर कोण आहे हें जर मला समजेल तर त्याची गांठ घेऊन मी त्याचें खरोखरच अभिनंदन करीन." हरिभाऊ या गृहस्थांना त्या रिपोर्टर-कडे घेऊन गेले व या गृहस्थांनीं त्याला खरोखरच कृतज्ञतापूर्वक आणि मोठ्या कौतुकानें शाबासकी दिली!

x x x

[१९६] **चांभाराचे देव!**

हरिभाऊ एकदां आपल्या बुटाला पॉलिश करीत असतां त्यांचे एक स्नेही तेथें आले व ते त्यांना म्हणाले, "हरिभाऊ, सकाळच्या प्रहरीं हें चांभाराचें काय काम चालविलें आहे?" यावर हरिभाऊ हात जोडून म्हणाले, "आम्ही चांभार आणि तुम्ही आमचे देव!"

x x x

[१९७] **पदवीची शिफारस!**

हरिभाऊंना रेचक घेण्याचा फार नाद असे. रेचकाचें एखादें नवीन औषध निघालें, कीं हरिभाऊ स्वतांवर त्याचा अवश्य प्रयोग करून बघावयाचे! एकदां एक रेचक त्यांना उत्कृष्ट लागूं पडलें. हें विरेचनाचें औषध सुचविणाऱ्या गृहस्थांची व त्यांची गांठ पडली तेव्हां ते म्हणाले, "हें औषध सुचविल्याबद्दल आपले जितके आभार मानावेत तितके थोडेच होणार आहेत. खरोखरच मला वाटतें कीं, कोणत्या तरी जगद्गुरूकडे आपली शिफारस करून त्यांजकडून आपल्याला अपानाचार्य ही पदवी देववावी!"

x x x

[१९८] **सारसबाग!**

हरिभाऊ व त्यांचे स्नेही हे सकाळीं हिंडायला जातांना पर्वतीच्या

वाटेवरील सारसबागेंत पुष्कळ वेळां जाऊन बसत. या बागेच्या भोंवतालीं सरोवर होतें म्हणून हिला सारसबाग म्हणतात, असा कथाभाग निघाला म्हणजे "तुमच्या तोंडून येथें सरस गोष्टी ऐका-वयास सांपडत म्हणूनच या बागेस सारसबाग म्हणतात" असाही याचा नवीन इतिहास भावी पिढ्यांत रूढ होईल असें त्यांचे मित्र म्हणत!

# ११

[१९९] **बायकोचें वेड !**

हरिभाऊंच्या येथें त्यांचे एक जुने स्नेही वरचेवर येत असत. दिवाणखान्याबाहेर एक मोठी थोरली पेटी असे, त्या पेटीवर या गृहस्थांचें दिवसभर आसन असे. यांना कोणाशीं बोलणें चालणें वगैरे मुळींच माहीत नव्हतें. हरिभाऊंच्या एका मित्रांनीं हे गृहस्थ कोण म्हणून विचारलें तेव्हां ते म्हणाले, "हे गृहस्थ आपल्या बायकोच्या माहेरीं तिला आणण्याकरितां गेले होते. पण दैव-दुर्विलास असा कीं, तिला कांहीं अकस्मात् अपघात होऊन हे गृहस्थ माहेरीं पोहोंचण्यापूर्वींच ती वारली ! या गृहस्थांना तें कांहीं खरें वाटेना ! माझी बायको मेली नसून ती माहेरच्या माणसांनीं लपवून ठेवली आहे अशी त्यांची कल्पना होऊन त्यांना तेंच वेड लागलें. व मीं रदबदली केली तर आपली बायको परत मिळेल असा त्यांस भरंवसा वाटत असल्यामुळें ते वरचेवर येथें येतात व 'हऱ्या, आमची बायको आणून दे कीं', असा माझ्यामागें ससेमिरा लावतात !

x x x

[२००] **केळीं किती होतीं !**

एका गृहस्थानें केळ्यांचा सबंध घड खाल्ला याबद्दल सर्व मंडळी त्याच्या आहाराची तारीफ करूं लागली. तेव्हां हरिभाऊंचे एक स्नेही म्हणाले, "घड खाल्ला असेल, पण घडाला केळीं किती होतीं ? घडाला वीस पासून दोनशें केळीं असतात." हें ऐकून सर्व मंडळीस हा खरोखरच मुद्द्याचा प्रश्न आहे ही जाणीव उत्पन्न झाली व सर्वजण हंसूं लागले !

x  x

[२०१] **निबंधापेक्षां गोष्टच बरी !**

ज्याचा जो विषय असेल त्यावर त्यानें निबंध लिहिण्यापेक्षां गोष्टच लिहिणें परिणामाच्या दृष्टीनें अधिक श्रेयस्कर असतें असें हरिभाऊ म्हणत. कै० कृष्णाजी केशव गोखले यांनीं "विभक्त कीं अविभक्त" ही गोष्ट लिहिली ती हरिभाऊंचें हें म्हणणें पटल्यामुळेंच होय.

× × ×

[२०२] **तंबू सांपडेना !**

इ० सन १९१६ सालीं लखनौ येथें हरिभाऊ कॉंग्रेसला गेले होते; त्या वेळीं एके दिवशीं सकाळीं कांहीं जिनसा आणण्याकरितां ते एकटेच बाजारांत गेले. पाहिजे होत्या त्या जिनसा घेऊन जेवणाच्या वेळेस कँपांत परत आले. पण कँपांतील शेंकडों तंबू एकासारखे एक असल्यामुळें त्यांना स्वतःचा तंबू सांपडेना ! परस्पर जेवावयास जावें तर जेवणाचें तिकीट तंबूंत राहिलेलें ! तंबूच्या शोधार्थ त्यांची सुमारें दोन अडीच तास एकसारखी भ्रमंती चालली होती ! अखेर त्यांच्या तंबूंतच उतरलेल्या त्यांच्या सोबत्यांची यदृच्छया दृष्टादृष्ट झाली. तेव्हां हरिभाऊंनीं त्यांना विचारलें, "कोठें चालला ?" "तुमचा शोध करण्यासाठीं ! दीड वाजून गेला तरी तुमचा अजून पत्ता नाहीं. तेव्हां म्हटलें पहावें आसपास हिंडून !" असें त्यांच्या सोबत्यांनीं उत्तर दिलें. हरिभाऊंचा जीव खालीं पडला व ते म्हणाले, "बरें झालें बुवा तुम्हांला माझ्या शोधाला यावयाची बुद्धि झाली ! सुमारें तीन तास मी तंबू सांपडण्यासाठीं वणवण हिंडत आहें. तुम्ही आलां नसतां तर आणखी किती तास हिंडावें लागलें असतें कोणास ठाऊक ! पण तुमच्या तरी तंबू ध्यानांत आहे ना ?" असें हरिभाऊंनीं त्यांना विचारलें.

या गृहस्थांनीं तंबूची खूण पक्की लक्ष्यांत ठेवली होती त्यामुळें ते दोघेही लवकरच मुक्कामावर जाऊन पोहोंचले !

x x x

[२०३] **सोमरसयुक्त भाषण !**

एका गृहस्थांचें "वेदांत काय आहे ?" या विषयावर येथील वसंत-व्याख्यानमालेंत व्याख्यान झालें. त्यांनीं आपल्या व्याख्यानांत विशेषत: सोमरसाच्या वर्णनावरच झोड उठविली. व्याख्यानानंतर अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना हरिभाऊ म्हणाले, "व्याख्यात्यांचें सोमरस-युक्त भाषण तुम्हीं ऐकलेंच आहे ! आतां मी वेदांतील इतर कांहीं लक्ष्यांत ठेवण्यासारख्या गोष्टी सांगतों त्या तुम्हीं सोमरसामुळें आले-ल्या तल्लीनतेतून जागे होऊन शांत चित्तानें ऐकाल अशी मला आशा आहे !"

x x x

[२०४] **तुमच्या येथें !**

हरिभाऊंचे एक स्नेही सायंकाळीं फिरून परत येतात तों ज्या वाड्यांत ते रहात होते तेथें स्वच्छ पोषाख केलेली, साधारण तरुण व दिसण्यांत चार-चौघींसारखी अशी एक बाई एका बिऱ्हाडांतून घालवून लावावी तों दुसऱ्या बिऱ्हाडांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत अशा रीतीनें भ्रमण करीत असलेली त्यांना दिसली.—"मी परगांवची आहें, मला आसऱ्याकरितां सकाळपर्यंत जागा द्या. सकाळीं मी येथें माझा भाऊ आहे त्याचा शोध लावून त्याच्याकडे जाईन" अशी ही बाई प्रत्येक बिऱ्हाडकरूस विनवणी करीत होती आणि ते तिला धुडका-वून लावीत होते. हा प्रकार पाहून या स्नेह्यांना तिची दया आली व त्यांनीं आपल्या घरीं सकाळपर्यंत तिची रहाण्याची सोय केली.

सकाळीं 'तुमच्या भावाचा मला पत्ता सांगा म्हणजे मी तेथें नेऊन तुम्हांला पोहोंचवितों' असे हे स्नेही त्या बाईस म्हणाले आणि तिनें एक पत्ता सांगितला तेथें तिला घेऊन गेले. पण तेथें भावाचा कांहींच पत्ता लागेना; तेव्हां हे स्नेही त्या बाईला म्हणाले, "आतां तुमची पुढें व्यवस्था काय करावयाची?" ती कांहींच उत्तर देईना असें पाहून त्यांनीं तिला विचारलें, "तुम्ही कोणच्या गांवाहून आला?" तेव्हां "कऱ्हाडाहून आलें" असें तिनें उत्तर दिलें. "तुमच्या भावाचा येथें पत्ता लागत नाहीं तेव्हां तुम्ही कऱ्हाडला परत जात असलां तर मी तुम्हांला तिकीट काढून देतों" अशी त्या स्नेह्यांनीं तिला तजवीज सुचविली. पण "मी येथेंच रहाणार आहें" असें तिनें उत्तर दिलें. "येथें राहणार, पण कुणाच्या येथें रहाणार" असें स्नेह्यांनीं विचारलें, तेव्हां "तुमच्या येथें!" असें ती म्हणाली! हें लचांड आपल्या मागचें सुटतें कसें असें त्या स्नेह्यांना होऊन गेलें! त्यांनीं घरीं परत येऊन तिला जेवावयाला घातलें व "आतां तुम्ही माझ्या येथें राहूं नका. तुमची तुम्ही आपली काय ती व्यवस्था पहा" असें निक्षून सांगितलें, तेव्हां ती घराबाहेर पडली.

x x x

[२०५] **बाई वेडी निघाली!**

यानंतर एक-दोन तासांनीं हे स्नेही ऑफिसमध्यें जात असतां बुधवारांत 'मध्यें ती व तिच्याभोंवतीं शें-दोनशें माणसांचा गराडा' असा देखावा त्यांना दिसला! त्या बाईचे डोळे, चर्या, हातवारे वगैरे सर्व वेड लागलेल्या माणसासारखे दिसत होते. तितक्या गर्दींतही तिनें या स्नेह्यांना ओळखलें व "माझी व्यवस्था करा" असें ती त्यांना म्हणूं लागली. स्नेही अर्थातच तिला हुलकावणी देऊन ऑफिसांत निघून

गेले! यानंतर चार-पांच दिवस ती वेडी त्यांना नेमकें कोठें तरी गांठीत असे आणि " माझी व्यवस्था करा " असें म्हणत असे. पुढें ती बाई आज अनेक वर्षें डोकें फिरलेल्या स्थितींतच आहे असें खुद्द कऱ्हाडच्या एक-दोन गृहस्थांकडून कळलें. त्या बाईनें ह्या स्नेह्यांचा सारखा पिच्छा कसा पुरविला होता हें हरिभाऊ पहातच होते. अखेर त्यांनीं तिला वेड्याच्या इस्पितळांत पोहोंचविलें. ही बाई वेडी असून स्नेह्यांच्या येथें मुक्काम असतां सुध्या रीतीनें कशी राहिली हें कोडें हरिभाऊंनाही उलगडलें नाहीं. लघुकथा लिहिण्यासारखा हा प्रसंग आहे असें मात्र ही वस्तुस्थिति पाहून त्यांच्या तोंडून उद्गार निघाले!

× × ×

[२०६] **जनवार्तेतील विवाह!**

जनवार्ता ही एक मोठी अजब चीज आहे. ही हव्या त्या गोष्टी चुटकीसरशी घडवून आणते! ती त्या बाबतींत शक्याशक्यतेचा किंवा सत्यासत्यतेचा यत्किंचितही विधिनिषेध बाळगीत नाहीं. मिस भोर या नांवाच्या एक बाई येथें हुजुरपागेंत लेडी सुपरिंटेंडेंटच्या जागीं होत्या. या बाईंची व हरिभाऊंची फार मैत्री होती. याचें कारण त्या बाईही वाङ्मयासंबंधांत मोठया व्यासंगी होत्या. हरिभाऊंचें प्रथम-कुटुंब वारलें त्या वेळेस हरिभाऊ मिस भोर यांच्याशीं विवाह लावणार असें जनवार्तेनें ठरविलें! व त्यामुळें कित्येक दिवसपर्यंत हरिभाऊंच्या घरीं व गांवांत हा एकच चर्चेचा विषय होऊन बसला होता!

× × ×

[२०७] **कवितेचा कपटा हातावर ठेवला!**

हरिभाऊंचे एक परिचित चांगले कवि होते. साधारण महत्त्वाचा असा कोणताही प्रसंग आयुष्यांत घडो, त्यावर ते निदान एखादी तरी

कविता ठोकावयाचेच ! ते एकदां आसन्नमरण स्थितींत असतां त्यांना मुंबईचे एक नामांकित डॉक्टर तपासावयास आले होते. डॉक्टरची तपासणी वगैरे होऊन ते परत जाऊं लागले तों त्यांची फी देण्यापूर्वींही त्यांच्यावर रचलेल्या कवितेचा एक कपटा या गृहस्थांनीं त्यांच्या हातावर ठेवला ! मृत्यूच्या छायेंतही कवितादेवीची यांना विस्मृति झाली नाहीं याबद्दल डॉक्टरांना व रोग्यांच्या समाचाराला आलेल्या परस्थ गृहस्थांना कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं !

x x x

[२०८] **जामातावर केलेली कविता !**

या गृहस्थांनीं एकदां आपल्या येथें आपल्या जावयांना मेजवानी केली होती. मेजवानीस इतर कित्येक इष्टमंडळींना आमंत्रण होतें. त्यांत या गृहस्थांचे एक समवयस्क मित्रही होते. भोजनोत्तर पानसुपारी, अत्तर-गुलाब वगैरे झाल्यानंतर हे समवयस्क मित्र सहज विनोदानें म्हणाले, " आजचा समारंभ चांगला झाला. पण याची सांगता कवितेशिवायच व्हावयाची का ? " असें या मित्रांनीं म्हटल्याबरोबर " हो, खरेंच विसरलों " असे उद्गार काढून त्या गृहस्थांनीं खिशांतून जामातावर केलेली कविता बाहेर काढली व जावयास निघालेल्या मंडळीस थांबवून ती वाचून दाखविली ! " मी आपला थट्टेनें म्हणालों, पण थट्टा खरोखरच गळ्यांत आणलीत कीं ! " असें हे मित्र म्हणाले, तेव्हां जमलेल्या मंडळींत अर्थातच हंशा पिकला ! या दोन्ही प्रसंगीं हरिभाऊ अर्थातच हजर होते.

x x x

[२०९] **एकदम कविता निर्माण झाली !**

हरिभाऊ एके दिवशीं सकाळीं आपल्या चार-दोन स्नेह्यांसमवेत

पर्वतीवर हिंडावयास चालले होते. मध्यंतरींच या कविमित्रांची गांठ पडली. ते लांबून दिसतांच " आपण आतां कवितेंत सांपडणार " असे हरिभाऊंनीं समीपवर्ती स्नेह्यांच्याजवळ उद्गार काढले. तों " हरिभाऊ, बरे आलांत बुवा ! एक लहानसा कागद आणि पेन्सिल असली तर द्या पाहूं !" असें ते गृहस्थ म्हणाले. हरिभाऊंनीं त्यांना या वस्तू देतांच त्यांनीं कागदावर एक शार्दूलविक्रीडित श्लोक लिहून तो हरिभाऊंच्या स्वाधीन केला आणि ते हरिभाऊस म्हणाले, " एकंदर डोंगराचा व त्यावरील देवस्थानाचा देखावा पाहिल्याबरोबर प्रतिभा जागृत होऊन आकाशवाणी झाल्यासारखी एकदम कविता निर्माण झाली ! तुम्ही आलांत आणि कागद पेन्सिल वेळेवर मिळाली म्हणून बरें झालें. नाहीं तर कविता एकदम आली तशीच कदाचित् गेलीही असती !" हे गृहस्थ गेल्यानंतर हरिभाऊ आपल्या स्नेह्यांना म्हणाले, " पाहिलीत ना प्रतिभा ! कविता कालच तयार होऊन पडली असेल ! प्रतिभेची बतावणी मात्र कशी बेमालुम केली !" यांची कविता मात्र भारदस्त, रेखीव व सरस अशी असे.

x x x

[२१०] **आवाज अद्याप उतरला नाहीं !**

मुंबईत हरिभाऊंचे एक स्नेही ट्रॅममधून खालीं उतरले व त्यांच्याशीं बोलूं लागले. यांनीं बोलण्याचा आवाज नेहमींपेक्षां बराच मोठा लावला होता. यांनीं असें कां करावें, हें हरिभाऊंना कांहीं समजेना. पण यांचें बोलणें संपूं द्या, मग याचा तल्लास लावूं असा विचार करून हरिभाऊ त्यांची हकीकत ऐकत उभे राहिले. हकीकत संपल्यानंतर " आपण आपला आवाज इतका कां चढविलांत " असें हरिभाऊंनीं त्यांना विचारलें. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, " मीं मुद्दाम चढविला

नाहीं. ट्रॅममध्यें एका बहिऱ्या माणसाशीं बराच वेळ बोलत होतों तेव्हां जो एकदां आवाज चढला तो अद्याप उतरला नाहीं !"

x x x

[२११] **तेरा पत्रांना लेख !**

आपल्या इकडे चांगल्या सुशिक्षित माणसांनाही धंदा किंवा निर्वाहाचा व्यवसाय मिळण्यास अडचण पडते. यास येथील परिस्थितींतील कांहीं अवगुण कारणीभूत होत असले तरी आपल्यांत कर्तृत्वशक्तीची एकंदरीनें कमतरताच आहे हें कबूल करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. याबद्दल बोलतांना हरिभाऊ इंग्लंडमधील एका गृहस्थाची गोष्ट सांगत. या गृहस्थाला कोठें रोजगार मिळेना, तेव्हा एका श्रीमंत गृहस्थानें एक वर्तमानपत्र काढलें होतें त्याची त्यानें गांठ घेतली व "तुमच्याकडे मोबदल्याप्रीत्यर्थ येणाऱ्या वर्तमानपत्रांची तुमची जरूर संपली म्हणजे तीं तुम्ही मला द्याल का ?" अशी त्याला विनंति केली. या माणसानें ती मान्य केली व तो गृहस्थ अशीं वर्तमानपत्रें घेऊन जाऊं लागला. त्यांतील लेख वाचून त्यांचीं विषयवारीनें त्यानें कटिंग्ज तयार करण्याचा उपक्रम सुरू केला. कांहीं दिवसांनीं निरनिराळ्या विषयांवरील उपयुक्त माहितीचा त्याच्याजवळ चांगला संचय झाला. या संचयाच्या साहाय्यानें पुढें तो दर आठवड्यास एकंदर तेरा पत्रांना लेख पाठवूं लागला ! याच्या लेखांना अर्थातच चांगलें स्थान मिळून त्यास पैशाचीही चांगली प्राप्ति होऊं लागली, आणि थोड्याच दिवसांत त्याची चांगल्या संपन्न लेखकांत गणना होऊं लागली.

x x x

[२१२] **गुराला घालण्यापेक्षां तुम्ही तरी चला !**

एका गृहस्थांनीं आपल्या व्याह्यांच्या मंडळीकरितां झुंझुरमासाचा

बेत केला. सकाळीं आठाच्या सुमारास स्वयंपाक तयार ठेवून ते गृहस्थ निमंत्रित मंडळींची मार्गप्रतीक्षा करीत बसले. तों कांहीं अडचणीमुळें या मंडळींना भोजनास येण्याचा बेत रहित करावा लागल्याची वार्ता त्यांना समजली. ते अर्थातच थोडे घाबरले आणि तयार झालेल्या स्वयंपाकाचें आतां काय करावें अशा विचारांत पडले ! या घाबरलेल्या स्थितींतच त्यांना एक विचार सुचून ते गृहस्थ आपल्या एका मित्राच्या येथें गेले. तेथें रोज सकाळीं चहाच्या वेळीं चारपांच मंडळी जमत असत. त्यांना सर्व हकीकत सांगून ते म्हणाले, "आतां स्वयंपाक गुरांपुढें ठेवण्याची वेळ आली आहे, त्यापेक्षां तुम्हीं तरी जेवायला चला !" या गृहस्थांनीं घाबरलेल्या स्थितींत काढलेल्या या उद्गारांनीं अजाणत उद्भवलेला हा विनोदप्रसंग ऐकून हरिभाऊंना फार मौज वाटली ! इतकी कीं अनेक प्रसंगीं त्यांच्या मंडळींत याचें पुनरुच्चारण होई.

× × ×

[२१३] **दृष्टींची चढाओढ !**

हरिभाऊंबरोबर फिरावयास जाणाऱ्या मंडळींत शॉर्ट साइट किंवा अदूरदृष्टि असलेले बरेच होते. यामुळें ज्या थोड्या गृहस्थांची दृष्टि चांगली असे ते आपल्याला खूप लांबचें दिसतें आहे असें सांगत असत व कित्येक वेळां मैल अर्ध मैल अंतरावर असलेल्या वस्तूंचें किंवा देखाव्याचें वर्णनही देत असत ! बाकीच्या लोकांची दृष्टि अधू झालेली असल्यामुळें त्यांना या गप्पा निमूटपणें ऐकाव्या लागत. अशाच एका प्रसंगीं, लांबचें कोणाला दिसतें अशाबद्दल दोन मिशनऱ्यांत वाद उपस्थित होऊन त्यांच्यांत पैज लागल्याची गोष्ट हरिभाऊ सांगत. हे दोन मिशनरी बसले होते तेथून बऱ्याच

अंतरावर एक चर्च होतें. त्या चर्चवर एक पाटी लावली होती. ते ज्या जागेवर होते तेथून जो पाटीवरील मजकूर वाचील त्यानें पैज जिंकली असें समजलें जाईल असें त्यांच्यांत ठरलें. त्यांनीं एक मध्यस्थही नेमला व त्या दिवशीं संध्याकाळ झाल्यामुळें दुसऱ्या दिवशीं सकाळीं ही दृष्टीची चढाओढ करावयाची असा त्यांचा संकल्प ठरला. आणि सर्वजण घरीं गेले.

x x x

[२१४] **नसलेला मजकूरही दिसला !**

ज्या दोघांत ही चढाओढ व्हावयाची त्यांपैकीं एकानें रात्रीं त्या चर्चमध्यें जाऊन ती पाटी वाचून ठेवली आणि दुसऱ्या दिवशीं आतां आपल्याला खास बक्षिस मिळणार असें मनोराज्य करीत तो घरीं परतला. यानें ही अशा प्रकारची लबाडी केल्याची काणकूण मध्यस्थाला समजली. तेव्हां त्यानें पहांटे उठून चर्चवरील पाटी काढून ठेवली आणि त्या जागीं दुसऱ्याच मजकुराची पाटी लावली. ठरल्याप्रमाणें सकाळीं ते दोघेजण व हा मध्यस्थ असे तिघेजण त्या जागेवर येऊन हजर झाले. या दोघांपैकीं जो प्रामाणिक होता त्यानें बराच प्रयत्न केला, पण त्याला कांहीं पाटीवरील मजकूर दिसेना. तेव्हां त्याला अर्थातच माघार घ्यावी लागली. दुसरे खप्पी पुढें आले आणि दृष्टि ताणताणून पाहिल्याची कांहीं वेळ बतावणी करून त्यांनीं पाटीवरील मजकूर घडाघडा वाचून दाखविला ! व तिघेही जण हा मजकूर बरोबर आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरितां चर्चकडे गेले. तेथें जाऊन पहातात तों या गृहस्थांनीं सांगितलेला मजकूर पाटीवर नसून दुसराच असल्याचें दिसून आलें ! त्यांचा चेहरा गोरामोरा झालेला पाहून मध्यस्थ म्हणाले, " तुमची दृष्टि फारच चलाख दिसते आहे !

असलेला मजकूर कुणालाही दिसेल; पण तुम्हांला नसलेला मजकूरही दिसला ! ”

× × ×

[२१५] **सापांचा सुळसुळाट !**

हरिभाऊ एकदां माहीमला गेले होते. तेथें त्यांच्यावर आलेला एक भयंकर प्रसंग ते नेहमीं सांगत असत. त्या गांवीं रात्रीं आठ वाजण्याच्या सुमारास ते एका आवारांत बहिर्दिशेला गेले असतां त्यांना तेथें सात आठ साप वावरत असलेले एकदम दिसले ! या देखाव्यानें त्यांची स्वाभाविकच अगदीं गाळण उडून गेली ! आतां यांतून आपण निभावतों कसे असेंही त्यांना वाटूं लागलें. इतक्यांत आसपास माणसांची चाहूल लागतांच त्यांनीं त्यांना हांक मारली व वेळेवर त्यांना मदत मिळाल्यामुळें तेथून त्यांची सुटका झाली.

# १२

**[२१६]** **चंगीभंगी लोकांचा क्लब**

आज पन्नास वर्षें होत आलीं. येथील शनीच्या पाराजवळ एक क्लब होता. क्लबांतील कित्येक मंडळी चांगली सुखवस्तु होती. आणि लहानपणींच कुसंगति जडल्यामुळें त्यांतील बहुतेक दुर्व्यसनी निघाली. आपल्या व्यसनांची व बदफैलीपणाची आराधना आपल्याला निर्वेध रीतीनें करतां यावी म्हणून त्यांतील एक गृहस्थ आपल्या वडलांपासून वेगळेही राहिले होते. या क्लबांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत भांग, गांजाच्या किती तरी सुधारून काढलेल्या आवृत्ति निघत असत! रात्रीं या क्लबाच्या विद्यमानें वेणीधरबुवांचीं कीर्तनेंच काय, पण अनेक वेळां तमाशेही होत!

x x x

**[२१७]** **"मधली स्थिती"चा उगम!**

हरिभाऊ या क्लबांत कधीं कधीं जात. हरिभाऊंसारखे गृहस्थ आपल्या क्लबांत येतात यामुळें आपल्या क्लबाला मोठेपणा येत आहे असेंच क्लबांतील इतर गृहस्थांना वाटत असल्यामुळें ते सर्वजण त्यांना मोठ्या आदरानें वागवीत. क्लबांतील मंडळीची ही शोचनीय स्थिति पाहून हरिभाऊंना फार वाईट वाटत असे. या क्लबांत रोजचे रोज जे अनन्वित प्रकार होत त्यांचा हरिभाऊंच्या कल्पनेनें रंगविलेला देखावा म्हणजेच त्यांची 'मधली स्थिति' ही कादंबरी होय! या क्लबांतीलच कित्येक व्यक्तींवर आपल्या कल्पनेचा कुंचला फिरवून हरिभाऊंनीं या कादंबरींतील भूमिका निर्माण केल्या आहेत. विशेषत: विनायकराव व गोविंदराव या व्यक्ती हरिभाऊंनीं याच क्लबांतून पैदा केल्या!

x  x

[२१८] **दुर्व्यसनांचीं साधनें !**

भांग-गांजाच्या ठिकाणीं हरिभाऊंनीं आपल्या कादंबरींत फक्त दारूची स्थापना केली आहे. इंग्रजी शिकलेल्या लोकांत त्या वेळीं फैलावत असलेल्या मद्यपानाचाही आपल्याला परामर्श घेतां यावा यासाठींच हरिभाऊंनीं अशी योजना केली. घरीं थोडें स्वास्थ्य, शिक्षणाचा अभाव आणि फुरसतीची रेलचेल हीं तीन साधनें अनुकूल असलीं म्हणजे मनुष्य दुर्व्यसनांत न सांपडला तरच आश्चर्य होय! हरिभाऊंनीं या क्लबाच्या निमित्तानें आपल्या कादंबरीची रचना करून समाजांत दुर्व्यसनांबद्दल व तदुद्भव इतर अनिष्ट प्रकाराबद्दल निषेधबुद्धि उत्पन्न करण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला, आणि त्याबद्दल त्यांची सर्वतोमुखीं तारीफही झाली.

x x x

[२१९] **चुलत्यांची स्तुति.**

आपल्या लेखनकौशल्याची व रचनासौष्ठवाची विष्णु मोरेश्वर महाजनी, शंकर मोरो रानडे, काशीनाथ नारायण साने यांच्यासारख्या लेखक म्हणून त्या वेळीं सुप्रसिद्ध असलेल्या लोकांकडूनही तारीफ झालेली पाहून हरिभाऊंना अर्थातच समाधान वाटलें. पण त्यांतल्या त्यांत त्यांचे चुलते महादेव चिमणाजी आपटे यांनींही या कादंबरीसंबंधानें प्रशंसादर्शक उद्गार काढले हें ऐकून त्यांना विशेष धन्यता वाटली असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हा कादंबऱ्या लिहावयास लागला तेव्हां हा कुमार्गाला तर लागणार नाहीं ना, अशी ज्यांना शंका वाटूं लागली होती त्यांच्याच तोंडून आपली स्तुति होऊं लागली ही वस्तुस्थिति हरिभाऊंना आपला लेखनव्यवसाय पुढें चालविण्यास निःसंशय प्रोत्साहकच वाटली असली पाहिजे!

[२२०] **अधिक लौकिकवान् होणार !**

" मीं आजकालच्या गोष्टी वाचल्या. त्या मला खरोखरच फार आवडल्या. आम्हीं वकिलींत जितकी प्रसिद्धि मिळविली त्याहीपेक्षां अधिक व निरंतरचा लौकिक आमचे चिरंजीव मिळविणार ही मोठी आनंदाची गोष्ट होय." असें महादेव चिमणाजींनीं हरिभाऊंच्या-बद्दल एका निकटच्या आप्ताजवळ उद्गार काढले. प्रेममूलक भावनेनें कां होईना, जे आपला उपहास करीत होते त्यांच्या तोंडून ही स्तुति निघालेली ऐकून हरिभाऊंस आपले श्रम सार्थकीं लागले असें वाटणें स्वाभाविकच होतें.

x x x

[२२१] **चारित्र्याचा जोमदार कोंब !**

हरिभाऊंनीं वयाच्या केवळ विशी एकविशीच्या सुमारास 'मधली स्थिति' ही कादंबरी निर्माण केलेली पाहून वयाच्या एक-विसाव्या वर्षीं प्राइड ॲण्ड प्रेज्युडिस या कादंबरीस जन्म देणाऱ्या जेन आस्टेनचें हरिभाऊंच्या मित्रपरिवारास स्मरण झाल्याशिवाय राहिलें नसेल. हरिभाऊंना दाबतें-दडपतें माणूस कोणीही नव्हतें आणि तरुण माणसास बिघडविण्यास ज्या गोष्टी कारणीभूत होतात त्यांची त्यांच्या-भोंवतीं सर्व सिद्धता असतांही त्यांना आपली नीतिमत्ता निर्लेप राखतां आली. यावरून त्यांच्या चारित्र्याचा मूळचा कोंब किती जोमदार व मजबूत असेल याची कोणासही साधारण कल्पना करतां येण्यासारखी आहे.

x x x

[२२२] **रेनॉल्ड्सचा हात सोडून दिला !**

रेनॉल्ड्स जशीं समाजाचीं बिंगें काढीत होता तशींच आपण

काढावींत अशी रेनॉल्ड्स वाचून हरिभाऊंच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली असावी असें दिसून येतें. 'मधल्या स्थिती'चें पहिलें प्रकरण हें रेनॉल्ड्सच्या 'ओल्ड लंडन' नांवाच्या कादंबरींतील पहिल्या प्रकरणाचें भाषांतर होय. पण रेनॉल्ड्सच्या कादंबरींतील समाजाबद्दलची उपहास-बुद्धि व वर्णनांतील अश्लीलता यामुळें समाजसुधारणेच्या आपल्या संकल्पित हेतूचा बिघाड होईल ही जागृति होऊनच कीं काय, त्यांनीं रेनॉल्ड्सचा हात या ठिकाणीं जो सोडून दिला तो कायमचाच सोडून दिला !

x x x

[२२३] **मासलेवाईक नमुने !**

सामाजिक कादंबऱ्यांचा वस्तुसृष्टीशीं निकट संबंध असल्यामुळें या कादंबऱ्यांतील कित्येक भूमिकांत प्रत्यक्ष चालू व्यवहाराचें प्रतिबिंब दिसावें हें स्वाभाविकच आहे. किंबहुना असें प्रतिबिंब दिसणें आणि तें समकालीन माणसांना ओळखतां येणें हें सामाजिक कादंबऱ्यांच्या यशस्वितेचें एक लक्षणच समजलें पाहिजे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत समकालीन माणसांनाच काय, पण आजच्या पिढीसही नेमकें बोट दाखवितां येईल अशा व्यक्तींचें कधीं ओझरतें तर कधीं पूर्ण रीतीनें निदर्शन करून देणाऱ्या भूमिका सांपडण्यासारख्या आहेत. याचें कारण हरिभाऊंनीं निरनिराळे स्वभावविशेष, भिन्न भिन्न अभिरुचि व वेग-वेगळ्या प्रवृत्ति यांचे त्या त्या वर्गांतील मासलेवाईक नमुने निर्माण केले आहेत, हें होय.

x x x

[२२४] **रचनाकौशल्य !**

वस्तुसृष्टींत वावरणाऱ्या व्यक्तींतील विशेष गुण किंवा स्वभावांतील

एखादी विवक्षित छटा किंवा चालचर्येंतील सहज ध्यानांत येण्यासारखी लकब घेऊन हरिभाऊ त्यांत स्वयंनिर्मित इतर गुणविशेषांचें संमिश्रण करीत. वस्तुसृष्टींतील व्यक्तीवर आपल्या कल्पनेचें कलम फिरवून ती अधिक आकर्षक किंवा उठावदार होईल अशी योजना करूनच त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतील भूमिकांची घटना केली आहे. पात्रांचा खरे-पणा कायम राहून त्यास कल्पनारम्यत्वाचीही जोड मिळावी अशीच त्यांनीं त्यांची कुशलतेनें रचना केली आहे.

× × ×

[२२५] **खऱ्याखुऱ्या व्यक्ति !**

'पण लक्ष्यांत कोण घेतो' मधील बळवंतराव, यमुना व शंकर-मामंजी; 'मधली स्थिति' यांतील विनायकराव व गोविंदराव; 'यशवंत-राव' मधील श्रीधरपंत, त्यांच्या पत्नी व रा० ब० आडमुठे, 'मी' मधील ताईचा नवरा व रावजी; 'मायेच्या बाजारां'तील दिगंबरपंत, कृष्णाजी-पंत, अण्णासाहेब व पद्मा; 'भयंकर दिव्यां'तील प्रो० डँडी, दादासाहेब, सदूनाना; 'कर्मयोगां'तील भाऊसाहेब व त्यांचे चिरंजीव वगैरे पात्रें खुद्द पुण्यांतील निरनिराळ्या व्यक्तींचीं कल्पनामिश्रित चित्रें होत, ही वस्तुस्थिति हरिभाऊंच्या समकालीन मित्रांना ओळखतां येत असे.

× × ×

[२२६] **अनियमितपणाचा ठसा !**

हरिभाऊंची कादंबऱ्या लिहिण्याची पद्धत, अगदीं गळ्याशीं आलें म्हणजे लिहावयाचें अशीच असे. त्यांच्या लेखनाचें तट्टू आठवडाभर फिरत असावयाचें. अगदीं त्याच्यावर स्वार होण्याची वेळ येऊन ठेपली म्हणजेच त्यास कानाला धरून आणून व त्याच्यावर आरोहण करून त्यास मुक्काम गांठीतोंपर्यंत दामटीत न्यावयाचें अशीच त्यांची अगदीं

आरंभापासून वहिवाट होती ! कादंबऱ्या नियमित रीतीनें प्रकाशित व्हाव्यात याकरितां त्यांनीं करमणूक पत्र काढलें. पण त्यांतही हरिभाऊं-च्या गैरपद्धतशीरपणाचा ठसा स्पष्ट रीतीनें उमटलेला दिसून येत असे. करमणुकींत अगदीं प्रथम प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'पण लक्ष्यांत कोण घेतो' या कादंबरीसंबंधांतसुद्धां करमणुकीचे पांच पांच सहा सहा अंक कादंबरीच्या प्रकरणाशिवायच निघावेत अशीं कित्येक उदाहरणें सांपडण्यासारखीं आहेत !

× × ×

[२२७] **दोषांचें कारण !**

या त्यांच्या लिहिण्याच्या गर्दीमुळें पुष्कळ वेळां कादंबरीच्या गेल्या व चालू प्रकरणासंबंधांतील पूर्वापर संबंध शिथिल होणें, वर्णन किंवा वृत्तान्त यांतील प्रमाणशीरपणाचा अतिक्रम होणें, ओढघस्त लिहिण्या-मुळें भाषेंतही थोडा विस्कळितपणा उत्पन्न होणें वगैरे दोष त्यांच्या कादंबऱ्यांत राहून गेले आहेत. एकदां लेखनाचें माप टाकल्या-नंतर त्याकडे पुन्हा पहाणें त्यांना अगदीं नकोसें होत असल्यामुळें, त्यांच्या हातूनच या दोषांचें परिमार्जन होण्याची संधि त्यांच्या कादंबऱ्यांना केव्हांही लाभली नाहीं.

× × ×

[२२८] **प्रकरणें पाय पसरीत !**

त्यांच्या कादंबऱ्यांत कित्येक ठिकाणीं निष्कारण पाल्हाळ होण्याच दुसरेंही कारण आहे. करमणुकीस अमुक कॉलम मजकूर पाहिजे हें समजलें म्हणजे त्याप्रमाणें त्यांच्या कादंबरींतील प्रकरणांवर पाय पसरण्याचा किंवा आंखडण्याचा प्रसंग येत असे ! गर्दीमुळें नवीन प्रकरणाची जुळणी बसली नाहीं तर मागील प्रकरणच पुढें ओढीत

ावयाचें असेही प्रसंग त्यांच्यावर येत असत! दहा पानांचा ग्यंपाक तयार असतां एकदम वीस माणसें आलीं म्हणजे स्वयंपाकीण कितीही सुग्रण असली तरी तिला पाणी घालून पदार्थ वाढविण्या-ोवाय जसें गत्यंतर उरत नाहीं, त्याप्रमाणेंच कादंबरीचें प्रकरण ठहिण्यासंबंधांत हरिभाऊंची कित्येक वेळां स्थिति होत असे! अशा थतींतही त्यांच्या कादंबऱ्या इतक्या मनोरम व्हाव्या यावरून त्यांची तिभा किती सामर्थ्यवान् होती हें दिसून येतें.

x x x

२२९] **पर्यवसानास विलंब!**

हरिभाऊंना कादंबरीचें पर्यवसान ठरविण्यास उशीर लागे. पर्य-सान करण्याचे त्यांना अनेक प्रकार सुचत; पण त्यांतलें कोणतें त्करावयाचें ह्याबद्दल त्यांचा निर्णय लवकर होत नसे. पर्य-सानास अशा प्रकारें विशेष दिरंगाई लागल्याचे प्रसंग म्हणजे 'मी', ज्राघात' वगैरे कादंबऱ्यांचे होत. मी कादंबरीचें शेवटचें प्रकरण क्रर ठरण्यास तर फारच विलंब लागला! इतका विलंब लागूनही ांच्या कादंबऱ्यांचीं पर्यवसानें प्रायः गडबडीनेंच झालीं असल्याचें ष्टोत्पत्तीस येतें. पहिला मजकूर प्रमाणाबाहेर वाढल्यामुळेंच त्यांना ावट आंखडता घेणें जरूर पडत असावेंसें वाटतें.

x x x

२३०] **कार्यकारणसंबंध!**

हरिभाऊंचा पैशासंबंधांतील ओढघस्तपणा त्यांच्या लेखनव्यवसायांतील ोढघस्तीप्रमाणेंच त्यांना त्रासदायक होत असे. किंबहुना या दोहोंत ार्यकारणसंबंधही होता असें म्हणतां येण्यासारखें आहे. त्यांच्या ादंबऱ्या यथाक्रम संकल्पित मुदतींत वक्तशीर समाप्त झाल्या असत्या

तर त्यांना त्यापासून अर्थोत्पत्तिही चांगली झाली असती. पण हरिभाऊंचा दिरंगाईचा स्वभाव, व त्यांना द्रव्य नको होतें अशांतला भाग नसला तरी पैशासंबंधांतील त्यांची साधारण उदासीन वृत्ति यामुळें द्रव्यप्राप्तीसंबंधांत त्यांची स्थिति सामान्य प्रकारचीच राहिली.

× × ×

[२३१] **मानससृष्टीकडे मनाची ओढ!**

समाजाची निकोप घटना होऊन लोकव्यवहार निर्दोष कसा करतां येईल याची आपल्या कादंबऱ्यांतून बोधक व मार्गदर्शक चर्चा करणाऱ्या हरिभाऊंना स्वतःच्या व्यवहाराची ठाकठिकी नीट कां बसवितां आली नाहीं, असा कोणाहीपुढें साहजिकच प्रश्न उपस्थित होईल; पण आपल्या मानससृष्टींतील व्यक्तींच्या दिनचर्येकडे व हालचालीकडेच त्यांचें विशेष लक्ष वेधत असल्यामुळें त्यांचें व्यवहाराकडे दुर्लक्ष होत असावें असेंही म्हणतां येण्यासारखें आहे. स्वयंनिर्मित भूमिकांशीं त्यांचें इतकें तादात्म्य होऊन जाई कीं, त्यापुढें त्यांना वस्तुसृष्टींतील व्यवहाराची वारंवार विस्मृति पडत असावी. मानससृष्टीचा व्यवहार व प्रत्यक्ष व्यवहार यांमध्यें पहिल्याकडेच त्यांचें चित्त विशेष वेधलें जात असे असें दिसतें.

× × ×

[२३२] **विलक्षण तद्रूपता!**

पात्रांशीं हरिभाऊंची तद्रूपता कशी होत असे हें 'पाडव्याला भेट' ही गोष्ट लिहीत असतांना स्वतःच्या झालेल्या तन्मय चित्तवृत्तीचें श्री० काशीताई कानिटकर यांना लिहिलेल्या एका पत्रांत हरिभाऊंनीं स्वतः-च वर्णन दिलें आहे तें पाहिलें म्हणजे उत्कृष्ट दिसून येणार आहे. त्यांत ते म्हणतात, "पाडव्याला भेट ज्या वेळीं लिहिली, त्या वेळीं

राधाबाई, कृष्णराव वगैरे मंडळी मला अगदीं खरी अशी भासून त्यांच्या आनंदाबरोबर आनंद, शोकाबरोबर शोक याप्रमाणें माझ्या मनाचें तादात्म्य झालें. तिसरें प्रकरण लिहीत असतां मीं कितीतरी वेळां लिहीत असलेला कागद पलीकडे सारून डोळ्यांवाटे गालावर घळघळणारे अश्रु पुसण्याकरितां उपरणें घेतलें असेल. गोष्ट पुरी झाली तेव्हां मीं आपल्या स्वतःशीं असा उद्गार काढला कीं, जरी सर्व दुनियेनें या गोष्टीस नीरस म्हटलें तरी मी कालत्रयींही म्हणणार नाहीं."

× × ×

[२३३] **मानाचें निर्विवाद स्थान !**

हरिभाऊंनीं वाङ्मयाची निर्मिति केली ती केवळ वाङ्मयावरील प्रेम व समाजोपकारक वृत्ति या भावनांनींच केली. त्यांच्या पंचावन वर्षांच्या हयातींतील पहिली एकोणीस वर्षें वजा घातलीं म्हणजे आयुष्याच्या पसतीस वर्षांचा काल त्यांनीं या नाहीं त्या प्रकारानें उपयुक्त व आनंदकारक असें वाङ्मय निर्माण करण्यांतच घालविला. वाङ्मयासंबंधांत त्यांची अशी निरपेक्ष व स्वजनानुग्राहक भूमिका होती म्हणूनच त्यांना वाङ्मयमंदिरांत बहुमानाचें निर्विवाद स्थान प्राप्त झालें. या दृष्टीनें त्यांचा जीवनक्रम लेखनाचा उद्योग करणारांना किंवा ग्रंथकारांना निःसंशय आदर्शभूत होऊन राहील.

× × ×

[२३४] **अंते मतिः सा गतिः !**

आत्मचरित्र लिहावें अशी हरिभाऊंची इच्छा होती. त्याप्रमाणें आपली मुलगी शांता इच्या स्मरणार्थ शांतिमंगल नांवाचें काव्य लिहावें असाही त्यांचा मनोदय होता. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति घेऊन आपल्या इकडील निकृष्ट मानलेल्या वर्गासंबंधानेंही एक

कादंबरी लिहावी असा त्यांचा मानस होता. हिंदुस्थानचा इतिहास एका कथासूत्रांत गोवून तयार करावा अशीही त्यांची मनीषा होती. अपूर्ण राहिलेल्या कादंबऱ्या पूर्ण कराव्या हाही विचार त्यांच्या मनांत घोळत होता. मनुष्यप्राणी हा मर्त्य असल्यामुळें त्याच्या सर्वच इच्छा सफळ होणें अर्थातच शक्य नसतें. त्याप्रमाणें या सर्व मन:संकल्पांची संसिद्धि न होतां इहलोकांतून प्रयाण करण्याचा हरिभाऊंवर प्रसंग आला! पण ‘अंते मतिः सा गतिः’ या न्यायानें ते पुन्हा महाराष्ट्रांतच जन्मास येऊन आपलें प्रशंसनीय कार्य मागील जन्मावरून पुढें चालू करोत, अशीच त्यांच्यासंबंधानें वाचकवर्ग सदिच्छा प्रदर्शित करील यांत संशय नाहीं.

